हिंमतबहा

# टेरेन्स मॅक

23

म. ग्रं. म. ठाणे

विषय चरित्र

सं. नं. ३५७

विजय साहित्य

REFBK-0002246

एक रुपया

# मॅक्स्विनी

विजय साहित्य, पुणें.

REFBK-0002246

१ रुपाया.

प्रकाशकः
अनंत सखाराम गोखले,
५७० शनवार पेठ, पुणें.

मुद्रकः
अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

हिंमतबहाद्दर

# टेरेन्स मॅक्स्विनी

---

प्रो. नारायण सीताराम फडके, एम. ए.



१ विजय साहित्य १

# प्रस्तावना

श्रीयुत नारायण सीताराम फडके यांनी प्रस्तुत पुस्तकलेखनाच्या प्रसंगाकरितां मॅक्स्विनीच्या चरित्राचा विषय निवडून घेतला आहे, ही एक आनंदाची गोष्ट आहे. जशा गोष्टी पुढें घडून यावयाच्या असतात, तशाच प्रकारच्या प्रेरणा बहुतकरून परमेश्वराकडून लोकांच्या मनांत अगोदर प्रादुर्भूत केल्या जात असतात, असा सृष्टीचा एक सामान्य नियम सर्वत्र दिसून येतो. जसें ऋतुमान पुढें बदलावयाचें असेल, त्या मानानें वातावरणामध्यें आधींपासून पूर्व तयारी होत असलेली आपण प्रत्यहीं पहातों. त्याच न्यायानें एखाद्या राष्ट्राच्या उत्क्रांतीच्या इतिहासामध्यें तेथील लोकांकडून पुढें ज्या गोष्टी घडून यावयाच्या असतात, त्या गोष्टींना अनुकूल आणि उत्साहक अशी सामग्री आधींपासून अदृश्य रीतीनें आणि दैवी नेमानेमानें जुळविली जात असते, असा योगायोग पुष्कळ वेळां दृष्टोत्पत्तीस येतो. परमेश्वराचा अदृश्य हात प्रत्येक राष्ट्राची भवितव्यता बनवीत असतो! आणि त्या राष्ट्राच्या भावी भाग्योदयाला अवश्य लागणारें साहित्य तो त्या राष्ट्रांतील लोकांच्या जवळ अचानकपणें आणून देत असतो! पण अशा रीतीनें ईश्वरी सूत्र जरी या सगळ्या धोरणाच्या मुळाशीं असलें, तरी ईश्वर प्रत्यक्ष प्रकट होऊन कोठेंही प्रत्यक्ष रीतीनें हीं कामें केव्हांही करीत नसून अप्रत्यक्ष रीतीनें कांहीं तरी अन्य साधनांनींच तो या गोष्टी घडवून आणीत असतो. अशाच प्रकारच्या कांहीं तरी साधनांनीं लोकांच्या विचाराची दिशा योग्य रीतीनें बदलून राष्ट्राच्या उन्नतीकडे लोकांचीं मनें वळविण्याला पुस्तकांच्या सारखें दुसरें दैवी उत्कृष्ट साधन हल्लींच्या काळीं तरी निदान दुसरें कोणतेंही नाहीं. पूर्वगामी ग्रंथसंपत्ति ही भावी सुविचारांची जननी होय. आणि अशा दृष्टीनें पहातां टेरेन्स

मॅक्स्विनी यांच्या चरित्राचें हें पुस्तक प्रस्तुत काळीं भावी उपयुक्ततेनें अत्यंत भरलेलें आहे, यांत संशय नाहीं.

हल्लीं आपलें राष्ट्र ज्या दिशेनें पुढें चाललें आहे, त्या दिशेंतील योग्य मार्ग दाखविण्याला टेरेन्स मॅक्स्विनी यांच्या सारख्यांच्या चरित्रांची फार अवश्यकता आहे. रात्रीच्या निबिड अंधकारामध्यें आपलें गलबत कोणत्या दिशेनें हांकारावें हें ठरविण्याला ज्याप्रमाणें समुद्रावरील नावाड्याला आकाशांतील तेजस्वी ताऱ्यांची मदत होते, त्याप्रमाणें हल्लींच्या सारख्या राजकारणांतील संभ्रमसंकुलित परिस्थितीमध्यें आपण आपल्या राजकीय धोरणाचें सुकाणूं कसें वळवावें याची दिशा दाखविण्याला मॅक्स्विनीसारख्या अस्त पावल्यानंतरही अक्षयीं चमकणाऱ्या तेजस्वी ताऱ्यांची मदत आपल्याला केंव्हांही हितकारकच होईल.

आज आपला हिंदुस्थान देश ज्या भ्रमाच्या भोंवऱ्यांत सांपडला आहे, त्याच भ्रमाच्या भोंवऱ्यांत टेरेन्स मॅक्स्विनी यांचा आयर्लंड देश पूर्वीं अनेक वेळां सांपडला होता. ते सगळे भोंवरे चुकवून आपली वाट काढतां काढतां आज आयर्लंड स्वातंत्र्याच्या किनाऱ्याच्या जवळ जवळ येऊन पोंचला आहे. हिंदुस्थानच्या गलबताला हा स्वराज्याचा किनारा अजून फार दूर आहे. पण आपल्या गलबताचें सुकाणूं त्या स्वराज्याच्या किनाऱ्याच्या रोखानें वळविलें गेलेलें आहे, एवढें मात्र खास. तरी पण त्या दिशेनें आपण चाललों असतां त्या आपल्या स्वराज्याच्या वाटेमध्येंही अजून पुष्कळ भोंवरे आणि खडक आहेत. त्या भोंवऱ्यांत सांपडून आपलें राजकारणाचें गलबत प्रगतिशून्य रीतीनें तेथल्या तेथेंच केवळ वाटोळें गरगर सदोदित फिरत न रहावें, किंवा एखाद्या अयशस्वी क्रांतीच्या अगर आपसांतील अविचारी दुहीच्या खडकावर आपटून तें फुटून न जावें, या बाबतींत आयर्लंडसारख्या दुसऱ्या देशांच्या इतिहासापासून हिंदुस्थानाला पुष्कळ गोष्टी शिकण्यासारख्या आहेत.

स्वराज्याच्या बंदराकडे शीड हांकारून निघणाऱ्या अलीकडच्या

काळांतील बहुतेक राजकीय गलबतांच्या वाटेंत पार्लमेंटरी पद्धतीचा मोह हा एक मोठा भोंवरा आहे. या भोंवऱ्यांत एकदां सांपडलेल्या गलबतांना यांतून बाहेर पडणें मोठें कठिण होतें. तेल्याच्या घाण्याला जुंपलेला बैल ज्याप्रमाणें जमिनीवर सदैव त्या घाण्याच्या भोंवतीं फिरत राहतो, किंवा भोंवऱ्यांत सांपडलेलें गलबत ज्याप्रमाणें समुद्रांत नेहमीं त्या भोंवऱ्याच्या भोंवतींच चक्राकार फिरत रहातें, त्याप्रमाणें पार्लमेंट्स, कौन्सिलें, ॲसेंब्लीज् वगैरेंच्या त्या भयंकर खर्चाच्या निवडणुकी, तेथील ते शुष्क वादविवाद, त्यांच्या त्या सगळ्या उरस्फोडीनंतर पास होणारे ते बिनअंमलबजावणीचे कमकुवत ठराव, आणि फिरून नवीन मतदारांच्या याचा आणि फिरून नवीन निवडणुकी, या भवचक्रांत सांपडलेलें राष्ट्र त्या मिथ्या मोठेपणाच्या मोहामध्यें पूर्णपणें गुरफटून जातें; व एखाद्या तंतुवायाच्या तंतुजालांत सांपडलेल्या एखाद्या मशकाप्रमाणें त्याला त्या मोहांतून आपली सुटका करून घेणें फार कठिण होतें. याचें प्रत्यंतर आयर्लंडच्या इतिहासामध्यें चांगलें दिसून येतें. इंग्लंडनें आयर्लंडमधील कित्येक स्वदेशाभिमानी लोकांना प्रथमतः या पार्लमेंटरी पद्धतीच्या घाण्याला जुंपलें; व ते बिचारे आयरिश देशभक्त या घाण्याच्या भोंवतीं कित्येक वर्षेपर्यंत मोठ्या श्रद्धाळूपणानें आणि प्रामाणिकपणानें गरगर फिरत राहिले. डोळ्यांवर मोहांधतेची झांकणी असल्यामुळें आपण त्याच जागेभोंवतीं वाटोळें फिरत आहों, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत पुष्कळ दिवसपर्यंत आली नाहीं, व आपण पुढेंच चाललेले आहों अशाच भ्रमामध्यें त्या बिचाऱ्यांचा बराच काळ लोटला. नंतर आपण कोठें आहों हें जेव्हां ते डोळे उघडून पाहूं लागले, तेव्हां आपण फारसे पुढें गेलेले नसून इंग्लिशांच्या गुलामगिरीमध्यें आपण जेथें होतों तेथेंच कायम आहों, असें त्यांना अखेरीस आढळून आलें. आणि मग तेव्हांपासून आयरिश लोकांमध्यें चळवळीचे निराळे मार्ग निघूं लागले. तरी पण या पार्लमेंटरी पद्धतीची जी चटक आयरिश लोकांच्या जिभेला

लागलेली होती, ती लवकर सुटण्यासारखी नव्हती. ओकोनेल, पार्नेल, वगैरे पूर्वीच्या अनेक आयरिश देशभक्तांनीं पार्लमेंटरी पद्धतीच्या घाण्याभोंवतीं फिरून वाळूच्या कणांपासून तेल गाळण्याचे जरी शिकस्तीचे प्रयत्न केले, तरी ग्लॅडस्टनसारख्या उदारमतवादी प्रधानांच्या हातून देखील पार्नेलाइट पक्षांतील लोकांच्या स्वराज्याच्या आकांक्षा परिपूर्णतेला पोंचूं शकल्या नाहींत. तरी पण रेडमन्डसारखे कित्येक आयरिश लोक अजूनही वाळूच्या कणांतून कांहीं तरी तेलाचे थेंब बाहेर पडतील म्हणून पार्लमेंटरी पद्धतीचा पुरस्कार करीतच होते. परंतु बाकीच्या आयरिश लोकांचा या तेलाच्या घाण्यावरील विश्वास आधींपासूनच उडून गेलेला असल्यामुळें त्यांनीं सिन फेन पक्षाची संस्थापना केली होती; व आपले व्हॉलंटिअर्स जमवून व आपल्या स्वतंत्र संस्था निर्माण करून आपलें स्वराज्य आपण चालवूं लागावयाचें, अशा प्रकारचे प्रयत्न त्यांनीं सुरू केले होते. या पक्षाच्या पुरस्कर्त्यांपैकीं लार्ड मेयर मॅक्स्विनी हा एक प्रमुख पुढारी होता. त्यानें आयरिश स्वयंसेवकांची चळवळ फार जोरानें चालविली होती, व लाखों स्वयंसेवकांचीं पथकें त्यानें आयर्लंडच्या स्वराज्याकरितां उभारलीं होतीं. आयर्लंडमधील सिन फेनर्स अशा रीतीनें आपल्या देशाच्या स्वतंत्रतेसाठीं असे जिवापाड प्रयत्न करीत असतांही रेडमन्डसारख्या जुन्या पुढाऱ्यांचा अजूनसुद्धां पार्लमेंटरी पद्धतीवर आणि तेथील मानमान्यतेवर विश्वास कायम होताच. या बाबतींत रा. फडके यांच्या पुस्तकांतील पुढील वाचनीय उतारा असा आहे,

"पार्लमेंटमध्यें शिरून स्वराज्य मिळवूं पाहणारे दरबारी पुढारी अस्तास गेले, तेव्हां त्यांच्याबरोबरच त्यांचे आवडते शब्द आणि आवडती भाषाही नाहींशी झाली. पण त्यांच्या वर्चस्वाचा ऐन मध्यान्ह होता त्या वेळीं पार्लमेंटमध्यें घडलेल्या एखाद्या क्षुल्लक गोष्टीला पोकळ महत्त्व देऊन, आजचा दिवस आयर्लंडच्या दृष्टीनें मोठा महत्त्वाचा गेला असा उगीच ओरडा केल्याखेरीज रेडमंड, डिलन, वगैरे

मंडळी एकही आठवडा सुना जाऊं देत नसत. कोठें लॉर्डांच्या सभेंत ॲस्किथच्या तोंडून आयर्लंडविषयीं चार जोरदार शब्द बाहेर पडले, किंवा लॉइड जॉर्जनें एखाद्या भाषणांत आयर्लंडच्या मागण्यांविषयीं कोरडी सहानुभूति दाखविली, कीं या मंडळींनीं 'केवढा हा महत्त्वाचा दिवस!' म्हणून ओरडत सुटावें व व्याख्यानें झोडावीं. वास्तविक ते सारे महत्त्वाचे दिवस महत्त्वहीन होते."

अशा विचारसरणीचे जे पार्लमेंटरी पुढारी आयर्लंडमध्यें होते त्यांची सगळी भिस्त इंग्लंडच्या पार्लमेंटवर होती. इंग्लंडची जी अडचण ती आयर्लंडची संधी (England's difficulty is Ireland's opportunity) हें मत जरी सामान्यतः प्रचलित होतें, तरी जर्मन लढाई सुरू झाल्याबरोबर रेडमंड वगैरेसारख्या पार्लमेंटरी प्रवृत्तीच्या आयरिश पुढाऱ्यांनीं आयर्लंडमधील स्वयंसेवकांचीं पथकें आपण इंग्लंडच्या मदतीला देऊं अशी सूचना केली; व त्या योगानें या पार्लमेंटरी पुढाऱ्यांनीं आयर्लंडमध्यें फाटाफूट उत्पन्न केली. या वेळचा टेरेन्स मॅक्स्विनी याच्या चरित्रांतील कथाभाग फार महत्त्वाचा आणि अत्यंत बोधप्रद आहे. मॅक्स्विनीचा जो सिन फेन पक्ष, त्याला ही रेडमंडची तोंडपुजेपणाची आणि लुडबुडेपणाची पद्धत बिलकुल पसंत नव्हती. इंग्लंड आपल्याला कांहीं एक देणार नाहीं आणि आपण आपल्या स्वतःच्या पायावरच उभें राहिलें पाहिजे, ही सिन फेन पक्षांतील लोकांची बालंबाल खात्री होऊन चुकलेली होती; व त्याप्रमाणें त्यांनीं आपलें धोरण शेवटपर्यंत टेविलें होतें; आणि त्यामुळेंच आयर्लंडला आज स्वातंत्र्य मिळालें आहे.

रेडमंडच्या पद्धतीप्रमाणें आपण कौन्सिलांत जाऊन झगडूं आणि पार्नेलसारखे पराक्रम करून दाखवूं, असें म्हणणारा आज आपल्या इकडे जो एक नवीन पक्ष निघालेला आहे, त्याचें म्हणणें किती फोल आहे, हें दाखविण्याला टेरेन्स मॅक्स्विनी यांचें हें चरित्र फार उपयोगी पडण्या-

सारखें आहे. पार्लमेंटमध्यें जाऊन राज्यकर्त्यांच्या विरुद्ध भांडण्याची कल्पना आतां शिळी झाली आहे व अयशस्वी ठरलेली आहे. हल्लीं जर आयर्लंडला स्वातंत्र्य मिळालेलें असेल, तर तें पार्नेल किंवा रेडमंड यांच्या पार्लमेंटरी पराक्रमांपासून मिळालेलें नसून सिन् फेन पक्षांतील डी व्हॅलेरा यांच्या सारख्यांचे दीर्घ उद्योग आणि टेरेन्स मॅक्स्विनी यांच्या सारख्यांचे अद्वितीय आत्मयज्ञ यांच्या योगानेंच तें मिळालेलें आहे. आयर्लंडच्या जुन्या चुका हिंदुस्थानानें फिरून चुकत बसण्यापेक्षां आयर्लंडचें नवें शहाणपण हिंदुस्थान देश शिकेल, तर त्यांतच त्याचा खरा फायदा आहे. आणि तें शहाणपण शिकविण्याला टेरेन्स मॅक्स्विनी यांच्या सारख्यांच्या चरित्रांची आज आपणांला अतिशय अवश्यकता आहे. अशा प्रसंगीं मार्मिक ग्रंथलेखक रा. नारायण सीताराम फडके, व उत्साही ग्रंथप्रकाशक, रा. अनंत सखाराम गोखले, या उभयतांनीं मिळून हें टेरेन्स मॅक्स्विनीचें अत्यंत ओजस्वी आणि अत्यंत उत्साहजनक असें चरित्र आपल्या देशबांधवांच्या पुढें ठेविलें आहे, याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत.

स्वराज्य ऑफिस, पुणें.
ता. ५।३।२३.

**शिवराम महादेव परांजपे.**

# विजय साहित्य

१. उच्च दर्जाचें वाङ्मय प्रकाशित करणें हा या संस्थेचा उद्देश आहे.

२. वर्षांतून सहा पुस्तकें काढण्याची संस्थेची योजना आहे. दर दोन महिन्यांनीं एक पुस्तक अशा क्रमानें पुस्तकें बाहेर पडतील.

३. फार मोठ्या आकाराचें पुस्तक न काढण्याचें संस्थेचें धोरण राहील. संस्थेचीं पुस्तकें कमींत कमी १२५ व ज्यास्तींत जास्त २५० पानांचीं असतील. पुस्तकांची छपाई व बांधणी आदर्शवत् करण्याचा संस्था कटाक्ष ठेवील.

४. केवळ कादंबऱ्याच प्रसिद्ध करण्याचें निकृष्ट तत्त्व संस्थेनें अंगिकारलेलें नाहीं. वर्षांतून दोन उच्च दर्जाच्या कादंबऱ्या, दोन तीन उदात्त चरित्रें, एखादा काव्यग्रंथ, एखादा अधिकारी विद्वानानें लिहिलेला टीकाग्रंथ व इतर विषयांवरील पुस्तकें असा क्रम ठेवण्याचें संस्थेनें ठरविलें आहे.

५. संस्थेच्या कायम वर्गणीदारांस संस्थेचें प्रत्येक पुस्तक पाऊणपट किंमतीस मिळेल. बारा आणे प्रवेश फी भरून संस्थेचे कायम वर्गणीदार होतां येईल. कोणत्याही महिन्यांत ही वर्गणी भरतां येईल व त्या महिन्यांत किंवा पुढें प्रसिद्ध होणारीं पुस्तकें सवलतीच्या दरानें रवाना होतील. संस्थेचें एखादें पुस्तक वर्गणीदारानें नाकारल्यास त्याचें नांव वर्गणीदारांच्या यादींतून काढलें जाईल व मग पुन्हां फक्त आठ आणे प्रवेश फी भरल्याखेरीज त्याचें नांव परत यादींत दाखल होणार नाहीं.

६. **'हिंमतबहाद्दर टेरेन्स मॅक्स्विनी'** हें संस्थेचें पहिलें पुस्तक आहे. या पुस्तकावरून संस्थेच्या प्रकाशनाचें अंतरंग व बहिरंग किती उत्कृष्ट राहील त्याची ग्राहकांस कल्पना येईलच.

७. संस्थेचें दुसरें पुस्तक एप्रिल १९२३ अखेर बाहेर निघेल.

८. ज्यांना संस्थेचे कायम ग्राहक व्हावयाचें असेल त्यांनीं प्रवेश फी १२ आणे, पुस्तकाची पाऊणपट किंमत व पोष्टेजचा चार्ज इतक्याची मनी ऑर्डर करावी किंवा आमचेकडून व्ही. पी. मागवावी.

९. संस्थेच्या कायम ग्राहकांखेरीज इतरांसही संस्थेचीं पुस्तकें मिळतील. त्यांस पुस्तकाची भर किंमत व पोष्टेज द्यावें लागेल. त्यांनीं अगर वर्गणीदारांनीं सोबतचें कार्ड भरून पाठवावें.

१०. संस्थेशीं पत्रव्यवहार करावयाचा तो **'व्यवस्थापक, विजय साहित्य, १०३ नारायण–पुणें शहर'** या पत्त्यावर करावा.

# विजय साहित्य

पुढील पुस्तकें

आंयरिश धुरंधर डी व्हॅलेरा (चरित्र)

कुलाब्याची दांडी (सामाजिक कादंबरी)

# हिंमतबहाद्दर टेरेन्स मॅक्स्विनी

## प्रकरण पहिलें

## मी कोट्याधीश असलों तर ?

सन १८९३ मधील गोष्ट. आयर्लंडच्या दक्षिण सीमेजवळच्या कॉर्क शहरांतील एका घरांत कुटुंबांतील मंडळींचा वादविवाद ऐन भरांत आला होता. अनेक लहान मोठ्या विषयांची चर्चा चालली होती. शेवटीं त्या वेळीं जगविख्यात असलेले अमेरिका खंडांतील कुबेर रॉकफेलर यांच्या अगणित संपत्तीविषयीं बोलणें निघालें. बापानें आपल्या मुलांपैकीं एकाला प्रश्न केला, " तुझ्याजवळ रॉकफेलर इतकी संपत्ति असली तर तूं काय करशील ? "

त्या प्रश्नाला चार मुलांनीं चार प्रकारचीं उत्तरें दिल्यावर पांचव्या मुलाकडे वळून बाप म्हणाला, " रॉकफेलरसारखा तूं कोट्याधीश असलास तर काय करशील ? "

त्या मुलानें स्थिर दृष्टीनें पित्याकडे पहात चटकन् उत्तर दिलें, " मी माझ्या आयर्लंडला स्वातंत्र्य मिळवून देईन ! "

तें उत्तर ऐकून पित्यानें त्याला जवळ ओढून हृदयाशीं धरलें आणि त्याच्या विशाल भालप्रदेशाचें चुंबन घेतलें.

तो मुलगा सुमारें १४ वर्षांचा होता. त्याच्या शरीराची काठी उंच आणि मजबूत होती. त्याचे केंस भुंग्यासारखे काळे होते, शरीरकांति तेजस्वी होती, डोळे नीलवर्ण होते, आणि त्याच्या प्रफुल्ल चेहऱ्यांत बुद्धीची विशालता, अंतःकरणाचा दिलदारपणा, आणि छातीची धडाडी पूर्णपणें प्रतिबिंबित झालेली दिसत होती.

या कुमाराचें नांव ' टेरेन्स '. त्याच्या घरांतील आणि गांवांतील

मंडळी त्याला ‘ टेरी ’ या लाडक्या नांवानें हांक मारीत. आपल्या वयाच्या ४१ व्या वर्षी इंग्रजांच्या बंदिखान्यांत अडीच महिन्यांचें खडतर प्रायोपवेशन करून ज्यानें आपला आत्मा बंधमुक्त करून घेतला, व आपल्या अभूतपूर्व हिंमतबहादरीनें आयर्लंडमध्येंच नव्हे, तर स्वातंत्र्यासाठीं झगडणाऱ्या प्रत्येक देशांत विलक्षण स्फूर्ति उत्पन्न केली तोच हा टेरेन्स मॅक्स्विनी. चवदाव्या वर्षींचें त्याचें हें कौतुकास्पद उत्तर त्याच्या पुढील उदात्त चरित्राचें पूर्वचिन्हच होतें.

टेरेन्स मॅक्स्विनीचे मूळ वंशपुरुष आयर्लंडच्या वायव्येकडील डॉनिगल नांवाच्या परगण्याचे रहिवाशी होते. ओडोनेल उपनांवाच्या राजांशीं केवळ पदरचे प्रजाजन म्हणून नव्हे तर ऋणानुबंधी स्नेही म्हणून अकृत्रिम प्रेमानें ते वागत असत. आणि त्या राजांचाही मॅक्स्विनी घराण्यावर लोभ आणि दृढ विश्वास होता. मॅक्स्विनी घराण्यांतील पुरुष रणझुंजार मर्द होते. त्यांच्या हातांत तळपणारा परशु त्यांच्या घराण्याचें चिन्ह समजला जात असे. ज्या ज्या वेळीं ओडोनेल राजांना युद्धाचा प्रसंग येई त्या त्या वेळीं सर्वांच्या अग्रभागीं आपले परशु खांद्यावर टाकून मॅक्स्विनी योद्धे उभे ठाकत असत. एकदां संकट टाळण्याकरितां ओडोनेल वंशांतील रेड ह्यू नांवाच्या राजपुत्राला मॅक्स्विनींच्या स्वाधीन करण्यांत आलें होतें, व मॅक्स्विनींपासूनच स्वार्थसाधू बदमाषांनीं त्या राजपुत्राला पळवून नेलें होतें. पण पुढें इंग्रजांनीं एका तोतयाला गादीवर बसविला तेव्हां परशुधारी मॅक्स्विनी योद्धे पाठीशीं घालून ओडोनेल वंशांतील राणीनें रणशिंग फुंकलें, लढाई जिंकली, तोतयाला कापून काढलें आणि आपली सत्ता पूर्ववत् स्थापन केली.

चवदाव्या शतकाच्या सुमारास डॉनिगल परगण्यांतील मॅक्स्विनी खालीं दक्षिणेकडे सरकले, व कॉर्क परगण्यांत त्यांची वसाहत होऊं लागली. तेव्हांपासून मॅक्स्विनींचीं अनेक कुटुंबें कॉर्क परगण्यांत उतरूनच कायम झालीं व नांदूं लागलीं. मॅक्स्विनी घराण्याचे मूळपुरुष

वायव्येकडच्या डॉनिगल परगण्यांत होते ही आठवणही हळू हळू बुजल्यासारखी होऊं लागली. मात्र मॅक्स्विनींचा परगणा पालटला तरी स्वभाव बदलला नाहीं. कॉर्क परगण्यांत स्थायिक होऊन त्यांनीं रस्ते केले, किल्ले बांधले, व्यापार मांडला आणि शिकारीचा शोक केला; तरी त्यांनीं आपला लढाऊ पेशा अजिबात टाकला नाहीं. क्रॉमवेलनें आयर्लंडवर स्वारी केली तेव्हां मॅक्स्विनींच्या परशूंच्या तेजानें त्याचेही डोळे थोडे फार दिपल्यावांचून राहिले नाहींत. जेव्हां जेव्हां देशांत लढाईची धामधूम उठली तेव्हां तेव्हां मॅक्स्विनींनीं तींत उडी टाकल्याची साक्ष इतिहासांत भरपूर सांपडते. आज घटकेला मॅक्स्विनींची योद्धे म्हणून ख्याति आहे. परशु हेंच त्यांच्या कुलाचें चिन्ह शोभतें यांत शंका नाहीं.

टेरेन्सचा बाप जेम्स मॅक्स्विनी तंबाखूचा कारखानदार होता. तंबाखू विकण्याचाही धंदा तो करी. याला एकंदर नऊ मुलें झालीं, त्यांतील टेरेन्स पांचवा. २८ मार्च १८७९ रोजीं टेरेन्सचा जन्म झाला. टेरेन्सचा बाप लवकरच मृत्युवश झाला व साऱ्या मुलांची जबाबदारी टेरेन्सच्या आईवर पडली, व ती तिनें मोठ्या धैर्यानें व कौशल्यानें उत्तम प्रकारें पारही पाडली. साऱ्या कॉर्क शहरांत टेरेन्सचें घर आदर्शवत् समजलें जात असे. त्या वेळचे ते दिवस आतांच्या काळापेक्षां फार निराळे होते. त्या काळीं लोकांना दरबारी राजकारणाच्या मोहांत पाडून देशांतील तरुणांना निःसत्त्व करून सोडणारे जॉन रेडमंडसारखे पुढारी नव्हते, किंवा जुन्या संस्कृतींचें सामर्थ्य नामशेष करून टाकणाऱ्या इंग्रजी सुधारणेचें पाऊलही आयर्लंडच्या जमिनीवर नीटसें पडलें नव्हतें. त्या काळीं आयर्लंडमध्यें अबादानी होती, व्यापार भरभराटींत होता, श्रीमंतांची श्रीमंती वैभवपूर्ण प्रासादांतून डौलानें खालीं पहात होती, लोकांत ज्ञानसंपादनाची हौस होती आणि स्वाभिमान जागृत होता. ज्ञानाची तहान आणि स्वदेशाविषयींचा अभिमान हे दोन्ही गुण लोकांत स्पष्ट दिसत असत. टेरेन्सचा बाप बुद्धिमान् आणि

देशाभिमानी होता. त्याची आई सुसंस्कृत आणि धर्मपरायण होती. अर्थात्, टेरेन्सच्या घरांतील वातावरण शुद्ध, सात्विक आणि देशाभिमान उत्पन्न करणारें असें होतें. आणि पतिनिधनानंतर दुःखाचा आणि दारिद्र्याचा असह्य भार सहन करावा लागत असूनही टेरेन्सच्या आईनें मोठ्या धीरानें आणि दक्षतेनें तें वातावरण कायम ठेवलें, आणि जडवादाचा दुष्ट स्पर्श आपल्या मुलांच्या मनाला होऊं दिला नाहीं. टेरीच्या स्वभावावर त्याच्या आईबापांच्या गुणांचा पुष्कळच परिणाम झाला. दर आठवड्यास एक नवीन कविता तयार करून ती रविवारीं पाठ म्हणून दाखविण्याची जेम्स मॅक्स्विनीनें आपल्या सर्व मुलांना शिस्त लाविली होती. कविता अस्सल आयरिश भाषेंतील असली पाहिजे असा कटाक्ष होता, आणि तींत जितकी अधिक बंडखोर भावना भरलेली असेल तितकी अधिक शाबासकी मुलांना मिळत असे. स्वातंत्र्याची थोरवी गाणारें काव्य वाचण्यास व पाठ करण्यास त्या काळच्या मुलांना मुद्दाम शिकवावें लागत नसे. जेम्स मॅक्स्विनीच्या घरांत तर स्वातंत्र्यगीतें मुलांच्या तोंडीं अहर्निश असत. कारण, इंग्लंडशीं कोणत्याही प्रकारचा संबंध न ठेवतां स्वराज्य उपभोगण्याचा आयर्लंडला नैसर्गिक हक्क असल्याचा विश्वास इतर कांहीं कुटुंबांप्रमाणें जेम्स मॅक्स्विनीच्या कुटुंबांतही पुरता भिनलेला होता. बापाचा स्वदेशाभिमानाचा ताठा टेरीच्या अंगांत उतरला असला पाहिजे यात्रिषयीं शंका नाहीं; आणि लहानपणापासून तों देहाच्या अंतापर्यंत आयर्लंडच्या स्वातंत्र्याचीं सुखस्वप्नें टेरीला पडत होतीं, त्या कार्यासाठीं तो अमानुष धडाडीनें कष्टत होता, आणि स्वराज्यासाठीं झगडणारा पुढारी म्हणून सारें राष्ट्र त्याच्या पाठोपाठ जात होतें, या सर्व गोष्टींचें बीज या स्वाभिमानाच्या ताठ्यांतच आहे याविषयींही शंकेला जागा नाहीं. याचप्रमाणें आईच्या स्वभावांतील वाङ्मयप्रीति आणि धर्मावरची अढळ श्रद्धा त्याच्या ठिकाणीं मुरली होती म्हणूनच त्याच्या पुढच्या देशकार्यांत एक प्रकारचें विशेष तेज लोकांच्या निदर्शनाला आलें.

टेरीच्या घराचें कल्पनाचित्र डोळ्यापुढें उभें करणें फारसें कठीण नाहीं. बुद्धिमान, मानधन आणि देशभक्त बाप, सुशील आणि धर्मपरायण आई आणि साधीं, सुस्वभावी व प्रेमळ मुलें, अशांचें तें घर होतें. अशा घरांत गौरकाय, कृष्णकेश आणि नीलनेत्र टेरी नांदत होता. तो अभ्यास करतांना अभ्यासांत गढून जात असे आणि खेळतांना खेळांत रंगत असे. जितकी प्रफुल्लता त्याच्या तोंडावर खेळाच्या वेळीं चमके तितकीच लिहितां वाचतांना कायम असे. त्याचा चेहरा तेजःपुंज होता आणि त्याच्या दृष्टींत बुद्धीचें, सहृदयतेचें आणि प्रेमाचें असें कांहीं पाणी खेळत होतें, कीं लहानापासून थोरापर्यंत सर्वांना तो हवासा वाटे. आनंदमय घर आणि आनंदी टेरी, असे ते दिवस होते!

ग्रंथ संग्रहालय
नं. ......
ता. ......

## प्रकरण दुसरें

# बालपणचे विचारतरंग

हल्लींप्रमाणें त्या कालीं आयर्लंडांत शिक्षणाची सोय नव्हती. तेव्हां धंदेशिक्षणाची व्यवस्था नव्हती, किंवा विश्वविद्यालयाचा मार्गही निष्कंटक नव्हता. साधारणपणें आयरिश मुलाच्या शिक्षणाची कथा अशी असे कीं, तो आपलें प्राथमिक शिक्षण पुरे करी, त्यांत त्याची कांहीं गति दिसून आली तर 'इंटरमिजिएट बोर्ड ऑफ एज्युकेशन'च्या चार परीक्षांतून तो पार पडे, म्हणजे झालें. तेथेंच विद्यादेवीला रामराम ठोकणें भाग पडे. इतर मुलांपेक्षां आपल्या शिक्षणासाठीं अधिक पैशांची तरतूद करण्याची धमक त्याच्यांत असल्याखेरीज कोणत्याही मुलाच्या उच्च शिक्षणाकडे कोणी काडीइतकेंही लक्ष्य पुरवीत नसे. याचा परिणाम असा होई कीं, प्रतिवर्षी अर्धें कच्चें शिक्षण संपादन केलेले शेंकडों विद्यार्थि बोर्डाच्या परीक्षेंतून बाहेर पडत, आणि कोठें तरी कारकुनी किंवा उमेदवारी करण्यावांचून त्यांना गत्यंतर नसे.

टेरीची हीच अवस्था व्हावयाची. पण त्याच्या अंगांत हिंमत होती. संकटांशीं झगडून विश्वविद्यालयीन शिक्षण संपादन करण्याचा आपला निश्चय त्यानें पार पाडला. त्या वेळीं 'ख्रिस्ती बंधू'नीं (Christian Bhrothers) चालविलेल्या तीन शाळा कॉर्क शहरांत होत्या, व त्यांच्या शाळांतील शिक्षण सर्वोत्कृष्ट समजलें जात असे. या तीन शाळांतील मुख्य शाळा कॉर्कच्या उत्तर भागांत होती, व याच शाळेंत टेरीचें शिक्षण झालें. विशेष हुशार मुलांचा एक निराळा वर्ग बनवून बोर्डाच्या स्कॉलर्शिपच्या परीक्षांना त्या मुलांना तयार करून पाठविण्याचा त्या शाळेंत प्रघात असे. टेरी या वर्गांत होता व लागोपाठ तीन वर्षें त्यानें स्कॉलर्शिप मिळविली. इंग्रजी आणि आयरिश भाषांमध्यें त्यानें त्या वेळीं विशेष प्राविण्य दाखविलें ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

'ख्रिस्ती बंधूं'च्या शाळांतून केवळ परीक्षेंत यश संपादन करण्यापुरतेंच कोतें शिक्षण मुलांना देत नसत. 'ख्रिस्ती बंधूं'च्या शाळांप्रमाणेंच 'राष्ट्रीय' शाळा या नांवाखालीं चालणाऱ्या शाळा त्या वेळीं आयर्लंडमध्यें होत्या. परंतु या दोन प्रकारच्या शाळांमध्यें एक महत्त्वाचा भेद असा होता कीं, 'ख्रिस्ती बंधू' हे सरकारपासून मदत घेत नसल्यामुळें वाटेल तसा सुंदर अभ्यासक्रम ठरवावयाला आणि निवडक निवडक पुस्तकें वर्गांतून लावावयाला पूर्ण स्वतंत्र होते; आणि उलट, मदतीवर अवलंबून राहणाऱ्या 'राष्ट्रीय' शाळा बोर्डाच्या हुकुमांनीं बांधल्या गेलेल्या होत्या. याचा परिणाम असा झाला कीं, 'राष्ट्रीय' शाळांतून मिळे त्यापेक्षां दसपट राष्ट्रीय शिक्षण 'ख्रिस्ती बंधूं'च्या शाळांत मिळत असे. म्हणूनच स्कॉलर्शिप मिळविणारे 'ख्रिस्ती बंधूं'चे विद्यार्थि आयरिश भाषा हा विषय घेत, व त्यांत प्राविण्य दाखवीत. कारण, केवळ परीक्षेसाठींच नव्हे तर त्या भाषेच्या प्रेमाखातर ती त्या विद्यार्थ्यांना शिकविली जाई. आयर्लंडच्या इतिहासाचीही हीच गोष्ट. आपलीं क्रमिक पुस्तकें आपण तयार करावयाचीं, व तींही अगदीं आदर्शवत् तयार करावयाचीं, असा 'ख्रिस्ती बंधू 'चा कटाक्ष असे. वरच्या वर्गांत त्यांना बोर्डानें नेमलेलीं पुस्तकें वापरावीं लागत हें खरें. उदाहरणार्थ, कोलियरचा आयर्लंडचा इतिहास व रॅन्समचा इंग्लंडचा इतिहास, असलीं रद्दड पुस्तकें वर्गांत चालविणें त्यांना भाग पडे. परंतु, नेमलेलीं क्रमिक पुस्तकें वापरण्या वापरण्यांत देखील पुष्कळ अंतर आहे. असलीं पुस्तकें वर्गांत वाचण्याच्या वेळीं त्यांतील बऱ्याचशा भागावर काट मारण्यासाठीं हातांत जांभळी पेन्सिल घेऊनच 'ख्रिस्ती बंधू' बसत असत. पुस्तक शिकवितांना त्यांत अज्ञानानें राहिलेल्या व हेतुपुरःसर केलेल्या साऱ्या चुकांवर ते टीकेचा भडिमार करीत, व या शिक्षणपद्धतीनें असत्याच्या काळ्या पार्श्वभूमीवर सत्याचा शुभ्र लेख लिहिला जाऊन

मुलांच्या मनांत विषय उत्तम प्रकारें ठसत असे. या दृष्टीनें पाहतां नंतर कित्येक वर्षांनीं आयरिश भाषेच्या आणि इतिहासाच्या अध्ययनाविषयीं जी मोठी चळवळ आयर्लंडांत झाली तिचे हे 'ख्रिस्ती बंधू' जनकच होत असें म्हणावयास हरकत नाहीं. विसाव्या शतकांत आयर्लंडमध्यें जे विख्यात देशभक्त झाले त्यांपैकीं एकटा टेरीच नव्हे तर, आर्थर ग्रिफिथ, वुइल्यम रूनी, पीअर्स हे सारे 'ख्रिस्ती बंधू'च्या हातांखालून गेलेले विद्यार्थिच होते. आणि यांच्याइतके प्रसिद्ध नसलेले असे तर अगणित विद्यार्थि शिक्षणाबरोबरच देशभक्तीच्या स्फूर्तीनें अलंकृत होऊन 'ख्रिस्ती बंधू'च्या शाळांतून बाहेर पडले.

टेरीच्या घरांतील वातावरणच अगोदर देशाभिमानपूर्ण होतें. त्यांत या शाळेंतील वातावरणाची भर पडली. जसजसें त्याचें शिक्षण होऊं लागलें तसतसें त्याच्या मनांत अनेकविध विचारांचे व आकांक्षांचे तरंग उठूं लागले.

" पूर्वज गेले होउन गाजी वारस आम्ही जर त्यांचे।
मनीं मानसीं सदा दिसावें स्वप्न अम्हां समशेरींचें ! ॥ "

या वर्णनाप्रमाणें टेरीच्या विचारतरंगांत समशेरीचा खणखणाट सदैव ऐकूं येत असे. त्याचा स्वभावच असा होता कीं, त्याच्या मनांत असले विचारतरंग उद्भवणें अपरिहार्य होतें, आणि त्याच्या घरांतील व शाळेंतील परिस्थिति त्याच्या मूळ स्वभावाला पोषकच होती. तो जसजसा मोठा होत चालला तसतसा स्वदेशाच्या स्वातंत्र्याविषयीं त्याच्या मनाला लागलेला ध्यास अनेक प्रसंगांवरून आणि गोष्टींवरून प्रगट होऊं लागला.

पण, या ध्यासांतच टेरी लहानपणीं सर्वस्वी गढून गेला होता असा याचा अर्थ नव्हे. शाळेंत असतांना इतर मुलांइतकाच, किंबहुना कांकणभर अधिकच, टेरी व्रात्य होता, आणि मस्ती करावयाला त्याची एका पायावर तयारी असे. मात्र, आधीं आपला अभ्यास

करावयाचा व मग धिंगाणा घालावयाचा अशी त्याची प्रवृत्ति असे. लांबलचक सुटी मिळाली, कीं तो सुटीच्या पहिल्या दिवशीं नेमून दिलेला अभ्यास करावयास प्रारंभ करी आणि तो एकदां संपला, कीं मग अगदीं शेवटपर्यंत तो सारखा खेळांत काळ घालवी. त्याच्या स्वभावांत गंभीरपणाइतकाच विनोद आणि आनंद भरलेला होता, आणि त्यामुळें त्याच्या मित्रांना त्याची संगति फार प्रिय वाटे. त्याचे शाळेंतील दिवस सुखांत व आनंदांत गेले आणि सन १८९४ मध्यें शाळेंतील शिक्षण संपून शाळा सोडण्याचा प्रसंग आला तेव्हां त्याला आणि त्याच्या सोबत्यांना अवघड वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

प्रकरण तिसरें

# रसिकाचें नीरस व्रत

सन १८९४ मध्यें, वयाच्या पंधराव्या वर्षी, टेरी शाळेंतील शिक्षण संपवून बाहेर पडला आणि कॉर्क शहरांतील 'डायर आणि कंपनी' नांवाच्या प्रसिद्ध कारखानदारांकडे त्यानें नोकरी पतकरली. या कारखान्यांत असतांना तो आपल्या कामाविषयीं अत्यंत तत्पर असे आणि मोठ्या आनंदी वृत्तीनें तो आपली नोकरी बजावीत असे. त्याचा अर्थ त्याला ती नोकरी मनापासून आवडत असे, असा मात्र नव्हे. मनाला विशेष न रुचणारेंही काम एकदां कर्तव्य म्हणून पतकरल्यावर दक्षतेनें पार पाडण्याच्या त्याच्या स्वाभाविक निश्चयी वृत्तीची ही एक साक्ष होती. त्याचा स्वाभाविक कल व्यापारी व्यवसायाकडे बिलकुल नव्हता. ती दिशा त्याला आवडणें शक्यच नव्हतें. पूर्वीचा एखादा शाळेंतला मित्र कधीं कधीं भेटला कीं, त्याच्याशीं आनंदानें गप्पा मारण्याच्या भरांत टेरी आला म्हणजे डायर कंपनीच्या कारखान्यावर व आपण पतकरलेल्या कामावर विनोदपूर्ण टीका तो कांहीं थोडी करीत नसे. त्याला करावें लागणारें काम, कारखान्यांतील एकंदर दिनचर्या आणि वातावरण या साऱ्या गोष्टी त्याच्या स्वाभाविक आवडीनिवडींच्या अगदीं सर्वस्वी विरुद्ध होत्या. परंतु, जणूं काय साऱ्या कामापेक्षां हेंच काम याला अधिक प्रिय आहे असें लोकांना वाटावें इतकें लक्षपूर्वक आणि आस्थेनें तो आपलें काम करीत असे, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. आपल्या कामांत त्यानें इतका चोखपणा ठेवला होता कीं, लवकरच कंपनीच्या हिशेबतपासनीसाच्या जागीं त्याची बढती झाली, आणि सन १९११ सालीं कॉर्क परगण्याच्या धंदेशिक्षण कमिटीनें त्याला व्यापारी शिक्षक नेमीपर्यंत तो त्याच जागेवर होता.

एका दृष्टीनें पाहतां असेंही म्हणतां येईल कीं, त्या वेळीं टेरीनें व्यापारी

नोकरी पतकरली काय किंवा दुसऱ्या एखाद्या प्रकारची नोकरी धरली काय, सारखेंच होतें. कारण, किती झालें तरी नोकरीच्या कामाला टेरी दुय्यम दर्जाचेंच महत्त्व देत होता. त्याच्या वयाच्या मुलांची गोष्टच अशी असते. टेरी आपल्या कचेरींत टेबलासमोर बसून आपलें काम करी, मनाविरुद्ध कां होईना पण काम हातां वेगळें होईतों त्यांत आपलें पूर्ण लक्ष घाली, आणि सहा वाजतां कचेरींतील काम संपलें, कीं तो आपल्या खऱ्या आवडत्या कामाला प्रारंभ करी. नोकरीच्या आरंभाच्या दिवसांत इतर तरुणांप्रमाणेंच टेरीला आयुष्यांतील नानाविध अनुभवांची मौज घेण्यापुढें दुसऱ्या कोणत्याच गोष्टीकडे लक्ष पुरवावयास वेळ नव्हता. ओंठावर मिसुर फुटूं लागलेले तरुण रंगीबेरंगी फुलांवर उडत राहणाऱ्या फुलपांखराप्रमाणें स्वच्छंदानें वागडण्यास उत्सुक असतात. जगांत काय गंमत भरलेली आहे ती पहावयास, आयुष्यांत कोणती जादू भरलेली आहे ती ओळखण्यास ते अधीर झालेले असतात. या जगाच्या डोहांत एकदम बुडी मारून त्याचा ठाव काढावयाची त्यांची धडपड चाललेली असते. टेरीची हीच स्थिति होती. मोकळी हवा आणि समुद्र हीं त्याला प्यारीं होतीं व उन्हाळ्यांत तासचे तास त्यांचा उपभोग घेण्यांत तो घालवी. त्याचप्रमाणं मर्दानी खेळ आणि ग्रंथ यांचा त्याला अतोनात नाद होता, व हिंवाळ्यांत तो त्यांमध्यें गढून जाई. फ्रेड क्रोनिनसारख्या सुहृदांबरोबर समुद्रतीरीं फिरतांना, किंवा एखाद्या जवळच्या गांवीं सायकलची फेरी मारतांना, किंवा एखाद्या शांत स्थळीं सृष्टिदेवीच्या शोभेनें डोळ्यांचें पारणें फेडीत आपल्याच विचारांत गढून जाऊन हळू हळू सहल करतांना पुष्कळांनीं त्याला त्या दिवसांत पाहिलें असेल. नाट्यप्रयोगांची विशेष आवड त्याला तेव्हांपासूनच होती. 'कॉर्क ऑपेरा हाउस' नांवाची कंपनी त्याच्या आवडीची होती, व तिच्या खेळाला तो नेमानें हजर असावयाचा! मात्र नाट्यप्रयोग पाहण्यांत व नाटकें वाचण्यांत मॅक्-

स्विनीनें एक विशेष दृष्टि ठेवलेली होती, व त्या दृष्टीनें नाट्यशास्त्राचा त्यानें त्या वयापासून जो अभ्यास केला त्याचें फल पुढें त्याच्या लेखणीं-तून उतरलेल्या सरस नाटकांत स्पष्टपणें दिसून आलें. शेक्सपिअर-च्या नाटकांचा टेरीला भारी छंद असे. हॅम्लेट, मॅकबेथ वगैरे नाटकां-चीं त्यानें अनेक पारायणें केलीं, व त्या वेळचा प्रख्यात नट बेन-सन याचीं उच्च अभिनयानें ओतप्रात भरलेलीं कामें त्यानें किती वेळां पाहिलीं तरी त्याचें पोट भरेना. नाट्यशास्त्राप्रमाणेंच वाङ्मयाच्या इतर शाखांचाही त्या काळांत टेरीनें मन:पूत अभ्यास केला. डिकन्स व थॅकरे हे ग्रंथकार त्याच्या मर्जींतले होते, बहुतेक कवींच्या काव्याचें तो एखाद्या अधाशाप्रमाणें भक्षण करीत असे, आणि 'टोन' व 'मिशेल' या लेखकांपुढें तर सारें जग त्याला तुच्छ वाटे. त्यांच्या वाचनानें आयर्लंड-विषयींच्या नि:सीम भक्तीची ज्योत त्याच्या हृदयांत पेटली. या काळांत त्यानें वाचनाचा विलक्षण सपाटा चालविला होता. अनंत कल्पना, आणि विचार तो आपल्या मनांत सांठवीत होता. अनेक उदात्त तत्त्वें त्याच्या हृत्पटलावर बिंबत होतीं. त्याची मनोभूमि या वेळीं तयार होत होती असें म्हणावयास हरकत नाहीं. पुढें मोठेपणीं जें उदात्त तत्त्वज्ञान मॅक्स्विनीनें लोकांना प्रत्यक्ष कृतीनें शिकविलें व ज्या तत्त्वां-साठीं त्यानें शेवटीं मरणही पतकरलें तीं तत्त्वें या वेळीं त्याच्या मन:-क्षेत्रांत रुजत होतीं.

पण याप्रमाणें वाचनाचा व निरीक्षणाचा धडाका टेरीनें चालू ठेवला होता तरी त्यानें आपल्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केलें नाहीं. युनि-व्हर्सिटीचें पूर्ण शिक्षण संपादणें त्या दिवसांत टेरीसारख्या तरुणाला दुर्घट होतें. पण टेरीच्या निश्चयाचें बळ जबर होतें. इतर मित्रांपेक्षां ज्याच्याशीं टेरीचें अधिक रहस्य असे, व जो टेरीप्रमाणेंच स्वदेशभक्ती-च्या कल्पनांत सदासर्वदा रंगून गेलेला असे, त्या तरुणाची देखील अशी गोष्ट सांगतात, कीं शाळेंतील शिक्षणक्रम संपवून शाळेच्या दाराबाहेर

पाऊल टाकल्याबरोबर त्यानें आपलीं अभ्यासाचीं पुस्तकें दूर फेंकून देऊन 'सुटलों एकदांचा!' असे उद्गार काढून सुस्कार सोडला. त्या काळच्या साऱ्या मुलांची वृत्तीच अशी असे. कारण, त्या वेळचा अभ्यासक्रमच अशा प्रकारचा होता कीं, त्यावर जीव जडणें शक्यच नव्हतें. अभ्यास आणि तरुणांच्या मनांत स्वाभाविकपणें उत्पन्न होणाऱ्या उच्च भावना यांचा मुळींच मेळ नसल्यावर अभ्यासाविषयीं ओढा कोणाला वाटणार? अभ्यासाचा मार्ग टेरीलाही नीरस व शुष्क वाटला असला पाहिजे यांत शंका नाहीं. खडकाळ अभ्यासाचा मार्ग सोडून जिवंत वाङ्मयाच्या वातावरणांत स्वच्छंदानें विहार करण्याचा मोह टेरीला पडला नाहीं असें नाहीं. पण आपलें शिक्षण आपण पूर्ण केलेंच पाहिजे असें त्यानें मनाशीं पक्कें ठरविलें होतें व कारखान्यांतील कामाची जबाबदारी संभाळून क्रमिक पुस्तकें वाचण्याचा व कधीं युनिव्हर्सिटींत होणाऱ्या व्याख्यानांनाही हजर राहण्याचा त्यानें अटोकाट प्रयत्न केला. त्याची अभ्यासाची पद्धति जरा विलक्षण होती असें सांगतात. प्रथम प्रथम अभ्यासासाठीं तो रात्रीं जागत असे. पण तो क्रम त्याला पसंत पडेना म्हणून त्यानें निराळीच तऱ्हा अंमलांत आणली. रात्रीं आठ वाजतां निजावयाचें, व मग दोन वाजतां उठून तेव्हांपासून उजाडेपर्यंत अभ्यास करावयाचा असा परिपाठ त्यानें सुरू केला, आणि तोच त्याला सुखकारक वाटूं लागला. पहांटे काम करणेंच एकंदरींत त्याच्या प्रकृतीला मानवत असे असें म्हटलें पाहिजे. कारण पुढें मोठेपणीं देखील लिहावयाचें काम करावयाचें असलें म्हणजे तो तें पहांटेच्या प्रहरींच करी. हिंवाळ्याच्या दिवसांत पहांटे अभ्यास करावयाचा म्हणजे जवळ शेगडी ठेवण्याशिवाय गत्यंतर नसे व प्रारंभीं टेरी शेगडीच्या शेकाशींच अभ्यासाला बसे. पण शेगडीच्या उबदार सोबतीमुळें डोळ्यांवर झांपड येते व कधीं कधीं अभ्यास करतां करतां झोंप लागून पुस्तक हातांतून गळून पडतें, असें दिसून आल्यापासून टेरीनें शेगडीचा शेक बंद करण्याचें

ठरविलें. मग नुसता ओव्हरकोट घालूनच तो अभ्यासाला नेटानें बसूं लागला.

शेवटीं सन १९०७मध्यें टेरीनें युनिव्हर्सिटींतील शिक्षणक्रम पुरा केला, व बी. ए.ची पदवी संपादन केली. आतां टेरीची विद्यार्थिदशा संपली व त्यानें तारुण्याच्या प्रदेशांत पाऊल टाकलें. विद्यार्थिदशेंत त्यानें ज्या प्रकारचें आयुष्य घालविलें होतें, त्यानें त्याच्या देहाला व मनाला शिस्त लागली होती. कांहीं तरी वाचावयाचें, कांहीं तरी करावयाचें, कसा तरी वेळ घालवावयाचा अशा वृत्तीचीं माणसें आजूबाजूला सर्वत्र वावरत असतांना, टेरीनें एक विशिष्ट ध्येय डोळ्यांपुढें ठेवून आपल्या जीवनाला वळण लावून घेतलें होतें. त्याच्या शरीरांत तरुणाला साजेसें सामर्थ्य मुसमुसत होतें, त्याच्या अंतःकरणांत धर्मश्रद्धा भरून वहात होती आणि देशाभिमानाचा पीळ त्याच्या बोलण्याचालण्यांत घडोघडीं स्पष्ट दिसून येत होता. कांहीं तरी मोठें कार्य करण्यासाठीं परमेश्वरानें आपणांस निर्माण केलें आहे अशी त्याची भावना होती व अलौकिक कार्य करण्यांतच आपण आपलें आयुष्य वेंचू अशा आत्मविश्वासानें त्यानें तारुण्याचा उंबरठा ओलांडला.

प्रकरण चवथें

## चळवळीचा प्रारंभ

टेरेन्स मॅकस्विनीच्या तारुण्याला प्रारंभ झाला तेव्हां जुनी कात टाकून नवी कात धारण करणाऱ्या सापाप्रमाणें आयर्लंडची स्थिति होती. आयर्लंडच्या राजकारणाचा जुना घाट नाहींसा होता होता व तो कायमचाच नष्ट होऊन त्या राजकारणाला अगदीं नवें वळण मिळण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत होतीं. पार्लमेंटमध्यें शिरून आपल्या मागण्या ब्रिटिश लोकांकडून पूर्ण करून घ्यावयाच्या धोरणानें जुनें राजकारण चाललें होतें. पण या जुन्या पिढीचा पुढारी पार्नेल मृत्यु पावल्यानंतर त्याच्याबरोबरच दरबारी राजकारणानें आयर्लंडला स्वतंत्र करण्याच्या लोकांच्या आशा लयाला गेल्या. अर्थातच जुन्या थाटाच्या राजकारणाला कोठें फारसा थारा उरला नाहीं आणि तरुण पिढीच्या उत्साहाला वाव देणाऱ्या नव्या मार्गाची आवश्यकता भासूं लागली. देशांतील बहुतेक तरुण संसाराचा गाडा कसा बसा हांकण्यांत गुंतलेले होते. राजकारण कोणत्या दिशेनें चालवावयाचें याविषयीं विचार करण्याचा शीण ते आपल्या मेंदूला क्वचितच देत असत. परंतु, कांहीं थोडे तरुण असे होते कीं, देशांतील घडामोडींकडे त्यांचें चित्त सारखें लागलेलें असे व देशाच्या राजकारणाविषयीं त्यांना अतिशय आस्था वाटत असे. अशा तरुणांनींच त्या वेळीं डब्लिन व कॉर्क या शहरांत Celtic Literary Clubs नांवाचीं वाङ्मय मंडळें काढून स्वभाषेच्या व राजकारणाच्या चळवळींना प्रारंभ केला, व या चळवळींतूनच पुढें 'सिन फेन'चीं बीजें बाहेर पडलीं. या तरुणांपैकींच टेरेन्स मॅक्स्विनी होता. पंधराव्या वर्षी शाळेतून बाहेर पडल्यापासूनच त्याच्या राजकीय कल्पना बनत चालल्या होत्या आणि सन १८९८ मध्यें आयर्लंडमध्यें 'शतसांवत्सरिक समारंभा'ची (Centenary Celeb-

ration) गडबड उडून राजकीय प्रश्न जेव्हां सर्व लोकांच्या पुढें प्रामुख्यानें उभे राहिले, तेव्हां आपलीं राजकीय मतें अमुक प्रकारचीं आहेत असें निश्चितपणें सांगतां येण्यासारखा टेरीनें जसा आपल्या मनाशीं विचार करून ठेवला होता, तसा फारच थोडया लोकांनीं केलेला असेल. कांहीं विशिष्ट तत्त्वांना अनुसरून वागणारा 'फेनियन' लोकांचा जो राजकीय पंथ पूर्वी एके काळीं आपलें नांव गाजवून गेला होता त्यांचे अवशेष आयर्लंडांत अजूनही ठिकठिकाणीं दिसून येत होते. खुद्द कॉर्क शहरीं 'फेनियन' पंथाची जी मंडळी शिल्लक होती त्यांनीं 'जुने पहारेकरी' ( Old Guard ) या नांवाखालीं आपलें अस्तित्व कायम ठेवलें होतें. सार्वजनिक समारंभाच्या वेळीं ते हातांत हात घालून चालत असत. सन १८९८ मध्यें जेव्हां राजकीय विचारांची लाट साऱ्या आयर्लंडांत जोरानें उसळली तेव्हां याच 'फेनियन' लोकांनीं 'वूल्फ टोन मंडळ' नांवाची संस्था स्थापन करून आपल्या कार्यांत नवीन जोम आणण्याचा प्रयत्न केला. पण या मंडळांत वयस्क आणि तरुण सभासदांची विचित्र सरमिसळ झाल्यामुळें जुन्या व नव्या मतांचें घर्षण उत्पन्न झालें. तरुण सभासदांपैकीं कांहींच्या मनावर नव्या 'सोशियालिस्ट' पंथाच्या मतांची फारच छाप पडली व त्या मतांचा अहर्निश पुरस्कार व प्रसार करण्याच्या त्यांच्या हट्टामुळें शेवटीं मंडळ जवळ जवळ मोडल्यासारखें झालें. तेव्हां इतर कोणत्याही तत्त्वांच्या प्रसाराकडे लक्ष देण्याऐवजीं इंग्लंडशीं चालू असलेल्या भांडणाचा आधीं योग्य निकाल करून घेतला पाहिजे अशा मताचे जे सभासद होते त्यांनीं या मंडळांतून सन १८९९च्या सुमारास आपलें अंग काढून घेतलें, आणि 'तरुण आयर्लंड' नावांची एक नवी सोसायटी ( Young Ireland Society ) काढली. या मंडळींत टेरेन्स होता.

ही सोसायटी दोन वर्षें टिकली; पण तेवढ्या अवधींतही अनेक वेळां ती गतप्राण होण्याची वेळ आली होती. याचें कारण असें, कीं

तिच्या सभासदांत मुख्य मुख्य तत्त्वांविषयीं जरी एकमत होते तरी जुन्या 'फेनियन' पंथाचे जे अनुयायी सोसायटींत होते त्यांचें व नव्या दमाच्या आणि नव्या विचारांच्या तरुण मंडळीचें सूत जमणें शक्य नव्हतें. 'फेनियन' पंथांतील लोकांच्या मनाची एक विशिष्ट घडण घडून गेली होती. ते कोणत्याही सोसायटींत असले तरी ती पालटणें दुरापास्त होतें. आयर्लंडला स्वातंत्र्य मिळवून देण्याचें काम त्यांच्या हातून तिळभरही पार पडलें नव्हतें. उलट अपयश आलें असूनही आपल्या मतांना चिकटून राहण्याची त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति होती. आयर्लंडला स्वतंत्र करून सोडण्याची आशा त्यांच्या मनांत बिलकुल नव्हती. आपल्या स्वतःच्या हातून कांहीं होईल असें त्यांना वाटत नव्हतें व जी पिढी त्यांच्या मागून येणार होती तिच्याकडे पाहूनही त्यांना निराशाच वाटे. या कारणांमुळें या जुन्या लोकांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा पार नाहींशा होऊन गेल्या होत्या. केवळ लोकांच्या मनांत देशभक्तीच्या विझलेल्या निखाऱ्यांची धग कशी बशी कायम ठेवावयास झटलें म्हणजे आपलें काम संपलें अशा मर्यादित दरिद्री भावनेनें ते आपलें काम करीत. सन १८६७ किंवा १८९८ च्या राष्ट्रीय धांदलींत जे देशभक्त गतप्राण झाले त्यांचीं शहरोंशहरीं स्मारकें उभीं करण्याच्या सोंवळ्या चळवळीपलीकडे त्यांची दृष्टीच पोंचत नसे. उलटपक्षीं तरुण सभासदांच्या मनाला या सोंवळ्या राजकारणाची किळस आली होती. कांहीं तरी प्रचंड कार्य करण्यासाठीं ते उत्सुक झालेले होते. मातृभाषेला नवजीवन देणें, आयरिश उद्योगधंद्यांचें पुनरुज्जीवन करणें, ब्रिटिश सैन्यांत होणाऱ्या भरतीविरुद्ध लोकांत जागृति करणें, अशा प्रकारच्या चळवळींनीं फार मोठें कार्य होईल असा विश्वास त्यांच्या मनामध्यें बाणलेला होता व त्या चळवळी अंगावर घेण्यासाठीं ते अधीर झाले होते. निदान आपलीं राजकीय मतें आपण उघडपणें लोकांत बोलून दाखवावीं आणि शक्य त्या अधिकाराच्या सर्व जागा

आपण काबीज करून आपल्या मतांचा व कार्याचा जोरानें प्रचार करावा, असा त्यांचा आग्रह होता. अशा परिस्थितींत 'तरुण आयर्लंड'च्या सभासदांचें एकमेकांशीं पटणें शक्य नव्हतें. कारण, कीं जुन्या वळणानें राजकीय गोष्टींचा विचार करणाऱ्या सभासदांना वाटे, कीं प्रजासत्ताक राज्याच्या संस्थापनेसाठीं आयर्लंडनें प्रयत्न करावयाचा हें खरें, पण तसें उघडपणें न बोलतां गुप्त खलबतें, गुप्त प्रतिज्ञा, गुप्त कवाइती अशा प्रकारेंच आपण आपलें कार्य हळू हळू पुढें ढकललें पाहिजे. या मूलभूत मतभेदामुळें सन १९०१ मध्यें 'तरुण आयर्लंड' सोसायटींत फूट पडली आणि टेरी, लियॅम डि रॉइस्ट वगैरे तरुणांनीं त्या सोसायटीशीं असलेला संबंध तोडून 'मातृभाषासेवक' वाङ्मय-मंडळ' (Cork Celtic Literary Society) स्थापन केलें.

या मंडळाचा टेरी हा एक प्रमुख सभासद होता. या मंडळांत टेरीनें काय कामगिरी केली व त्याचीं मतें कशीं होतीं, याविषयीं त्याचा त्या वेळचा सहकारी लियॅम डि रॉइस्ट यानें मोठी बहारीची नोंद करून ठेवली आहे. तो म्हणतो, 'आयर्लंडच्या स्वातंत्र्यासाठीं तळमळणारा उत्तम लेखक व वक्ता म्हणून टेरेन्स आमच्या मंडळांत लवकरच पुढें आला. टोन व मिशेल या पूर्वकालीन दोन देशभक्तां-विषयीं त्याच्या मनांत पराकाष्ठेचा आदर होता. त्यांचीं आदर्शभूत चरित्रें नेहमीं डोळ्यांपुढें ठेवण्याविषयीं तो प्रत्येकाला आग्रहानें सांगत असे. त्यांतल्या त्यांत मिशेलपेक्षांही टोनविषयींची त्याची भक्ति अधिक उमाळ्याची होती. कारण टोन हा रणमर्द लढवय्या होता. आयर्लंडचा शिपाई म्हणवून घेण्याची, आयर्लंडच्या स्वातंत्र्यासाठीं झगडणाऱ्या सैन्याच्या अग्रभागीं उभें राहून रणगर्जना करण्याची, आणि वेळच आली तर स्वातंत्र्यासाठीं लढतां लढतां मरण्याची टेरेन्स मॅक्स्विनीची महत्त्वा-कांक्षा होती. त्याच्या मनाची ठेवणच शिपाईबाण्याची होती. टापटीप, कामाची झटपट, लहान सहान गोष्टींविषयींची दक्षता, शिस्तीचा

आग्रह आणि कामांतील व्यवस्थितपणा हे त्याच्या अंगचे गुण शिपायाला शोभण्यासारखे होते.'

त्या वेळीं 'मातृभाषासेवक वाङ्मयमंडळा'च्याच स्वरूपाचीं अनेक मंडळें ठिकठिकाणीं स्थापन झालीं होतीं. त्या सर्व मंडळांनीं एक मोठी कामगिरी केली ती हीं, कीं पुढें ज्या सिन फेन चळवळीचा आयर्लंडमध्यें उदय झाला तिची योग्य भूमिका त्यांनीं तयार करून ठेवली. या मंडळांत लोकांना लेख लिहिण्याचें व वादविवाद करण्याचें शिक्षण मिळालें, त्यांच्या विचारांना चलन मिळालें, आयर्लंडच्या राजकीय व सामाजिक इतिहासाच्या अंगोपांगांची चर्चा करून आपापल्या कल्पना घांसून पुसून तयार करण्याची त्यांना संवय जडली, देशाच्या सांपत्तिक स्थितीची कल्पना आली, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आपला देश कसा होता व कसा आहे, आणि आपलें कर्तव्य काय, याविषयीं त्यांच्या मनांत जागृति उत्पन्न झाली. कांहीं काळानें या मंडळांतील सभासदांची संख्या कमी झाली. नव्या गोष्टींच्या नादानें नाचण्याचा ज्यांचा स्वभाव होता त्यांना मंडळें जुनीं झाल्यानंतर त्याच्या कार्यांत विशेष उत्साह वाटेनासा झाला. वाऱ्यानें भुसा उडून जातो त्याप्रमाणें असलीं उथळ उत्साहाचीं माणसें कालगतीनें उडून जावयाचीं हा सर्वसाधारण नियमच आहे, व तो या मंडळांच्या बाबतींतही प्रत्ययाला आल्यावांचून राहिला नाहीं. पण जीं माणसें मंडळाला चिकटून राहिलीं तीं धीराचीं आणि निश्चयाचीं होतीं. कॉर्क, डब्लिन, बेलफास्ट वगैरे शहरांतील 'मातृभाषा मंडळां'चा त्या वेळचा इतिहास म्हणजे पुढें कित्येक वर्षांनीं आयर्लंडला प्रजासत्ताक राज्य मिळवून देण्याच्या झटापटींत ज्या नरवीरांनीं अग्रेसरत्व पतकरलें त्यांच्या मनाच्या व अंतःकरणाच्या तयारीचाच इतिहास होय, असें म्हणावयास हरकत नाहीं. स्वतःला एक प्रकारचें शिक्षण देण्याचाच मंडळांतील सभासदांचा मुख्यतः प्रयत्न असे हें खरें, पण सार्वजनिक कामांतही लक्ष घालण्याचा त्यांनीं कटाक्ष ठेविला होता.

त्यांची आवडती सार्वजनिक चळवळ म्हणजे सैन्यभरतीच्या विरुद्ध जागृति करणें होय. भाषणें करून, भिंतीवर मोठाल्या जाहिराती लावून आणि हस्तपत्रकें वाटून ब्रिटिश सैन्यांत होणारी आयरिश लोकांची भरती बंद करण्याची त्यांची खटपट होती. भिंतीवर, दारावर, रस्त्यांतील खांबावर, किंबहुना जेथें जागा दिसेल तेथें जाहिराती किंवा हस्तपत्रकें चिकटविण्यांत या तरुणांनीं रात्रीच्या रात्री मोठ्या हौसेनें घालवाव्या, आणि एखाद्या रविवारीं सुंदर हवा पडलेली असली म्हणजे यांनीं मजेनें एखाद्या खेड्यांत जाऊन तेथील गरीब शेतकऱ्यांत मनमोकळेपणानें मिसळून हंसत खेळत आपल्या मतांचा प्रसार करावा. या असल्या कामांत टेरी अग्रगण्य असे, आणि त्याला कंटाळा कसा तो ठाऊक नसे. यामुळें कॉर्कच्या 'मातृभाषासेवक वाङ्मयमंडळा'चा तो एक आधारस्तंभ होऊन बसला, व आपल्यांतील एक अत्यंत समयसूचक व मुद्देसूद वक्ता आणि खंदा लेखक या दृष्टीनें सर्व सभासद त्याच्यावर प्रेम करूं लागले. इतर मंडळांप्रमाणेंच याही मंडळाचें एक हस्तलिखित मासिक होतें. या मासिकांत टेरी नेहमीं कविता व लेख लिहीत असे, आणि लेखांच्या खालीं 'मॅक्-आयरिन' (एरिनचा मुलगा) अशी अर्थपूर्ण सही करीत असे. आणि या साऱ्या कामाच्या धांदलींत टेरीनें आपला वाचनाचा दांडगा व्यासंग कायम ठेवला होता, निरनिराळ्या विषयांवर त्याचे विचार चालूच होते, आणि युनिव्हर्सिटीच्या परीक्षेचा अभ्यासही तो करीतच होता.

याच सुमारास 'सिन फेन'ची चळवळ आयर्लंडमध्यें नांवारूपाला येत चालली होती. सन १८९९मध्यें आर्थर ग्रिफिथ यानें 'संयुक्त आयरिश लोक' (United Irishman) नांवाची संस्था काढली. पूर्वी निरनिराळे नांदणारे क्लब या नव्या संस्थेच्या निशाणाखालीं एकत्र झाल्यासारखे झाले, त्यांना कांहीं तरी एक सर्वसाधारण दिशा मिळाली, त्यांना धीर मिळाला, आणि त्यांच्या कार्यांत नवा जोर उत्पन्न झाला. कारण

आयर्लंड इंग्लंडपासून पूर्णपणें विभक्त झालेंच पाहिजे अशा आग्रहावर उभारलेल्या स्वराज्याच्या कल्पनेचा या संस्थेनेंच प्रथम स्पष्टपणें पुरस्कार करण्यास सुरवात केली, आणि सन १९०५मध्यें साऱ्या मंडळांचें व सोसायट्यांचें एकीकरण करून 'सिन फेन' ('आमचे आम्ही') नांवाची संस्था स्थापन करण्यांत आली, व तिच्या कार्यकारी मंडळाला 'राष्ट्रीय कौन्सिल' ( National Council ) असें नांव देण्यांत आलें. या चळवळीनें आयर्लंडचें पाऊल पुष्कळच पुढें पडलें, व नंतर तें मागें कधींच हटलें नाहीं. तसें तें हटणें शक्यच नव्हतें. कारण निश्चित ध्येय पुढें ठेवून निश्चित धोरणानें चळवळ करणारा 'सिन फेन' पक्ष उदयाला आला होता. त्याचें कार्य गुप्तपणानें नव्हे तर उघड उघड चालावयाचें होतें, त्याचें धोरण धीटपणाचें व स्पष्ट होतें, आणि पार्लमेंट-मध्यें शिरून सुधारणा मिळविण्याच्या नादीं लागलेल्या जुन्या राजकीय पंथाशीं चार हात करून आपलें वर्चस्व स्थापण्यासाठीं तो दंड थोप-टून आखाड्यांत उतरला होता.

कॉर्क शहराच्या सोसायटींतील आपलें काम टेरीनें अव्याहत चालूं ठेवलें होतें. आतां त्याच्या विचारांना स्पष्ट स्वरूप प्राप्त झालें होतें, व त्याच्या कल्पना सडेतोड बनल्या होत्या. सुराज्य वगैरे साऱ्या कल्पना फोल असून आयर्लंडमध्यें पूर्ण प्रजासत्ताक राज्यच स्थापलें पाहिजे असें त्याचें ठाम मत बनलें होतें. स्वातंत्र्यासाठीं इंग्लंडशीं युद्ध कर-ण्याची देखील कदाचित् आयर्लंडवर पाळी येईल असें त्याला वाटत होतें, आणि तसा प्रसंग आल्यानंतर युद्धाला उभें राहण्याइतकें आय-रिश लोकांचें कोणतेंही पवित्र कर्तव्य नाहीं अशी त्याची खात्री झाली होती. त्याचप्रमाणें राजकारणांतील कोणतीही गोष्ट गुप्तपणें, लपून छपून, अंधारांत होतां कामां नये असा त्याचा कटाक्ष होता. प्रत्यक्ष युद्धाची तयारी देखील भर दिवसां, शत्रूला सांगून सवरून केली पाहिजे अशा मताचा तो होता. 'आयरिश प्रजासत्ताक भ्रातृमंडळ'

नांवाची जी एक संस्था त्या वेळीं होती, तिच्यांत टेरी कधींच शिरला नाहीं; कारण त्या संस्थेंत सभासदांना गुप्त आणाशपथा घ्याव्या लागत. असल्या आणाशपथांच्या धाग्यांनीं एका दाव्याला बांधलेल्या लोकांच्या हातून कोणतेंही महत्त्वाचें कार्य होणें शक्य नाहीं अशी टेरीची पुरी खात्री होती. गोप्यगोपनाचा प्रकार त्याला किळसवाणा वाटे, व तो कधींही फलदायी होणार नाहीं असें तो नेहमीं प्रतिपादन करी. उघड उघड शस्त्रसामुग्री जमविण्यास व कवाइती करण्यास आपण सुरवात केली तर इंग्लंड ताबडतोब आपली चळवळ मारून टाकील म्हणून गुप्तपणेंच कार्य करणें प्राप्त आहे, असें कोणी प्रतिपादन केलेलें त्याला कधींही पटत नसे. धीर न सोडतां आपण आपली तयारी सारखी चालू ठेवली, कीं आपल्याला सोयीची संधि येईलच येईल, असें तो म्हणे व तशी संधि येईपर्यंत आशा न सोडतां तयारी करीत राहणें हेंच प्रत्येकाचें कर्तव्य आहे असें तो सांगे. केव्हां तरी आपल्याला रणांगणावर उभें रहावें लागणारच अशा भावनेनें आपली सर्व प्रकारची तयारी करून ठेवणाऱ्या सैनिकाप्रमाणें प्रत्येक आयरिश मनुष्यानें वागलें पाहिजे अशा मताचा तो होता. 'प्रसंग केव्हां येईल तें माहित नाहीं. किंबहुना, प्रसंग केव्हां येईल त्याचा नियम नाहीं. प्रसंगासाठीं तयारी ठेवणें—अगदीं जय्यत तयारी ठेवणें—हेंच आज तुमचें कर्तव्य आहे. करण्यासारखें किती तरी काम आज आयर्लंडांत पडलेलें आहे. तें काम कोणतें तें मीं तुम्हांला सांगावयास कां पाहिजे? जा, आपआपल्या घरीं जा, आणि तयारीला लागा!' हे जॉन ओलीअरी याच्या एका व्याख्यानांतील उद्गार त्याला फार मार्मिक वाटत. त्या उद्गारांतील तत्त्व त्याला मनापासून प्रिय होतें, त्या तत्त्वानुसार तो स्वतः वागे आणि लोकांनीं वागावें अशी त्याची इच्छा असे.

स्वभाषेच्या चळवळीचें महत्त्वही टेरीच्या मनावर पूर्ण बिंबलें होतें. प्रथम प्रथम त्या चळवळींत त्याचें विशेष मन नव्हतें. पण सर्व गोष्टींचा

सांगोपांग विचार केल्यानंतर त्या चळवळीचें रहस्य त्याला पटलें. असल्या चळवळीची देशाला फार जरूर आहे अशी त्याची खात्री पटली आणि मातृभाषेंत आपली स्वतःची तयारी फारशी नाहीं हा विचार त्याच्या मनाला त्रास देऊं लागला. आपल्या तयारींत कांहीं उणेपणा राहिलेला त्याच्या स्वभावाला खपणें शक्यच नव्हतें. स्वभाषेचा चांगला अभ्यास करावयास वेळ मिळावा म्हणून त्यानें कांहीं दिवस सोसायटीचें काम हातावेगळें केलें. मातृभाषेचें पूर्ण अध्ययन केल्यानंतर जनतेचें पुढारी-पण पतकरावें असें त्याला वाटलें. म्हणून यानंतरचीं कांहीं वर्षें आयरिश भाषेचा अभ्यास व लेखनव्यवसाय करण्यांत त्यानें घालविलीं.

प्रकरण पांचवें

## कवि आणि नाटककार

टेरेन्स मॅक्स्विनीच्या लेखनाचा प्रारंभ त्याच्या बालपणींच झाला होता. ख्रिस्ती बंधूंच्या शाळेंत असतांनाच त्याची वाङ्मयविषयक आवड निदर्शनास आली होती व कवितादेवीच्या प्रांगणांत एखादें चोरटें पाऊल टाकण्याला त्यानें त्याच वेळीं सुरवात केली होती. त्यांची जी पहिली कविता प्रसिद्ध झाली तिच्यावरून पहिलें तर त्या वयांत देखील वाङ्मयाचें अंतरंग व बहिरंग याविषयीं टेरीनें पुष्कळ विचार केला होता असें स्पष्ट दिसून येतें. 'सेंट पॅट्रिक्स' नांवाचें त्यावेळीं जें वर्तमानपत्र होतें त्यांत ही कविता प्रसिद्ध झाली होती व कवितेवर कवीनें आपलें खरें नांव न घालतां एक टोपणनांव घातलें होतें. पण या कवितेचा इतका बोलबाला झाला कीं, संपादकानें कांहीं दिवसांनीं ती पुन्हां छापली आणि तिच्याविषयीं प्रशंसापर थोडा संपादकीय मजकुरही लिहून, कवीचें पूर्ण नांव व पत्ता देखील कवितेखालीं छापला. त्या कवितेचें नांव 'निसर्गस्तोत्र' ( Nature's Hymn ) असें होतें. वायू, नद्या, पक्षी वगैरे सृष्टिदेवीच्या राज्यांतील सारी प्रजा पूर्ण स्वतंत्र आहे, त्यांचा अहर्निष स्वच्छंद विहार चालला आहे, आणि त्यांतच त्यांना परमानंदाचा अनुभव मिळत आहे, पण दुर्दैवी आयर्लंड मात्र स्वतंत्र नाहीं—असा त्या कवितेचा विषय होता. बालवयांत मॅक्स्विनीच्या लेखणींतून बाहेर पडलेली ही कविता पुढें लोकमान्य पुढारी म्हणून साऱ्या आयर्लंडांत विख्यात झालेल्या मॅक्स्विनीला साजेशीच होती.

ही लहानपणची गोष्ट झाली. पुढें 'मातृभाषासेवक वाङ्मय मंडळां'त लेखनवाचनाच्या व्यवसायाच्या बाबतींत टेरेन्स निःसंशयपणें सर्वांहून श्रेष्ठ होता. लेखनकौशल्य त्याच्या अंगीं स्वाभाविकच होतें, व या देवदत्त देणगीचा पूर्ण विकास करण्यास ज्या परिश्रमांची जरूरी

असते तें करण्याची त्याला हौसही होती. मंडळांच्या हस्तलिखित मासिकांतील बहुतेक लेख टेरीचे असत. कविता, छोटे निबंध, धांवतीं शब्दचित्रें लिहिण्याचा त्यानें सपाटा लाविला होता. शिवाय सणसणीत टीका करण्यांतहीं त्यानें आपली लेखणी हलके हलके तरबेज केली. फलाण्या लॉर्ड लेफ्टनंटला मानपत्र, राजेसाहेबांची धूळभेट, एखाद्या सार्वजनिक संस्थेनें सरकारच्या रोषाला भिऊन केलेली भ्याड गोष्ट, आयर्लंडच्या स्वातंत्र्याविरुद्ध वरळणाऱ्या एखाद्या वक्त्याचें व्याख्यान, आयर्लंडच्या महत्त्वाकांक्षेची हेटाळणी करणारा एखादा नाट्यप्रयोग, किंवा एखाद्या लांगूनचालनमग्न वर्तमानपत्रांतील मूर्खपणाचें विधान, असे कांहींना कांहीं प्रसंग नेहमीं उपस्थित होत असत, व त्यावेळीं मॅक्स्विनीच्या टीकेचा प्रतोद त्या त्या व्यक्तींचा चांगला खरपूस समाचार घेत असे. आयर्लंडखेरीज दुसऱ्या कोणत्याही विषयावर तो कधीं कविता करीत नसे. स्वातंत्र्याच्या युद्धाचे पोवाडे गाण्यांतच त्याच्या काव्यविषयक स्फूर्तीला आनंद वाटे. या अवधींत टेरेन्सनें केलेल्या कविता पुढें सन १९०७ सालीं संकलित स्वरूपांत 'स्वातंत्र्यसंगीत' ( The Music of Freedom ) या नांवानें प्रसिद्ध झाल्या. या पुस्तकांत निरनिराळ्या वृत्तांत रचलेलीं अनेक मधुर वीणाकाव्यें आहेत. पुस्तक प्रसिद्ध झालें त्यावेळीं त्यावर नुसतें 'बीजारोपी' ( Cuire-adoir ) असें कवीचें नांव छापलें होतें; पण खरा कवि कोण याविषयीं निदान कॉर्क शहरांतील माणसांना तरी संशय नव्हता.

टेरेन्स मॅक्स्विनींच्या लेखनव्यवसायाची हकीगत या प्रकरणांत चालू आहे तेव्हां कालक्रम ठेवून दर प्रकरणांत ती थोडी थोडी देण्यापेक्षां याच ठिकाणीं ती एकसूत्रानें देणें बरें. यांत थोडासा कालक्रमाचा भंग होईल. पण तो झाला तरी विशेष हानि नाहीं. उलट टेरेन्सच्या लेखनव्यासंगाची एकसूत्री कल्पना वाचकांस येईल. सन १९०७ नंतर थोड्याच दिवसांनीं 'कॉर्क नाट्यसमाज' कॉर्क शहरीं

निघाला. नाटकें करणाऱ्या इतर कंपन्यांत भर घालण्याच्या क्षुद्र उद्देशानें हा समाज निघाला नव्हता. केवळ रंगभूमीवर नाचण्यापेक्षां अधिक उंच उद्देश समाजाच्या लोकांनीं आपल्यापुढें ठेवला होता. नाटकें कोणत्या प्रकारचीं लिहावीं याचा लोकांना कित्ता घालून देण्याची या लोकांची महत्त्वाकांक्षा होती. समाजाच्या ध्येयाला अनुसरून समाजासाठीं मुद्दाम लिहिलेल्या नाटकाखेरीज दुसरें कोणतेंही नाटक करावयाचें नाहीं असा त्यांनीं पहिल्यापासून कटाक्ष ठेवला होता, व भावी कालांत वाङ्मय क्षेत्रांत उच्च स्थान पटकाविण्याइतक्या तोलाचें नाटक असेल तरच तें हातीं घेण्याचें त्यांनीं धोरण बांधलें होतें. टेरेन्स या नाट्यसमाजांत होता व समाजाच्या कामांत त्याचें मन रंगून गेलें होतें. स्वातंत्र्याच्या भावना उद्दीपित करण्यास वाङ्मयासारखें दुसरें साधन नाहीं असा त्याचा दृढ विश्वास होता, आणि लोकांच्या हृदयाला झटकन स्पर्श करण्याची शक्ति नाटकाप्रमाणें वाङ्मयाच्या दुसऱ्या कोणत्याही शाखेंत नाहीं अशी त्याची खात्री होती. तो म्हणे गतकालचा वैभवपूर्ण इतिहास नाट्यप्रयोगांत रंगवून जिवंत स्वरूपांत लोकांच्या डोळ्यांपुढें उभा करा, त्यांच्याच देशांत पूर्वीं होऊन गेलेल्या नरवीरांचीं चरित्रें त्यांना दाखवा, कीं लोकांच्या अंतःकरणांत उजेड पडलाच पाहिजे, त्यांचे डोळे साफ उघडलेच पाहिजेत, आणि त्यांना स्वातंत्र्याची तळमळ लागलीच पाहिजे.

अशी त्याची दृढ भावना असल्यामुळें आपण नाट्यप्रयोग लिहावेत असें त्याला वाटूं लागलें. कोणतेंही काम करावयाचें म्हणजे व्यवस्थितपणें व मोठ्या शिस्तीनें करावयाचें हा त्याचा स्वभावधर्मच होता व त्याला अनुसरूनच त्यानें याही कामास प्रारंभ केला. त्यानें जीं कामें अगोदरच अंगावर घेतलीं होतीं त्यांच्यांत विशेष व्यत्यय येऊं न देतां नाट्यशास्त्राच्या निरनिराळ्या संप्रदायांचा त्यानें लक्षपूर्वक अभ्यास केला आणि बरेचसे टीकाग्रंथही वाचले. नाटकांचें

व टीकाग्रंथांचें वाचन त्यानें वरवर केलें नाहीं. जे मुद्दे त्याला महत्त्वाचे वाटले त्यांवर खुणा करून त्यांचें त्यानें पूर्ण परिशीलन केलें. अशी पूर्व तयारी केल्यानंतर कांहीं नाटकांच्या कथानकांचीं त्यानें टांचणें केलीं. हीं सारीं कथानकें त्यानें आयर्लंडच्या जुन्या वाङ्मयांतून घेतलीं होतीं. या कथानकांना गद्यापेक्षां पद्य वेष देणें अधिक उचित व परिणामकारक होईल असें त्याचें मत होतें. पद्यावर त्याचें प्रभुत्व होतें. त्याची बहुतेक कविता निर्यमक असे, तींत विविधता आणि स्फूर्तिदायक भावना भरलेली असे व ती गद्याइतकीच सहज व जलद तो लिहीत असे. शेवटीं त्याचें पहिलें नाटक पुरें तयार झालें. 'कूलचा अखेरचा संग्राम' ( The last warriors of Coole ) असें त्या नाटकाचें नांव होतें. अपयशानें पांगलेल्या कूलच्या योद्धयांची फिऑननें केलेली सुटका हा नाटकाचा विषय होता. खरा लढवय्या कधींही शरण जात नाहीं, यशाची यत्किंचितही आशा उरली नसली तरी देहपतन होईपर्यंत तो लढत रहातो, हें उदात्त तत्त्व लोकांच्या मनावर बिंबविण्याचा नाटकाचा उद्देश होता. सन १९१० च्या नोव्हेंबर महिन्यांत हें नाटक रंगभूमीवर आलें. 'कॉर्क नाट्यसमाजा'नें रंगभूमीवर आणलेला हा पहिला कविताबद्ध प्रयोग होता, व जनतेकडून त्याचें उत्साहपूर्वक स्वागत झालें. प्रेक्षकांना नाट्यप्रयोग इतका आवडला, कीं नाटककर्त्याला एकदां स्टेजवर आणा म्हणजे आम्ही त्याचा सन्मान करतों असा त्यांनीं एकच ओरडा केला. पण टेरेन्स कांहीं केल्या पुढें झाला नाहीं. सन्मानाच्या समारंभापासून तो नेहमींच दूर पळत असे.

त्याच सालीं डिसेंबर महिन्याच्या २७ तारखेला त्याचें दुसरें एक नाटक रंगभूमीवर आलें. या नाटकांत टेरेन्स मॅक्स्विनीचे नवीनच गुण लोकांच्या निदर्शनाला आले, व ते पाहून प्रत्यक्ष नाट्यसमाजांतील लेखकांना व नटांनाही अत्यंत आश्चर्य वाटलें. पहिल्या नाटकाहून हें नाटक कथानक, रस, स्वभावचित्रें वगैरे सर्व बाबतींत भिन्न

होतें. या नाटकांत मॅक्स्विनीनें एका विपद्ग्रस्त कुटुंबाची करुणाजनक स्थिति दाखविली होती. एका अत्यंत दरिद्री कुटुंबांत आई, बाप व काळोच्या तडाख्यांतून राहिलेली एकच मुलगी. अशीं माणसें असतात. बाप बेकार झालेला असतो, व मुलगी जवळ जवळ मृत स्थितींत अंथरुणावर पडलेली असते. आपल्या शक्तीप्रमाणें काम करून संसाराच्या फाटक्या गोधडीला ठिगळें लावण्याची आई शिकस्त करीत असते, आणि नवऱ्याच्या कष्टी मनाला धीर देत ती कसे बसे दिवस कंठीत असते. एका धर्मोपदेशकाला त्या असहाय्य कुटुंबाची करुणा येते आणि थोडेंसें वस्त्रप्रावरण आणि अन्न विकत घेण्यासाठीं तो त्यांना पैसे देतो. ते पैसे घेऊन आई बाजार करावयास जाते, आणि येतांना डॉक्टरला घेऊन येते. त्याच्या द्रव्यमय दृष्टीला त्या कुटुंबाचे हाल दिसत नाहींत. त्याच्या अंतःकरणांत दयेचा लेश देखील उत्पन्न होत नाहीं. व इतर रोग्यांना तपासण्याची सबब सांगून तो निर्दयपणें निघून जातो. इतक्यांत कामाच्या शोधार्थ बाहेर गेलेला बाप वणवण भटकून हात हालवीत परत येतो. अशी संकटांची परमावधि झालेली असतांनाच मुलीचा प्राण जातो. आणि शेवटचा पडदा पडून नाटक संपतें.

या नाटकाचा प्रयोग चालू असतांना प्रेक्षकवर्गामध्यें विलक्षण शांतता नांदत होती, व रंगभूमीवर दिसणाऱ्या दृश्याकडे प्रत्येकजण अगदीं श्वास आंवरून धरून पहात होता. कारण आयर्लंडांतील प्रत्यक्ष परिस्थितीचें तें अगदीं हुबेहूब चित्र होतें. रंगभूमीवर पात्रांच्या तोंडून बाहेर पडणारे शब्द चोहोंकडे नेहमीं ऐकूं येणारे होते, रंगभूमीवर दिसणारा धर्मोपदेशक कोणत्याही गांवच्या देवळांत आढळण्यासारखा होता. निर्दय डॉक्टराच्या भूमिकेनें भोंवतालच्या डॉक्टरांची चांगलीच आठवण होत होती. रंगभूमीवरचा कामकरी पाहतांना कॉर्क शहरांत हिंडणाऱ्या कामकऱ्यांपैकींच एखादा आपण पहात आहोंत असा भास होत होता. सारांश, तें नाटक आयरिश संसाराचें प्रतिबिंब होतें.

मॅक्स्विनीच्या दुसऱ्या नाटकापेक्षां तिसऱ्या नाटकानें लोक अधिक आश्चर्यचकित झाले. 'व्यवहाराचा बुरखा' ( Manners Masketh Man ) असें त्या नाटकाचें नांव होतें, नाटकांत एकच पुरुष पात्र व चार स्त्री पात्रें होतीं, व त्यामुळें नाटकांच्या विनोदांत भर पडली होती. इतकें विनोदी नाटक मॅक्स्विनीच्या लेखणींतून बाहेर पडलें तरी कसें असा सर्वांना विस्मय वाटला. बाकी वास्तविक पाहतां, या गोष्टीचें इतकें आश्चर्य करण्याचें कारण नाहीं. त्यांच्या स्वभावांत गंभीरणाची छटाच फार होती, आणि गंभीर स्वरूपाचे विचार करण्यांतच त्याचें मन सदासर्वदा गुंतलेलें असे हें खरें. पण याचा अर्थ त्याला विनोदाचें मर्म समजत नव्हतें, किंवा तो कधींही विनोद करीत नसे असा थोडाच होता ? उलट, वरून दिसावयास गंभीर आणि शुष्क पण आंत विनोदाच्या जिवंत झऱ्यानें ओलावलेल्या स्वभावाच्या मोठमोठ्या लेखकांचीं उदाहरणें कांहीं थोडीं नाहींत !

आतांपर्यंतचीं मॅक्स्विनीचीं नाटकें एकांकी होतीं. पहिलें नाटक कवितावद्ध होतें, व पुढचीं दोन व्यवहारांत चालू असलेल्या भाषेंत लिहिलीं होतीं. यापुढच्या नाटकांत मॅक्स्विनीनें पूर्वीपेक्षांही उंच भरारी मारण्याचा प्रयत्न केला. याही नाटकाचें संविधानक प्राचीन इतिहासांतून निवडून काढलेलें होतें. यांतील नायिका एमर ही वीरवृत्तीची होती, व कुचुलेन नांवाच्या वीरावर तिचें प्रेम जडलें होतें. प्रियकरानें रणांगणावर जाऊन आपल्याला विरह दुःखांत लोटूं नये म्हणून त्याच्या गळ्याभोंवतीं मिठी घालून त्याला समरपरावृत्त करणाऱ्या स्त्रियांपैकीं एमर नव्हती. उलट समरांगणांत उडी टाकावयास प्रेमामुळें कचरणाऱ्या पतीला धैर्यानें प्रोत्साहन देणारी ती वीर स्त्री होती. इतकें असून तिच्या अंगीं विनय होता, आणि ती संसारदक्ष होती. आपल्या प्रियकराशीं लग्न करण्यासाठीं तिला प्रत्यक्ष पित्यापासूनही वेगळें व्हावें लागलें, पण ही गोष्ट तिनें धैर्यानें केली. असली नायिका मॅक्स्विनीनें पसंत केली असल्यास नवल तें काय ?

सन १९१४ मध्यें मॅक्स्विनीचें 'क्रांतिकारक' ( The Revolutionist ) नांवाचें पांच अंकी नाटक बाहेर आलें. त्यावेळची परिस्थिति लक्षांत घेतली म्हणजे त्या नाटकाचें मर्म चटकन् समजेल. नाटक बाहेर पडलें तेव्हां महायुद्धाचा वणवा पेटलेला नव्हता. ॲस्किथचें होमरूल बिल कॉमन्सच्या सभेपुढें होतें आणि त्या बिलाला लवकरच कायद्याचें स्वरूप येऊन त्याची अंमलबजावणी आयर्लंडांत सुरूं होणार होती. कॉमन्स सभेंत बिल पास होईल व त्यावर राजाची सही होईल याविषयीं कोणालाही संशय वाटत नव्हता. अशा परिस्थितींत होमरूल बिल पास झालें आहे व आयर्लंड होमरूलचा प्रत्यक्ष उपभोग घेत आहे अशा कल्पनेची पार्श्वभूमी घेऊन मॅक्स्विनीनें आपलें हें नवें नाटक लिहिलें. या नाटकांत त्यानें प्रामुख्यानें दर्शविलेली गोष्ट ही कीं, आयर्लंडांत होमरूलचा अंमल सुरू झाला म्हणजे कांहीं जिकडे तिकडे रामराज्य होईल असें नव्हे. होमरूल मिळालें तरी खुषमस्करे, लाळघोटे लोक देशांत राहतीलच, आणि चालू राज्यव्यवस्थेला कंटाळून नव्या पद्धतीचे मनोरे रचणारे लोक व क्रांतिकारक चळवळेही कायम राहतील.

या नाटकांतला नायक क्रांतिकारक आहे. होमरूल बिलानें अस्तित्वांत आलेल्या राज्यपद्धतीनें त्याला मुळींच समाधान झालेलें नाहीं. उलट, राजकारणांतील पूर्वीचे ढोंगाचे सारे प्रकार चालूच आहेत हें पाहून परिस्थिति सुधारण्यासाठीं तो सारखा झगडत आहे. ज्यांच्या मदतीवर तो विसंबून होता, त्यांपैकीं पुष्कळजण होमरूलनें उत्पन्न केलेल्या मोहक अधिकाराच्या जागा पटकावण्यांत कार्य विसरून जाऊन त्याच्यापासून दूर सरलेले आहेत. आपला संसार थाटण्यांत, पोराबाळांचीं लग्नें लावण्यांत, पैसा कमावण्यांत आणि घरेंदारें बांधण्यांत ते इतके मग्न झालेले आहेत, कीं त्यांना देशकार्याची क्षणभरही आठवण होत नाहीं. विश्वासाची ज्योति ज्यांच्या अंतःकरणांत तेवत आहे असे मूठ-

भरच लोक त्याच्या भोंवतीं उरलेले आहेत, आणि शत्रूच्या सैन्यापुढें आपलें बळ तोकडें पडतें असें दिसून आल्यावर सैरावैरा पळणाऱ्या शिपायांना आंवरून धरण्याप्रमाणेंच या मूठभर लोकांना कार्यरत ठेवणें अत्यंत दुरापास्त असल्याचा त्याला कडू अनुभव येत आहे. त्याचें कार्य अत्यंत कठीण होऊन बसतें, इकडून तिकडे असा तो सारखा धांवपळ करीत असतो, आणि आपल्या अनुयायांना उत्तेजन देण्याची व कोसळणाऱ्या कार्याचा डोलारा सांवरून धरण्याची तो शिकस्त करीत असतो. शेवटीं त्याच्या देहांत सामर्थ्य उरत नाहीं, व त्याचा अंत होतो.

या नाटकाची एक विशेष गोष्ट ही कीं, यांतील क्रांतिकारक नायक म्हणजे स्वतः मॅक्स्विनीच होय असा नाटक वाचतांना किंवा पाहतांना सारखा भास होतो. आपलेंच चित्र लोकांच्या डोळ्यापुढें उभें करण्याची मॅक्स्विनीची इच्छा होती असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे. परंतु तसें असेलसें वाटत नाहीं. याचें मुख्य कारण असें कीं, मॅक्स्विनीचा तसा प्रयत्न असता तर इतकें हुबेहुब उत्तान साम्य न वठवितां त्यानें त्यांत कांहीं तरी खुबीदार आडपडदा राखलाच असता. क्रांतिकारक मनोवृत्तीच्या वीराचें चित्र रंगविण्याचा मॅक्स्विनीचा मुख्य उद्देश होता. तें रंगवितां रंगवितां त्याच्या हातून नकळत अशा कांहीं रीतीनें कुंचला फिरला, कीं त्याच्या स्वतःच्याच स्वभावाची छटा त्यांत लोकांना दिसूं लागली. मात्र इतकें खरें, कीं त्या नाटकांतील नायकाची तडफ, मनमोकळेपणा, विचारशीलता आणि अपूर्व स्वार्थत्याग हीं सर्व मॅक्स्विनीच्या अंगच्या गुणांचीं हुबेहुब प्रतिबिंबें आहेत. पुढें क्रांतिकारक कार्य करतांना मॅक्स्विनीच्या तोंडांतून हरप्रसंगीं जे उद्गार निघाले तेच नेमके या नाटकांतील नायकाच्या तोंडीं घातलेले दिसून येतात. 'पूर्ण निर्भेळ स्वातंत्र्य मिळाल्याखेरीज शांतता नांदणें शक्य नाहीं', 'हा संसार म्हणजे एक धाडस आहे, आणि ज्याचा आत्मविश्वास सर्वांत प्रखर आहे तोच अघाडी मारील', 'पुढें काय होईल म्हणून तूं भितोस—?—मला तर

त्याचें कांहींच वाटत नाहीं' वगैरे नायकाच्या तोंडचीं वाक्यें प्रत्यक्ष मॅक्स्विनीच्या तोंडचीं आहेत असा संभ्रम अनेक वेळां उत्पन्न होतो, आणि नाटकांतील नायक मरून पडल्यानंतर 'यांच्या शवावर आच्छादन घालूं नका. यांचा हा चेहरा लोकांना पोटभर पाहूं द्या म्हणजे जिवंतपणीं नाहीं तर निदान मरायच्या वेळीं तरी आपण यांच्यासारखें व्हावें अशी स्फूर्ति लोकांच्या मनांत उत्पन्न होईल' हे त्याच्या चेहऱ्याकडे पाहून नायिकेनें काढलेले उद्गार, स्वतः मॅक्स्विनी मृत्युवश झाल्यावर त्याच्या विलक्षण मुद्रेकडे पाहतांना प्रत्येकाच्या ओठांवर आले होते हें कोण नाकबूल करील?

प्रकरण सहावें

# नव्या दिलाचे नवे शिपाई

'मातृभाषासेवक वाङ्मयमंडळा'चें काम सोडून स्वतःची तयारी करण्यासाठीं कांहीं काल मागें राहून अभ्यासांत घालविण्याची मॅक्स्विनीला जी बुद्धि झाली ती जणूं काय ईश्वरी प्रेरणेनेंच झाली असें पुढील वर्षांच्या इतिहासाकडे पाहिलें असतां वाटूं लागतें. कारण पुढें आयरिश स्वयंसेवकांची जी चळवळ निघाली तिचें भविष्य आधींच वर्तवून जरी कोणी तें मॅक्स्विनीला सांगितलें असतें तरी त्यानें अगोदरचीं हीं वर्षें याच रीतीनें स्वतःची तयारी करण्यांत घालविलीं असतीं. पुढील वर्षांत गोष्टी अशा घडत गेल्या, कीं कॉर्क परगण्यांत स्वयंसेवक गोळा करण्याचें काम त्याच्याकडे आलें, आणि त्या कामीं ज्या दोन गोष्टी अत्यंत जिव्हाळ्याच्या महत्त्वाच्या होत्या त्याच नेमक्या करण्यांत दैवयोगानें त्यानें मध्यंतरींचा हा काळ घालविला. एक तर, आयरिश भाषेचें महत्त्व त्याला पूर्णपणें पटलें व तिचा अभ्यास करण्याचें काम त्यानें अगदीं अंतःकरणपूर्वक केलें. या सुमारास 'गेलिक लीग' नांवाची भाषाविषयक संस्था चांगली नांवारूपाला आलेली होती, लोकांना तिच्या कार्याची उपयुक्तता पटलेली होती, आणि तिच्या मार्फत प्रत्येक शहरांत आणि बऱ्याचशा खेड्यांतदेखील आयरिश भाषेच्या अभ्यासाचे वर्ग चाललेले होते. या संस्थेची कॉर्क शहरांत जी शाखा होती तींत टेरीनें आपलें नांव दाखल केलें, आणि त्या भाषेच्या अध्ययनाकडे त्यानें आपलें सर्व लक्ष वेधलें. नुसतें वर्गांतील ज्ञान संपादन करून टेरीचें मन तृप्त झालें नाहीं. त्यानें आणखी एक पाऊल पुढें टाकलें. त्यानें असा विचार केला, कीं आपल्या मातृभाषेंत पुरें प्राविण्य आपल्याला संपादन करावयाचें असेल, आणि लेखनांत व वक्तृत्वांत खरें प्रभुत्व मिळवावयाचें असेल तर, ज्या ठिकाणीं ती भाषा साध्या, अकृत्रिम व व्यावहारिक

मॅ.... ३

स्वरूपांत लोकांच्या जिभेवर नाचते त्या ठिकाणीं आपण गेलें पाहिजे. या विचारानेंच त्यानें आठवड्यांतून एखादा दिवस व सुटीचे दिवस बॅलिंजिअरीच्या आसपासच्या खेड्यापाड्यांत व कॉर्क परगण्याच्या पश्चिमेकडील भागांत घालविण्यास सुरवात केली. त्या ठिकाणीं लोकांच्या रोजच्या व्यवहारांत आयरिश भाषा वापरली जात असे, आणि खेरीज शुद्ध आयरिश संस्कृतीचें स्वरूप दाखविणारा पिढ्यान् पिढ्या तोंडपाठ चालत आलेला केवढा तरी वाङ्मयनिधि त्या खेड्यापाड्यांत सांपडण्यासारखा होता. बॅलिंजिअरीच्या आसपासच्या प्रदेशांत हिंडतांना टेरीच्या जिवाला अवर्णनीय समाधान वाटे. खेड्यापाड्यांतील लोकांत मिसळून त्यांच्याशीं गप्पागोष्टी करतांना, त्यांच्याशीं वादविवाद व हितगुज करतांना आणि त्यांना माहीत नसलेल्या गोष्टी त्यांना समजावून देतांना आपल्या जिवाला जें सौख्य पाहिजे तेंच मिळालें असें त्याला वाटे. आयरिश भाषेंत तो अधिकाधिक तरबेज होत चालला तसतसा कृत्रिम बंधनांनीं जखडलेला आपला मूळ आयरिश आत्मा अधिकाधिक स्वतंत्र होऊं लागल्यासारखें त्याला वाटूं लागलें. खेड्यापाड्यांत अनुभवास येणाऱ्या आयरिश संस्कृतीचा ज्यास्त ज्यास्त निकट स्पर्श होतांच आपण अधिक बलवान् झालों, अधिक आयरिश रक्त आपल्या नसांत खेळूं लागलेसें त्याला वाटलें. त्या खेड्यांतील माणसांनाही चुकून शहरच्या हवेंत गेलेला आपला एक जिवलग स्नेही आपल्यांत परत येऊन मिळाला असें वाटून आनंद होत असे. टेरी प्रथम इंग्रजी भाषा शिकला हें खरें, व त्याचें सारें लहानपण शहरांत गेलें हेंही खरें. पण ज्या कॉर्क शहरांत तो लहानाचा मोठा झाला त्याच्या नजीक खेडीं पसरलेलीं असल्यामुळें जुन्या आयरिश भाषेचा ध्वनि त्या शहराच्या कानांत नेहमीं घुमत होता; आणि त्याचा निसर्गदत्त मूळ स्वभावही इंग्रजीपेक्षां आयरिश भाषा बोलण्यास अधिक योग्य होता. त्याचा साधेपणा व सडेतोडपणा आयरिश भाषा बोलणाऱ्या शेतकऱ्याला साजेल असा होता,

त्या शेतकऱ्यांच्या स्वभावांतील विनयसंपन्नता त्याच्या अंगीं होती, आणि श्रद्धायुक्त अंतःकरणाच्या बाबतींत मॅक्स्विनी व ते शेतकरी अगदीं सारखे होते. आयरिश शेतकऱ्यांची विशेष गोष्ट ही आहे, कीं एखाद्या गोष्टीवर त्यांची श्रद्धा बसली म्हणजे मग अमुक असें कां, तमुक तसें कां असले प्रश्न ते कधीं विचारणार नाहींत, सरळ काम करीत राहतील. आणि श्रद्धा हा आयुष्याचा खरा पाय होय असें म्हणणाऱ्या माणसांपैकींच मॅक्स्विनीही होता. या कारणानें थोड्याच अवधींत मॅक्स्विनीनें केवळ त्या शेतकऱ्यांची भाषा पूर्णपणें आपलीशी केली; इतकेंच नव्हे, तर त्यांचीं अंतःकरणेंही त्यानें कायमचीं काबीज करून घेतलीं. हा काळ मॅक्स्विनीनें परम सुखांत घालविला आणि योगायोग असा, कीं त्याच्या शिरावर पुढें येणाऱ्या जबाबदारीच्या कामगिरीस जरूर असणारी तयारीही याच काळांत त्यानें नकळत उत्तम प्रकारें केली.

याप्रमाणेंच पुढील कामगिरीसाठीं भूमिका तयार करून ठेवणारी दुसरी एक गोष्ट केवळ योगायोगानें घडून आली ती ही, कीं त्याची कारखान्यांतील नोकरी सुटली. सन १९०७ सालीं त्यानें बी. ए.ची पदवी संपादन केल्यावर सन १९०९सालीं कॉर्क शहरीं नवीनच निघालेल्या व्यापारी शिक्षणाच्या शाळेंत 'व्यापार करण्याच्या पद्धति' या विषयावर व्याख्यानें देण्याची नोकरी त्याला मिळाली. ही नोकरी फारशी जड नव्हती. आठवड्यांतून फक्त दोन व्याख्यानें त्याला द्यावयाचीं असत. हें काम अगदीं थोडें म्हणून डायरच्या कारखान्यांतील हिशेबतपासनिसाची जागा त्यानें अजून सोडली नव्हती. पण पुढें सन १९११ सालच्या अखेरीस कॉर्कच्या औद्योगिक शिक्षण कमिटीनें जेव्हां त्याला व्यापारविषयक शिक्षक आणि प्रचारक नेमलें तेव्हां तें काम बरेंच असल्यामुळें त्यानें डायर कंपनींतील नोकरी सोडली. कांहीं वर्षांनीं आयरिश स्वयंसेवकांच्या चळवळीच्या वेळीं स्वयंसेवक गोळा करण्यासाठीं कॉर्क परगण्यांतील ज्या ज्या भागांत त्याला हिंडावें लागलें त्याच नेमक्या भागांत या वेळीं

व्यापारी शिक्षणाच्या व प्रचाराच्या कामासाठीं तो पुष्कळ हिंडला. या वेळीं कॉर्क परगण्यांतील ठिकठिकाणच्या अनेक माणसांशीं त्याचे जे स्नेहसंबंध जडले, आणि निरनिराळ्या लोकांविषयीं त्याला जी आपोआप माहिती झाली ती पुढें स्वयंसेवक गोळा करण्याच्या कार्यांत त्याला फार उपयोगी पडली. ही व्यापारविषयक प्रचारकाची नोकरी करीत असतां तो सोमवारपासून शुक्रवारपर्यंत सबंद आठवडाभर सारखा प्रवास करीत असे. सोमवारीं सकाळीं उठून आगगाडीनें कोणत्या तरी मध्यवर्ति स्टेशनपर्यंत जावयाचें, व मग तेथून सायकलस्वार होऊन जें खेड्यापाड्यांतून हिंडावयास लागावयाचें तें शुक्रवारीं संध्याकाळपर्यंत, आणि त्यानंतर शनिवारीं सकाळीं कॉर्क शहरीं परत येऊन तेथें सपाटून काम करावयाचें, असा त्यानें आपला क्रम ठरवून ठेवला होता. पूर्वीं आयरिश भाषा शिकण्याच्या नादांत कॉर्क परगण्याच्या पश्चिम सरहद्दीवरील बॅलिंजिअरीच्या सभोंवतालचा सारा प्रदेश त्यानें पायाखालीं घातलेलाच होता. आतां व्यापारी प्रचारकाच्या पेशानें त्यानें कॉर्क परगण्याचा बाकीचा सारा प्रांत धुंडाळला. अशा प्रकारें सबंद कॉर्क परगणा मॅक्स्विनीच्या पूर्ण परिचयाचा झालेला असल्यामुळें पुढें स्वयंसेवकांची चळवळ निघाली आणि ठिकठिकाणीं हिंडून स्वयंसेवकांची भरती करण्याचें काम करणारा कोणी तरी पुढारी पाहिजे असें जेव्हां लोकांना वाटूं लागलें तेव्हां त्या कामाला मॅक्स्विनीइतका लायक इसम दुसरा कोणीच नाहीं असें वाटून त्यांची दृष्टि त्याच्याकडे साहजिकपणेंच वळली.

एकीकडे त्याला नकळत पण जणूं काय परमेश्वरी संकेतानें पुढील कार्यासाठीं मॅक्स्विनीची तयारी होत असतांना दुसरीकडे आयर्लंडमध्यें फार महत्त्वाच्या गोष्टी घडत होत्या. राजकीय वातावरणाच्या आकाशांत लहान लहानच ढग जमत होते, पण लवकरच मोठें वादळ होणार असें ते स्पष्ट सुचवीत होते. वरवर दृष्टि फेंकली तर दारिद्र्यांत, पारतंत्र्यांत आणि भिकारड्या स्थितींतच मानून घेतलेल्या खोट्या समा-

धानांत सारा आयर्लंड देश खुशाल घोरत पडलेला आहे असें दिसत होतें. पार्लमेंटकडून सुधारणा मिळवूं पाहणाऱ्या पक्षाचें राजकीय क्षेत्रांत वर्चस्व होतें. या पक्षांतील माणसांच्या पाठीशीं परकी सरकारच्या उत्तेजनाचें पाठबळ असल्यामुळें राजकारणाचीं सारीं सूत्रें आपल्या हातांत आहेत अशी त्यांची पुरी खात्री होती. अनेक प्रसंगीं त्यांचें सामर्थ्य लोकांच्या निदर्शनास येत होतें. त्यांच्या पक्षांतील डोलन नांवाचा पुढारी जेव्हां त्यांना सोडून सिन फेन पक्षाला जाऊन मिळाला, आणि त्यांच्या विरुद्ध पार्लमेंटच्या जागेसाठीं उमेदवार म्हणून उभा राहिला तेव्हां प्रचंड मताधिक्यानें त्यांनीं त्याचा चांगलाच पराजय केला. तसेंच सन १९१०मध्यें पार्लमेंटमध्यें त्यांचें जेव्हां मताधिक्य झालें तेव्हां सिन फेन पक्ष अगदीं नामशेष झाल्यासारखें लोकांना वाटलें. आणि त्याचप्रमाणें नंतर जेव्हां त्यांनीं अॅस्क्विथ व लॉइड जॉर्ज यांना वाटेल तसें वागण्याची पूर्ण मुभा देऊन होमरूल लांबणीवर टाकण्यास देखील आपली संमति दर्शविली तेव्हांसुद्धां राजकारणाचे फांसे सर्वस्वी त्यांच्या हातांत आहेत व ते त्यांनीं मन मानेल तसे टाकले तरी चालतील असाच प्रत्यय आला. आयर्लंड देश सर्वस्वी त्यांच्या मुठींत आहे असेंच वर वर पाहणाराला त्या वेळीं दिसलें असतें !

परंतु त्यांच्या सद्दीचे दिवस संपले असें हळूच सुचविणारे लहान लहान ढग दिसूं लागले होते. ज्या एका गोष्टीकडे कोणाचें फारसें लक्ष गेलें नाहीं ती ही, कीं त्यांच्या पक्षांत सर्वस्वी जुन्या पिढींतील जुन्या माणसांचाच भरणा होता. त्यांचे पक्षपाती म्हतारे कोतारे होते, आणि त्यांच्या पक्षाचे जे पुढारी अधिकारारूढ होते त्यांचेही केंस पांढरे होत चालले होते. उद्याचलावर डोकावणाऱ्या तरुण पिढीचा त्यांच्या पक्षाकडे काडीभर देखील ओढा नव्हता. इतकेंच नव्हे, तर तरुण पिढीकडून त्या पक्षाचा उघड उघड पूर्ण तिरस्कारच केला जात असे. नव्या पिढींतील विचारवंत तरुण त्या पक्षाचा यत्किंचितही पुरस्कार करण्यास

तयार नव्हते. आयर्लंड इंग्लंडपासून पूर्ण विभक्त झालें पाहिजे असाच 'आयर्लंडमधील बुद्धिमान् माणसांपैकीं प्रत्येकाचा आग्रह असतो असें प्रसिद्ध लेखक लेकी यानें आपल्या तरुणपणीं लिहून ठेवलें आहे तें खोटें नाहीं. जुन्या दरबारी पक्षाला पाठिंबा द्यावयास आयर्लंडची तरुण पिढी केव्हांही तयार नव्हती. नाहीं म्हणावयास पार्नेलनें कांहीं दिवस आयर्लंडच्या तरुणांस वेड लावलें होतें. पण तेंही त्याच्या दरबारी राजकारणानें नव्हे, तर पराकाष्ठेचा प्रामाणिकपणा, कामाची धडाडी वगैरे त्याच्या अंगच्या सद्‌गुणांनीं. पार्नेल अस्तंगत झाल्यानंतर तरुण पिढीनें त्याचा पक्ष सोडला तो कायमचाच सोडला. प्रत्यक्ष राजकीय उलाढालींत न पडतां 'गेलिक लीग'सारख्या संस्थांत शिरून तरुण स्त्री-पुरुष कार्य करीत होते. पण जसजशीं वर्षांवर वर्षें लोटत होतीं तसतशी जुन्या राजकीय पक्षापासून तरुण पिढी अधिकाधिक दूर होत होती. आणि आज नाहीं तर उद्यां, पण केव्हां तरी तरुण पिढी जुन्या पिढीला दूर लोटून पुढें आल्याखेरीज राहिल्याचें उदाहरण एका देशाच्या तरी इतिहासांत सांपडेल काय? जुन्या पिढीची सत्ता संपुष्टांत आली असें दर्शविणारा लहानसा ढग हाच होय.

आणि हा लहानसा ढग झपाट्यानें मोठा होत गेला. इंग्लंडपासून आयर्लंड पूर्ण विभक्त झालें पाहिजे या भावनेला 'संयुक्त आयरिश लोक' नांवाची संस्था काढून आर्थर ग्रिफिथनें प्रथम मूर्त स्वरूप दिलें. पण या संस्थेकडून देखील त्या भावनेचा जितका परिपोष व्हावयास पाहिजे तितका झाला नाहीं. उलट, संपूर्ण स्वायत्तता हें आपल्या चळवळीचें ध्येय आहे असें या संस्थेनें निश्चितपणें न ठरविल्यामुळें त्या भावनेवर थोडेंसें विरजण पडल्यासारखेंच झालें. त्यामुळेंच आयर्लंडमध्यें स्वराज्यविषयक विचारांचे जे अंकूर फुटूं लागले होते त्यांना ग्रिफिथच्या या संस्थेचें क्षेत्र देखील आकुंचित वाटूं लागलें. शेवटीं सन १९१० मध्यें तरुण पिढीनें 'स्वतंत्र आयर्लंड' ( Irish Freedom )

नांवाचें एक वर्तमानपत्र काढलें, व त्यामुळें नव्या पिढीच्या विचारांना वाचा फुटल्यासारखें झालें. या पत्राच्या द्वारें राजकारणविषयक अत्यत स्पष्ट आणि निर्भीड विचार प्रगट होऊं लागले. पत्राच्या पहिल्याच अंकांत असें म्हटलें होतें कीं, "अमुक एका पक्षाचा पक्षपात करण्यासाठीं आम्ही पुढें सरसावलों नाहीं. वुल्फ टोन, रॉबर्ट एमेट, जॉन मिशेल आणि जॉन ओलिअरीसारखीं नररत्नें ज्या राष्ट्रांत होऊन गेलीं त्या राष्ट्राची उज्ज्वल परंपरा कायम राखण्यासाठीं आम्ही पाऊल पुढें टाकीत आहों. त्या वीरांप्रमाणेंच आमचाही असा आग्रह आहे, कीं इंग्लंडपासून आयर्लंड पूर्ण विभक्त झालें पाहिजे. त्या वीरांप्रमाणेंच आयर्लंडमध्यें प्रजासत्ताक राज्य स्थापन होण्यासाठीं आम्ही भगीरथ प्रयत्न करूं. 'पूर्ण स्वातंत्र्याला एकच स्वरूप आहे, आणि तें म्हणजे प्रजासत्ताक राज्य' हें टॉमस डेव्हिन रीलीचे उद्गार आमच्या स्मरणांतून कधींही जाणार नाहींत!"

अशा प्रकारें उच्च ध्येयाचा झेंडा फडकावून तरुण पिढी पुढें निघाली, आणि या तरुण मंडळीच्या निशाणाभोंवतीं हळू हळू सारें आयरिश राष्ट्र गोळा झालें. पहिल्यापासून शेवटपर्यंत त्यांच्या अनुयायांची संख्या वाढतच गेली. त्यांचा पाय मागें कधींच हटला नाहीं.

या सर्व तरुण मंडळींत टेरेन्स मॅक्स्विनी प्रामुख्यानें होता. जुन्या खोडांना मागें सारून तरुण मंडळींनीं पुढें होण्याचे आणि सबंध देशाला स्वातंत्र्याची खरी दिशा दाखवून आपल्यामागें नेण्याचे दिवस जवळ आले आहेत, अशी इतर कांहीं तरुणांप्रमाणें टेरीचीही समजूत होती. 'स्वतंत्र आयर्लंड' काढणाऱ्या मंडळींत तो अंत:करणपूर्वक मिसळला, व त्याच्या अनेक गुणांची त्या मंडळीवर ताबडतोब अतिशय छाप पडली. अनेक संकटांना तोंड देऊनही लढाई लढणारा हा खंदा वीर आहे अशी त्यांची खात्री पटली. 'स्वातंत्र्याचीं मूलभूत तत्त्वें' या मथळ्याखालीं 'स्वतंत्र आयर्लंड' पत्रांत टेरीनें एक अत्युत्कृष्ट लेखमाला

लिहिली. त्या लेखांनीं त्या पत्राच्या वाचकवर्गांत अतिशय जागृति उत्पन्न केली. ते लेख म्हणजे राजकारणाच्या उच्च तत्त्वज्ञानाची मार्मिक फोड आहे असें प्रत्येक वाचकाला वाटलें. ही लेखमाला स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालेली आहे. स्वातंत्र्यासाठीं झगडणाऱ्या प्रत्येक देशांतील प्रत्येक स्त्रीपुरुषानें या लेखमालेचें नुसतें वाचनच नव्हे तर मनन करावें इतकी ती बहुमोल आहे. त्या लेखमालेंत राजकीय प्रश्नांचा अनेक बाजूंनीं स्पष्ट विचार टेरीनें केलेला आहे. स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं आयरिश स्त्रीपुरुषांनीं कसें वागावें, कोणतें ध्येय डोळ्यांपुढें ठेवावें, कोणतीं तत्त्वें अहर्निश चित्तांत राखावीं, संसाराकडे कोणत्या नजरेनें पहावें, मृत्यूची भीति कां बाळगूं नये वगैरे अनेक लहान मोठे प्रश्न मनाशीं उभे करून त्यांची विचारपूर्ण आणि जोमदार चर्चा या लेखांत टेरीनें केली आहे. टेरीच्या सर्वांगसुंदर लेखांची थोडीशी कल्पना वाचकांस यावी म्हणून त्यांतील कांहीं निवडक स्थळांचें भाषांतर आम्ही खालीं देत आहोंत.

इंग्लंडपासून आयर्लंड पूर्ण विभक्त झाल्याखेरीज त्याला खऱ्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येणार नाहीं या सिद्धान्ताचें प्रतिपादन करतांना टेरी लिहितो:—‘ आपला देश स्वतंत्र व्हावा, आपल्या देशाची भरभराट व्हावी, आपला व्यापार वाढावा, वाङ्मय, संगीत आणि इतर कला वृद्धिंगत व्हाव्या अशी कोणत्या आयरिश माणसाची इच्छा नसेल? उलट, स्वातंत्र्याच्या एकाच उज्ज्वल ध्येयानें प्रेरित होऊन आज सारे आयरिश देशभक्त खांद्याला खांदा लावून झटत आहेत. स्वदेशाच्या वैभवाचें एकच सुखस्वप्न आज आपल्या सर्वांच्या ध्यानीं मनीं आहे. पण हें सुखस्वप्न खरें होण्यास आपल्या स्वातंत्र्यांत तिळमात्र देखील उणेपणा राहतां कामां नये. जोंपर्यंत ब्रिटिश साम्राज्याशीं आपला कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारचा संबंध राहील तोंपर्यंत त्या संबंधामुळें आपण कमी अधिक पारतंत्र्यांत राहणार हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. आपलें स्वराज्य

ब्रिटिश साम्राज्यांतर्गत असलें, कीं पार्लमेंटमध्यें म्हणा किंवा इतर ठिकाणीं म्हणा कांहीं तरी निमित्त निघून आपलें व ब्रिटिशांचें भांडण होणारच. ते टळणें शक्य नाहीं. आणि अशा भांडणाच्या वेळीं आपण ब्रिटिशांचे, थोड्या अंशानें कां होईना, पण अंकित आहोंत ही जाणीव आपल्याला बोंचल्यावांचून राहणार नाहीं. हें ज्याला पटत नाहीं त्याला या जगाचा आणि मनुष्यस्वभावाचा अनुभव नाहीं असेंच म्हटलें पाहिजे..... आम्ही गेलिक वंशांतील आहोंत आणि ब्रिटिशांचे व आमचे पूर्वज एक नाहींत म्हणून आमचें राष्ट्र पूर्ण विभक्त असलें पाहिजे असें आम्ही म्हणतों असें नव्हे. भूगोलदृष्टया आमचा देश इंग्लंडहून निराळा आहे, निसर्गानेंच आम्हांला वेगळें ठेवलें आहे, म्हणून आम्ही विभक्त होण्याचा आग्रह धरतों. आम्ही व ब्रिटिश लोक अगदीं एकाच वंशांतील असतों तरी देखील आम्ही असाच आग्रह धरला असता. अमेरिकन लोक ब्रिटिशांचे अगदीं सख्खे भाईबंद असूनही त्यांनीं इंग्लंडचा सारा संबंध पार तोडून टाकून आपला देश पूर्ण स्वतंत्र करून घेतला नाहीं काय? '

महाबलिष्ठ ब्रिटिश राज्यविरुद्ध चिमुकल्या आयर्लंडनें वृथा धडपड करण्यांत काय अर्थ आहे? अशी शंका घेणाऱ्याला टेरीचें उत्तर किती सुंदर आहे पहा. तो म्हणतो:—' आजची निराशाजनक परिस्थिति पाहून कोणी म्हणेल, ब्रिटिश साम्राज्याची अमर्याद शक्ति कोणीकडे आणि पारतंत्र्यानें आधींच झिजलेल्या आपल्या राष्ट्राची शक्ति कोणीकडे? अशा स्थितींत स्वातंत्र्याची भलती आशा उराशीं बाळगण्यांत काय अर्थ आहे? पण आजपर्यंतच्या इतिहासानें आविष्कृत केलेल्या एकाच तत्त्वाकडे आम्ही फक्त बोट दाखवतों म्हणजे या शंकेला अधिक उत्तर देत बसण्याची गरज नाहीं. तें तत्त्व हें, कीं राष्ट्रें चिरंजीवी आहेत, त्यांना मरण नाहीं; उलट, साम्राज्यें भंगुर आहेत, तीं केव्हां ना केव्हां तरी कोसळावयाचींच!'

आयर्लंड स्वातंत्र्य मिळवून काय करणार? टेरी लिहितोः— 'आज जगांत जिकडे तिकडे स्वातंत्र्याचा दुरुपयोग चाललेला दिसत आहे. पण आपण स्वतंत्रता देवीला अशी भ्रष्ट करणार नाहीं. आपल्या देशाचा भविष्यकाळांतील इतिहास अत्यंत उज्ज्वल करण्याची महत्त्वाकांक्षा आपण धरली पाहिजे. आपल्या राष्ट्राचें जीवन खरोखरी सर्वांगसुंदर करण्याची आपण इच्छा धरली पाहिजे. आपल्या देशाचें सामर्थ्य आपण वाढविलें पाहिजे. पण तें कशाकरतां? दुसऱ्यांचे देश पादाक्रांत करण्यासाठीं नव्हे तर अन्याय आणि जुलूम आयर्लंडच्या भीतीनें थरथर कांपावेत, आणि अनाथ राष्ट्रांना आयर्लंडचा धीर असावा म्हणून!'

प्रत्येकाची देशभक्ति किती जागृत आणि सर्वंकष असली पाहिजे याविषयीं टेरी म्हणतोः—' आपली देशभक्ति आपल्या साऱ्या व्यवहारांत भरून उरली पाहिजे. सोयीचें दिसेल तेव्हां स्वातंत्र्याच्या निशाणाला प्रणाम केला म्हणजे झालें हा विचार निखालस चुकीचा आहे. नुसतें सभांना हजर राहण्यानें देशभक्ति संपत नाहीं. एका ठिकाणीं स्वदेशप्रीतीच्या तत्त्वांना अनुसरून वागावयाचें, आणि दुसऱ्या ठिकाणीं कांहीं इष्ट हेतू साधण्याकरितां त्या तत्त्वांची पायमल्ली झाली तरी ती सहन करावयाची, हें वर्तन देशभक्तीचें नव्हे. कोणत्याही गोष्टीला भिऊन किंवा कोणताही हेतू साधण्यासाठीं स्वातंत्र्याचें निशाण किंचित् देखील खालीं करतां कामां नये. आपलें निशाण सदा उंच फडकत ठेवण्याचा कटाक्ष ठेवणें हीच खरी देशभक्ति. व्यवहार म्हणजे एक समरभूमि आहे. आपल्या निशाणावर केव्हां हल्ला होईल त्याचा नियम नाहीं, आणि त्यासाठीं आपण अखंड जागृति राखली पाहिजे. एखादी गोष्ट आपल्याला सत्य म्हणून एकदां पटली म्हणजे तिचा उच्चार तिचा आदर होईल त्याच ठिकाणीं करावयाचा नसतो. तिचा प्रचार आपण प्रत्येक स्थलीं केला पाहिजे.'

होमरूल बिलाला टेरी किती किंमत देत होता तें पहा. तो म्हणतोः——

'होमरूलनें जुन्या पिढीचें समाधान कदाचित् होणार असेल, पण आमचें होणार नाहीं. जुन्या पिढीच्या व आमच्या आकांक्षांची धांव निराळी. आमची महत्त्वाकांक्षा त्यांच्याहून पुढें जाणार. होमरूलनें संतुष्ट न होतां पुढें कार्य करीत राहून आम्ही काय मिळविणार अशी कोणाला शंका वाटत असेल तर त्यानें आजपर्यंतच्या चळवळीच्या इतिहासाकडे क्षणभर नजर टाकावी. प्रथम आम्हांला चिरडून टाकण्याचा ब्रिटिशांनीं प्रयत्न केला, पण तो साधत नाहीं असें पाहून नंतर त्यांनीं सामनीति स्वीकारली. प्रथम सुधारणांचा चतकोर तुकडा आमच्या तोंडावर टाकून पाहिला. पण त्यानें लोक संतुष्ट होईनात, व त्यामुळें होमरूलच्या मागणीला तोंड फुटलें. होमरूलची चळवळ नुसत्या दडपशाहीनें मारून टाकण्याचा प्रथम प्रयत्न झाला; परंतु तो यशस्वी होईना तेव्हां होमरूलच्या ऐवजीं स्थानिक स्वराज्याचें खेळणें लोकांच्या हातीं देऊन त्यांचा टाहो बंद करण्याचा डाव टाकण्यांत आला. तरीही लोक स्वस्थ बसेनात, व मग होमरूल देण्यावांचून गत्यंतर उरलें नाहीं. ज्याला हा इतिहास दिसतो, ज्याला प्रगति म्हणजे काय तें कळतें, त्याच्या हेंही लक्षांत आलेंच पाहिजे, कीं हें होमरूल म्हणजे कांहीं शेवटची पायरी नव्हे. हें होमरूल म्हणजे फक्त शेवटच्या अंकाचा प्रारंभ आहे!'

एकदां सत्याची ओळख पटली म्हणजे त्याच्या आग्रहासाठीं प्राण द्यावयास तयार होण्यांतच खरें नैतिक धैर्य आहे, असें सांगतांना टेरी लिहितो:—'एकदां सत्य दृष्टीला दिसलें, आणि त्या सत्याची सेवा आपण केली पाहिजे असा प्रत्यय आला म्हणजे प्राणांचीही पर्वा न करतां खंबीरपणानें त्या सत्याची कांस जो मनुष्य धरतो त्याच्याच अंगीं खरें नैतिक धैर्य असतें. तो वेडा किंवा पिसाळलेला असतो असें नव्हे; तर जें सत्य आहे तें हितकारक असलेंच पाहिजे, आणि जें हितकारक आहे त्यापासून कोणत्याही काळीं आणि कोणत्याही स्थळीं कसल्याही प्रकारचा आपणां स्वतःला किंवा दुसऱ्या कोणाला अपाय होणें शक्य

नाहीं, हें तत्त्व त्याच्या अंतःकरणांत पुरें बिंबलेलें असतें. सत्याग्रहामुळें त्याच्यावर कोणतींही संकटें कोसळलीं तरी निधड्या छातीनें तो निश्चल उभा राहतो. त्याची बुद्धि लवमात्रही चळत नाहीं. इतकेंच नव्हे, तर सत्याग्रहाला प्रारंभ करतांना एखाद्याचें मन किंचित् घाबरलें तरी एकदां त्यांत पडल्यावर त्याचें सारें भय दूर पळतें, आणि भीत भीत प्रारंभ करणारे लोक वीरासारखे मृत्यूला कवटाळतात! उदात्त तत्त्वांच्या समर्थनासाठीं प्राण देणारे महात्मे मरतांनाही आनंदांत असतात याचें कारण हेंच आहे. आणि कच्च्या दिलाच्या लोकांना त्यांच्या त्या आनंदाचें आश्चर्य वाटतें याचेंही कारण हेंच आहे. स्वातंत्र्याच्या शिपायाला पक्का विश्वास असतो, कीं आपण यश मिळविलें तर साऱ्या जगाचें कल्याण होईल, आणि आपण दुःख सोसलें तर लोकांच्या पायांतील परदास्याच्या शृंखला तुटतील! याचेंच नांव नैतिक धैर्य. हजारों सवंगड्यांच्या संगतीनें शत्रूवर चाल करतांनाच तेवढें शौर्य प्रगट करणारा खरा शूर नव्हे. सोबत्यांचे मुडदे आजूबाजूला पडले असतांना समशेर चालवीत उभें ठाकण्याच्या प्रसंगाला तो कचरेल. एकटा सशस्त्र शिपाई सबंध पलटणीचा पाडाव करूं शकत नाहीं, किंवा एखाद्या लहानशा पलटणीला अफाट सैन्यच्या सैन्य गारद करतां येत नाहीं हें खरें; पण सत्याग्रह करणाऱ्या एकट्या व्यक्तीच्या आत्मिक बलापुढें जगांतील साऱ्या साम्राज्यांतील साऱ्या सैन्याचाही टिकाव लागणार नाहीं! त्या युद्धांत ती एकटी व्यक्तीच यशस्वी होईल!’

प्रकरण सातवें

## लाट उसळली

पार्लमेंटमध्यें शिरून स्वराज्य मिळवूं पाहणारे दरबारी पुढारी अस्तास गेले तेव्हां त्यांच्याबरोबरच त्यांचे आवडते शब्द आणि आवडती भाषाही नाहींशी झाली. पण त्यांच्या वर्चस्वाचा ऐन मध्यान्ह होता. त्या वेळीं पार्लमेंटमध्यें घडलेल्या एखाद्या क्षुल्लक गोष्टीला पोकळ महत्त्व देऊन, आजचा दिवस आयर्लंडच्या दृष्टीनें मोठा महत्त्वाचा गेला असा उगीच ओरडा केल्याखेरीज रेडमंड, डिलन वगैरे मंडळी एकही आठवडा सुना जाऊं देत नसत. कोठें लॉर्डांच्या सभेंत ॲस्क्विथच्या तोंडून आयर्लंड-विषयीं चार जोरदार शब्द बाहेर पडले, किंवा लॉईड जॉर्जनें एखाद्या भाषणांत आयर्लंडच्या मागण्यांविषयीं कोरडी सहानुभूति दाखविली, कीं या मंडळींनीं ' केवढा हा महत्त्वाचा दिवस ! ' म्हणून ओरडत सुटावें व व्याख्यानें झोडावीं. वास्तविक ते सारे महत्त्वाचे दिवस महत्त्वहीन होते. त्या काळचा एखादा खरा महत्त्वाचा दिवस जर भावी इतिहासकार आपल्या इतिहासांत लिहून ठेवणार असतील तर तो एकच. विभक्त स्वराज्या-ऐवजीं संयुक्त स्वराज्य मागणाऱ्या अल्स्टर परगण्यांतील पक्षाच्या कौन्सिलनें पार्लमेंटमधील टोरी पार्टीच्या संमतीनें 'अल्स्टरचे स्वयंसेवक' उभारण्याचें ज्या दिवशीं ठरविलें तोच तो दिवस होय.

'अल्स्टरचे स्वयंसेवक' ही संस्था जेव्हां स्थापन झाली तेव्हां दूर दृष्टीनें तिच्यांतील खरें मर्म ओळखणारे लोक फारच थोडे होते. तें मर्म न कळल्यामुळें आपआपल्या अज्ञानाप्रमाणें अनेक लोक त्या संस्थेविषयीं अनेक प्रकारें बोलत असत. रेडमंडला व त्याच्या अनुयायांना असें वाटत होतें, कीं हे स्वयंसेवक म्हणजे कांहीं तरी सोंग आहे, त्यांचीं नुसती टर उडविण्यापलीकडे त्यांना अधिक महत्त्व देण्याचें कांहीं कारण नाहीं. इंग्लंडची कल्पना अशी होती, कीं हे स्वयंसेवक म्हणजे विभक्त

स्वराज्याची चळवळ करणाऱ्या लोकांवर परस्पर सोडून द्यावयास देवानें धाडलेलें एक अस्त्रच आपल्या हातीं आलें. आतां त्या चळवळ्यांकडून साम्राज्यावर कांहीं संकट येण्याची भीति उरली नाहीं. पण विचारांच्या या दोन्ही दिशा अजिबात चुकलेल्या होत्या. या स्वयंसेवकांच्या संस्थेचें खरें मर्म आयर्लंडांतील तरुण पिढीच्या ध्यानांत मात्र पुरतें आलें होतें. 'स्वतंत्र आयर्लंड' पत्र चालविणाऱ्या तरुणांनीं या नव्या घडामोडी-चें रहस्य तात्काळ ओळखलें होतें. त्यामुळें आयर्लंडांतील इतर कोण-त्याही पत्रापेक्षां या पत्रानें स्वयंसेवक संस्थेचें अधिक आनंदानें स्वागत केलें. आयर्लंडमधील कोणीही राष्ट्रीय मतांचा मनुष्य या नव्या चळ-वळीच्या आड येणार नाहीं, इतकेंच नव्हे तर, अल्स्टर परगण्याचें उदाहरण पाहून इतर परगण्यांतही स्वयंसेवकांची चळवळ सुरू होईल असें 'स्वतंत्र आयर्लंड'नें भविष्य केलें, व पूर्वीं सन १७०८ मध्यें झालेल्या असल्याच चळवळीचें वाचकांना स्मरण करून देऊन म्हटलें कीं, 'अल्स्टरमध्यें शस्त्रांचा खणखणाट ऐकूं आला, कीं बाकीच्या साऱ्या आयर्लंडनें युद्धाला निघावयाचें, असाच आजपर्यंतचा अनुभव आहे.' सारे लोक या अल्स्टरच्या स्वयंसेवकांकडे उपेक्षापूर्ण दृष्टीनें बघत होते व गालांतल्या गालांत हंसत होते; परंतु विभक्त स्वराज्या-चा पुरस्कार करणाऱ्या तरुणांच्या मनांत या स्वयंसेवकांकडे पाहून कांहीं निराळ्याच भावनांचें व आकांक्षांचें स्फुरण होऊं लागलें. आयर्लंडचें एक जंगी स्वयंसेवकपथक असावें असा ध्यास त्यांनीं आज कित्येक दिवस हृदयाशीं धरून ठेवला होता व एखाद्या निराळ्या चळवळीच्या बुरख्याखालीं ही चळवळ सुरू केली तर कसें होईल याविषयीं त्यांच्यात कित्येक वेळां बरीच चर्चाही झाली होती. पण स्वयंसेवकांच्या चळ-वळीला प्रत्यक्ष तोंड फुटलेलें आपल्या कधीं दृष्टीस पडेल असें त्यांच्या स्वप्नींही नव्हतें. असें असून इंग्रज सरकारच्या मूर्खपणामुळें कां होईना, पण अल्स्टरमध्यें स्वयंसेवकांचें पथक खरोखरीच उभें रहात असलेलें

डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहतांच त्यांना केवढा आनंद झाला असेल? ही उत्कृष्ट संधि आपणांस मिळणार असें त्यांना वाटलें. महायुद्धाच्या पूर्वीचा तो काळ होता. आयर्लंडशीं वागण्यांत इंग्लंडनें त्या वेळीं पुरती लाज सोडलेली नव्हती. थोडी तरी अब्रूची चाड इंग्लंडला होती. आपल्या धोरणांत सुसंगतता ठेवण्याची थोडी तरी इच्छा इंग्लंडच्या मनांत होती. त्यामुळें एकदां अल्स्टर परगण्यांत स्वयंसेवकांचें पथक उभारून त्याला सशस्त्र सज्ज होण्यास परवानगी दिल्यानंतर आयर्लंडच्या इतर भागांतही तसलीं पथकें निघूं लागलीं तर त्यांना इंग्लंडकडून अडथळा होईल हें संभवनीय नव्हतें. आणि जसजसे दिवस जाऊं लागले, अल्स्टरमधील स्वयंसेवकांच्या कवाइती जाहीर रीतीनें होऊं लागल्या, आपल्या हातांतील लांकडी बंदुका सरसावीत त्यांची सार्वजनिक रस्त्यांतून परेड होऊं लागली, आणि त्यांना जाहीर समारंभांतून धर्मोपदेशकांकडून आशीर्वाद देखील मिळाले तेव्हां स्वयंसेवकांची चळवळ नुसत्या कल्पनेच्या साम्राज्यांत नसून प्रत्यक्ष जगांत वावरूं लागली, असा सर्व लोकांना विश्वास पटला, आणि आतां आपले दिवस आले अशा आनंदपूर्ण विचारांची लहर तरुणांच्या मनांत येऊन गेली. पार्लमेंटवाले पुढारी त्या स्वयंसेवकांच्या लांकडी बंदुकांची टर उडवीत होते. इतकेंच नव्हे तर, ही स्वयंसेवकांची चळवळ बाल्यावस्थेंत आहे तोंच तिच्या गळ्याला नख लावून तिला नष्ट करण्यासाठीं त्यांनीं आपली सारी पुण्याई खर्चेही केली. पण त्यांचे हे म्हातारपणचे सारे चाळे निष्फळ ठरले. आपल्या अंगांतील मर्दपणा प्रगट करण्याची ही संधि वायां जाऊं द्यावयाची नाहींच नाहीं असा दृढनिश्चय तरुण पिढीनें केलेला होता. हां हां म्हणतां स्वयंसेवकांच्या चळवळीचा साऱ्या आयर्लंडभर पसारा वाढला.

स्वयंसेवकांच्या चळवळीचा प्रसार करण्याच्या कामांत तरुण पिढीनेंच पुढाकार घेतलेला होता हें खरें. परंतु आपलें काम युक्तीयुक्तीनें आणि मुत्सद्दोगिरीनें करण्याचें धोरण त्यांनीं प्रथमपासून ठेवलें होतें.

चळवळ जगवावयाची असेल तर ती सावधगिरीनें चालविली पाहिजे हें ते जाणून होते. पार्लमेंटवाल्या पक्षानें एकदम चळवळीवर उडी घालून तिचा गळा दाबूं नये यासाठीं सिन फेन किंवा प्रजासत्तावादी म्हणून लोकांना माहीत असलेल्या पुढाऱ्यांपैकीं कोणीही तिच्या चालकांत नसणें इष्ट होतें; व या धोरणानेंच सारी व्यवस्था करण्यांत आली. डब्लिन शहरच्या कमिटीच्या प्रास्ताविक बैठका होऊन सन १९१३ च्या नोव्हेंबर महिन्यांत जेव्हां जाहीर समारंभानें डब्लिन शहराचें स्वयंसेवक पथक उभारण्यांत आलें, तेव्हां त्या पथकाचे चिटणीस प्रोफेसर मॅक्नील व मि. केटल यांना करण्यांत आलें. कारण, प्रोफेसर मॅक्नील हे कोणत्याही विवक्षित राजकीय मताचे पुरस्कर्ते नव्हते, आणि मि. केटल हे तर पार्लमेंटवाल्या पक्षांत असल्याचें जगजाहीर होतें. त्याचप्रमाणें त्या पथकाच्या कमिटींत पार्लमेंट पक्षांतीलच लोक मुद्दाम नेमण्यांत आले होते. पार्लमेंटवाल्या पक्षानें चालविलेली स्वयंसेवकांची हेटाळणी त्या पक्षांतील फारच थोड्या सभासदांना पसंत होती. उलट आपल्या पक्षानें असलें निंद्य वर्तन करावें याची बहुतेक सभासदांस लाजच वाटत होती. आणि त्यामुळें ती चळवळ हाणून पाडण्याची रेडमंड आणि डिलन यांची जरी फार फार इच्छा होती, व ती पूर्ण करण्यासाठीं त्यांची जरी कमालीची खटपट चाललेली होती, तरी त्यांच्याच पक्षांतील माणसांना स्वयंसेवकांच्या नियामक मंडळांचे सभासद करून त्यांचे प्रयत्न विफल करणें अत्यंत सुलभ झालें.

डब्लिनच्या त्या सभेला १५००० लोक हजर होते, आणि त्या सभेंत आयरिश स्वयंसेवकांचें पथक सर्व शिष्टाचारानुसार जन्मास आलें. एकदां स्वयंसेवकांची वावटळ उठली, कीं ती शमविणें अशक्य होऊन बसेल अशी तरुण पिढीची खात्री होती. आणि शेवटीं तसेंच झालें. स्वातंत्र्यासाठीं झगडणाऱ्या देशांत निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या चळवळींच्या लाटा उठत असतात. त्या वेळीं आयर्लंडांत स्वयंसेवकांची

लाट उठली. जुन्या राजकीय पक्षाच्या लोकांनीं या चळवळीच्या मार्गांत अडथळे उपस्थित करण्याचे खूप प्रयत्न केले. पण ती लाट मागें हटेना. देशांत सर्वत्र उत्पन्न झालेला उत्साह थोपवून धरणें शक्यच नव्हतें. आज या परगण्यांत तर उद्यां त्या परगण्यांत अशा रीतीनें साऱ्या देशभर ही वावटळ दिसूं लागली आणि थोड्याच अवधींत ३००० स्वयंसेवक नोंदले गेले. त्यांच्याजवळ फारशी सामुग्री नव्हती हें खरें. पण मुख्य जी अंत:करणाची स्फूर्ति ती त्यांच्या ठिकाणीं भरपूर होती, आणि त्यांचें शिक्षणही रोजच्या रोज चालू होतें. शिवाय योग्य अवधीनंतर त्यांच्या हातीं शस्त्रेंही येतील याविषयीं कोणाला शंका नव्हती. 'स्वतंत्र आयर्लंड' पत्रानें केलेलें भविष्य शेवटीं खरें ठरलें. अल्स्टरच्या हांकेला साऱ्या आयर्लंडनें चटकन उठून ओ दिली.

या स्वयंसेवकांमध्यें कांहीं मध्यम वयाचे व कांहीं वृद्ध लोकही होते. ते आपली रोजची कवाईत मोठ्या अभिमानानें व उत्साहानें करीत. तथापि स्वयंसेवकांत बहुतेक भरणा साहजिकपणें तरुणांचाच होता. हे सारे तरुण टेरीच्या नमुन्याचे होते. ज्या चळवळीची आज कित्येक वर्षें आयर्लंड मार्गप्रतीक्षा करीत बसलें होतें तीच ही चळवळ आपण होऊन चालून आली असें त्या सर्वांस वाटत होतें. टेरी आणि त्याच्या विचाराची तरुण मंडळी कांहींतरी करून आयर्लंडचें सैन्य कसें उभारतां येईल या चिंतेनें आजपर्यंत भांबावलेली होती. पण ही चळवळ पाहतांच त्यांचीं अंत:करणें उल्हसित झालीं. गेल्या सबंद शतकांत झाला नाहीं असा अवर्णनीय समरप्रसंग करून प्रिय स्वदेशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याची संधि शेवटीं आपल्या पिढीला प्राप्त करून दिल्या-बद्दल टेरीनें व त्याच्यासारख्या तरुणांनीं जगचालक प्रभूचे अंत:करण-पूर्वक धन्यवाद गाइले. ही स्वयंसेवकांची संख्या अशीच वाढत जाऊन तिच्यामधूनच आयर्लंडच्या सैन्याचा उदय होईल ही गोष्ट लोकांना मुळींच संभवनीय वाटेना. उलट, चळवळ सुरू झाल्यापासून हरघडी

अशी भीति वाटत होती, कीं ती बेकायदेशीर असल्याविषयीं सरकार जाहीरनामा काढील. पण पुढें तसें कांहीं न होतां फक्त परदेशाहून आयर्लंडमध्यें हत्यारांची आयात करणें सरकारनें मना केलें तेव्हां प्रत्येक इसमाच्या चेहऱ्यावर आनंद दिसूं लागला. ब्रिटिश सरकारानें ही स्वयंसेवकांची चळवळ मूळ निघूंच कशी दिली, व निघाल्यानंतर ती टिकूं कशी दिली, याचें प्रत्येकाला अत्यंत आश्चर्य वाटलें. अथवा 'देव आजपर्यंत ब्रिटिशांच्या बाजूला होता, पण आतां त्यानें त्यांची बाजू सोडली' असे त्या वेळीं एकानें उद्गार काढले तेच खरे. निदान टेरीला व त्याच्या मित्रांना तरी ते खरे वाटले. कारण तसें न म्हणावें तर ब्रिटिश सरकारच्या हातून कधीं न होणारी अशी चूक त्या वेळीं कशी झाली त्याचा कांहींच उलगडा होण्यासारखा नव्हता. ती चळवळ मारून टाकण्याची तीच खरी वेळ होती; पण एकदां तिची उपेक्षा केल्यावर, एकदां चळवळीचें वारें लोकांत पुरतें संचारल्यावर मग तिचा प्रतिकार करणें अगदीं अशक्य होतें. म्हणून उतावळ्या आशेनें तरुण पिढीनें ही चळवळ चालविली होती. ज्याप्रमाणें माता आपल्या बालकाला हातांत घेऊन त्याच्या भविष्यकालाविषयीं मनाशीं विचार करीत त्याच्या चेहऱ्याकडे पहात बसते, त्याप्रमाणें केव्हां मरेल व केव्हां नाहीं अशा धागधुगींत चाललेल्या त्या चळवळीकडे तरुण पिढीचे डोळे सारखे लागून राहिले होते व शेवटीं ती नांवारूपाला आलेली पाहून त्यांच्या डोळ्यांचें पारणें फिटल्यासारखें झालें. स्थानिक मतभेद, भांडणें आणि संकटें यांनीं या तरुण माणसांचा धीर खचला नाहीं. वाटेल तें करून ही चळवळ जगविली पाहिजे हें त्यांनीं ओळखलें होतें; आणि एकदां त्या कल्पनेला पुरें मूर्त स्वरूप आलें, कीं नंतर ती कधींही नष्ट होणार नाहीं असाही त्यांचा दृढ विश्वास होता. म्हणून मोठ्या आनंदानें व अभिमानानें टेरी व त्यांचे मित्र कॉर्क परगण्यांतील कामाला लागले.

2286

प्रकरण आठवें

## कवाइतीची धामधूम

टेरी सिन फेन पक्षाचा कट्टा अनुयायी होता, व त्या पक्षाचा प्रचार करण्यास तो मनापासून झटत असे. 'गेलिक संस्थे'बद्दलही त्याला पुरा अभिमान होता, व त्या संस्थेसाठींही तो जिवापाड मेहनत करीत असे. पण या दोन्ही संस्थांपेक्षांही स्वयंसेवकांच्या चळवळीनें त्याच्या अंगांत कांहीं विलक्षणच स्फूर्ति उत्पन्न केली, आणि त्या चळवळीच्या अगदीं प्रारंभापासूनच त्यानें आपलें तन आणि मन सर्वस्वीं तिला वाहिलें. आठवड्यांतून एकदां करावयाची कवाईत करून तो स्वस्थ बसत नसे, तर बाकीचा सारा वेळ युद्धशास्त्राचा अभ्यास करण्यांत आणि अशा रीतीनें सैनिक या दृष्टीनें स्वतःची जय्यत तयारी करण्यांत तो घालवीत असे. स्वातंत्र्याच्या झटापटीसाठीं आयर्लंडनें कोणती चळवळ करावी आणि ती कशी करावी याविषयीं आजपर्यंत विचार करून त्यानें ज्या कांहीं कल्पना आपल्या मनाशीं कायम करून ठेविल्या होत्या त्या या नव्या स्वयंसेवकांच्या चळवळीशीं इतक्या कांहीं तंतोतंत जुळल्या, कीं त्या चळवळींत त्यानें एकदम उल्हासानें उडी घातली. पूर्वीं सार्वजनिक काम करावयास त्याचें मन उत्सुक नसे. उलट चार लोकांच्या नजरेपुढें उभें राहून कांहीं बोलावयाचें किंवा करावयाचें म्हटलें कीं तें त्याच्या जिवावरच येई. पण त्याच्या मनाचा हा घाबरटपणा आतां एकदम पार नाहींसा झाला. तो पुढें सरसावला. काम करावयाच्या निश्चयानें त्यानें आपली कमर कसली. कॉर्क शहरांत स्वयंसेवकांची पहिली कवाईत ज्या दिवशीं झाली त्याच दिवशीं टेरेन्स मॅक्स्विनीचें लोकांचा पुढारी या नात्याचें चरित्र सुरू झालें, असें म्हणावयास हरकत नाहीं.

कॉर्क परगण्यांत स्वयंसेवकांच्या चळवळीच्या बीजांना अंकुर फुटणें जरा अवघड होतें. इतर परगण्यांपेक्षां तेथील परिस्थिति अधिक बिकट

व प्रतिकूल होती. आयर्लंडमधील पार्लमेंटवाला पक्ष हळू हळू निःसत्त्व होत चाललेला होता, व त्या पक्षांत जर कांहीं शक्ति उरली असेल तर ती डेव्हलिन या एका पुढाऱ्याचीच काय ती होती. डेव्हलिननें ‘Ancient Order of Hibernians’ नांवाची एक संस्था पूर्वी काढलेली होती. आपल्या सभासदांना चांगल्या अधिकाराच्या जागा मिळवून द्यावयाच्या अशा हेतूनेंच ती संस्था काढलेली असल्यामुळें तिचे बहुतेक सभासद अधिकारारूढ होते, व त्यामुळें त्या संस्थेच्या हातीं बरीचशी सत्ता आलेली होती. आयर्लंडच्या उत्तर भागांतच फक्त या संस्थेचें प्रस्थ फार माजलें होतें हें खरें. परंतु आपल्या संस्थेच्या यंत्रांत थोडथोडा बिघाड उत्पन्न होऊं लागला आहे अशी डेव्हलिन यास किंचित् शंका येतांच, पुढें आपली संस्था कोसळून आपलें वर्चस्व पार नष्ट होऊं नये अशी आगाऊ तरतूद करण्याकरितां त्यानें आपल्या संस्थेची वाढ आयर्लंडच्या दक्षिण भागांतही झपाट्यानें केली. या त्याच्या प्रयत्नांत सगळ्याच परगण्यांत त्याला सारखें यश आलें असें नाहीं; पण कॉर्कमध्यें त्याचें बस्तान सर्वांत उत्तम बसलें. त्याच्या अनुयायांना लोक ‘मोली’ म्हणत. हे ‘मोली’ कॉर्कमध्यें तरी ‘कर्तुम-कर्तुम्’ असे बलिष्ठ झाले व चांगल्या वाईटाची त्यांना चाड नसल्या-मुळें ते केव्हां काय करतील त्याचा नेम नव्हता. स्वयंसेवकांची चळ-वळ निघाल्याबरोबर या ‘मोली’ लोकांनीं तिची नाना प्रकारें चेष्टा कुचेष्टा करण्यास प्रारंभ केला. स्वयंसेवकांच्या मार्गांत हे ‘मोली’ म्हणजे एक मोठी धोंड होती.

डब्लिन शहरांत स्वयंसेवकांचें पथक निघाल्याबरोबर कॉर्कमध्येंही ती चळवळ सुरू करण्याच्या उद्देशानें एक लहान कमिटी नेमण्यांत आली. टेरी, टॉम कर्टिन व वॉल्श हे या कमिटीचे प्रमुख सभासद होते. आपण स्वयंसेवकांची चळवळ सुरू केल्यास ‘मोली’ लोक आपल्या मार्गांत काय काय विघ्नें आणतील, व त्यांनीं तशीं विघ्नें

आणल्यास आपण त्यांचें निराकरण कोणत्या रीतीनें करावयाचें, हा प्रश्न कमिटीपुढें प्रथमच चर्चेस निघाला. परंतु, कमिटींतील बहुतेकांचें मत असें पडलें, कीं स्वतःच्या पक्षाची बेअब्रू होऊं नये म्हणून तरी निदान हे 'मोली' स्वयंसेवकांची चळवळ हाणून पाडण्याचा उघडपणें यत्न करणार नाहींत. फक्त खाजगी रीतीनें ते तिचा धिःक्कार करून तिच्यावर विरजण घालण्याची खटपट करतील. बाकी, 'मोली' विरोध करोत किंवा न करोत, कांहीं झालें तरी आपण आपली चळवळ सुरू करावयाचीच असेंच सर्व सभासदांचें म्हणणें पडलें व त्याप्रमाणें लवकरच एक जाहीर सभा बोलावण्यांत आली आणि प्रोफेसर मॅक्नील, रॉजर केसमेंट वगैरे वक्त्यांचीं तेथें भाषणें झालीं. ही सभा होण्याचें जाहीर झाल्यापासून ती पार पडेपर्यंत लोक तिच्याविषयीं नाना प्रकारचे तर्क करीत होते, व त्या वेळीं आयर्लंडच्या जनतेच्या मनाची ठेवण कोणत्या प्रकारची होती हें त्या तर्कांवरून स्पष्ट दिसून आलें. त्या जाहीर सभेंत कोणत्या विषयाची चर्चा होणार आहे व सभेचा मुख्य हेतु काय आहे याविषयीं लोकांच्या मनांत कुतूहल नसून, 'मोली' या सभेच्या बाबतींत काय करतात, व ते ही सभा पार पडूं देतात कीं उधळून लावतात, हें पाहण्यासाठींच सारे लोक उत्सुक झाले होते. आयर्लंडमध्यें सैन्याची उभारणी होण्यास प्रारंभ झाला हें पाहून त्या चळवळीविषयीं राष्ट्रीय अभिमान व आस्था सर्व लोकांच्या मनांत कशी उत्पन्न झाली नाहीं याचें एखाद्या तिऱ्हाईत माणसाला आश्चर्य वाटेल. परंतु तसें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. स्वयंसेवकांच्या चळवळीचा कालांतरानें राष्ट्राला केवढा फायदा होणार आहे याची लोकांना कल्पना नव्हती. एका पक्षानें दुसऱ्या पक्षाला हाणून पाडण्यासाठीं सुरू केलेल्या उद्योगांपैकींच ही चळवळही आहे असेंच साऱ्या लोकांना वाटत होतें. त्यांत त्यांचा कांहीं दोष नव्हता. स्वतंत्र विचार करण्याची त्यांची संवयच पारतंत्र्याच्या दोषिक वातावरणांत

करपून गेली होती. कोणत्याही गोष्टीचें राष्ट्रीय महत्त्व त्यांना कळेनासें झालें होतें. ढळढळीत दिसणारे मार्गही त्यांच्या दृष्टीला दिसेनासे झाले होते. शिवाय तरुण पिढीच्या अंगांतील रक्त अधीरतेनें कसें सळसळत होतें, देशाभिमानाची ज्योत त्यांच्या अंतःकरणांत कशी पेटली होती आणि पराक्रमाची लालसा त्यांच्या मनांत किती अनावर झाली होती, याची जुन्या पिढींतील माणसांना यथार्थ कल्पना नव्हती.

सभेच्या दिवशीं सकाळीं अशी वातमी उठली, कीं 'मोली' लोकांनीं खलबत करून या सभेवर पूर्ण बहिष्कार घालण्याचें ठरविलें आहे. आपल्यांपैकीं कोणीही हजर राहिलें नाहीं म्हणजे सभेचें महत्त्व कमी होऊन तिचें काम लंगडें पडेल अशा कल्पनेनें त्यांनीं हा बेत केला असावा असें लोकांना वाटलें. परंतु ऐन सभेच्या वेळीं पहिल्या सहा सात बांकांवर 'मोली' लोकांपैकीं गाळीव गाळीव गुंड विराजमान झालेले दिसले. नंतर असें कळलें, कीं आपल्या पक्षानें केलेल्या ठरावाला न जुमानतां ही मंडळी सभेंत शिरली होती. सभेंतील पुढाऱ्यांना चांगला मार देऊन सभा मोडून टाकावयाची या उद्देशानेंच ते तयारी करून आले होते; व त्यांनीं त्याप्रमाणें केलेंही. 'मोली' कोणत्या किंमतीचे असतात याचा हा एक मासलेदार पुरावाच होता. स्वयंसेवकांच्या चळवळीचा सारा इतिहास ज्यांना माहीत आहे त्यांना हें केव्हांही पटेल, कीं सर एडवर्ड कार्सन आणि आल्स्टरमधील स्वयंसेवक यांना तिच्या यशाच्या श्रेयाचा फार मोठा भाग देणें उचित आहे. अल्स्टरचे स्वयंसेवक अस्तित्वांत होते म्हणूनच कॉर्कमध्यें 'आयरिश स्वयंसेवकां'ची सभा भरविणें शक्य झालें; आणि अल्स्टरच्या स्वयंसेवकांचें अस्तित्व कायम टिकलें म्हणूनच आयरिश स्वयंसेवकांचा नायनाट करणें त्यांच्या शत्रूंना अशक्य होऊन बसलें. भावी इतिहासकार जेव्हां शांत चित्तानें या काळाचा इतिहास लिहील तेव्हां तो हीच गोष्ट स्पष्ट केल्याखेरीज राहणार नाहीं. हें ओळखूनच सभेच्या

वेळीं भाषण करतांना प्रोफेसर मॅक्नील यांनीं अल्स्टर स्वयंसेवकांचा गौरव केला. पण हे गौरवाचे शब्द मॅकनील यांच्या तोंडून बाहेर पडतांच एखादी इशारत मिळावी त्याप्रमाणें पुढील बांकांवर टपून बसलेले 'मोली' एकदम उठून उभे राहिले व त्यांनीं व्यासपीठावर हल्ला केला. मोठी मारामारी आणि दंगल झाली. दोन्ही पक्षांच्या कित्येक माणसांना जबर दुखापती झाल्या. एका गुंडानें तर सभेचे अध्यक्ष मि. वॉल्श यांच्या मस्तकावर खुर्ची फेंकून मारली व ते बेशुद्ध होऊन खालीं पडले.

पण या मारामारीनें सभा बंद पडली तरी चळवळ बंद पडली नाहीं. कॉर्कमध्यें स्वयंसेवकांच्या उभारणीला त्या सभेपासून सुरवात झाली ती झालीच. ज्यांनीं या चळवळीचा पुढाकार घेतला होता ते दिलाचे बळकट होते. त्यांनीं सारी व्यवस्था केली, कवाइतीसाठीं जागा मिळविली, आणि जे थोडे स्वयंसेवक नांव नोंदविण्यास पुढें आले तेवढयांनाच घेऊन त्यांनीं आपल्या कामाला जारीनें प्रारंभ केला. जणूं काय 'मोली' लोकांचा त्यांना विरोध नसून पाठिंबाच आहे असा त्यांच्या उत्साहावरून लोकांना भास झाला!

याच चळवळींत टेरी पुढारी म्हणून पुढें आला, आणि त्याच्या अंगच्या पोलादी करारीपणाला सुपीक क्षेत्र मिळालें. 'मातृभाषासेवक वाङ्मयमंडळां'त टेरीबरोबर काम करणाऱ्या एका तरुणानें, त्याचा व टेरीचा बहुतेक प्रसंगीं मतभेद होत असूनही, टेरीच्या स्वभावाविषयीं असें लिहून ठेवलें आहे, कीं 'आपल्या मनापुढें ठेवलेल्या उच्च ध्येयाला अनुसरून वागण्याचा त्याचा निश्चय आणि आग्रह पाहून मला त्याचें मोठें कौतुक वाटत असे.' स्वयंसेवक चळवळीच्या बाल्यावस्थेंत टेरीच्या या गुणांचा अतिशय उपयोग झाला. त्या चळवळीचें ध्येय आणि धोरण एकदां कायम झाल्यानंतर टेरीच्या मनांत शंका कुशंकांना थारा मिळणेंच शक्य नव्हतें. आपल्या कार्यांत आपल्याला अपयश येईल ही कल्पना जणूं काय त्याच्या मनाला चुकून देखील शिवत नसे. या

चळवळीचा शेवट आयर्लंडच्या स्वातंत्र्यांत होणार असा त्याचा पक्का विश्वास होता, व आपल्या अंतःकरणांतील विश्वासानें त्यानें सभोंवतींच्या माणसांचीं अंतःकरणेंही प्रदीप्त केलीं. टेरीच्या या विश्वासांत आणि कार्याविषयींच्या कळकळींत त्याला एक अनुरूप जोडीदार मिळाला. त्याचें नांव टॉम कार्टिन. या दोघांच्या स्वभावांत अनेक प्रकारचें वैधर्म्य होतें हें खरें; परंतु इंग्लंडपासून आयर्लंड विभक्त झालेंच पाहिजे असा दोघांच्याही मनाचा सारखाच आग्रह होता, काम करण्याची दोघांचीही तडफ सारखीच होती, आणि संकटें डोक्यावर कोसळत असतांना आनंदांत राहण्याची दोघांचीही वृत्ति सारखीच होती. स्वयंसेवकांच्या चळवळीला तोंड फुटल्यापासून अगदीं साहजिकपणें हे दोघे तिच्या अग्रभागीं उभे राहिले; आणि जिवंत जीव असेपर्यंत त्या दोघांनीं मोठ्या धैर्यानें, कुशलतेनें आणि प्रतिकारी अडथळ्यांना न जुमानतां ती चळवळ पुढें ढकलली.

कॉर्कमधील स्वयंसेवकांच्या पहिल्या कवाइती कांहीं मोठ्या उत्साहवर्धक नव्हत्या. कवाइतीसाठीं सोइस्कर जागा मिळविण्याइतके पैसे गोळा करतां करतांच या तरुण मंडळींना किती सरी खटपटी कराव्या लागल्या, आणि शेवटीं जी जागा मिळाली तीही लहानशीच होती. पुरे पंचवीस स्वयंसेवकही त्यांत धड मावत नव्हते. पण टेरी वगैरे मंडळींनीं धीरानें कामाला प्रारंभ केला. सैन्यांतून पेन्शन मिळालेले शिपाई शिक्षकाचें काम करावयास मिळाले, हळू हळू कवाइती नेमानें चालू झाल्या आणि उमेदवारांची भरती होऊं लागली. अशा स्थितींत चळवळीला मोठी उचल देणारी एक गोष्ट घडून आली. कॉर्कच्या दाणेबाजारांतील व्यापाऱ्यांचीं आर्जवें करतांच त्यांनीं दाणेबाजाराचें मैदान कवाइतीसाठीं दिलें. यामुळें या चळवळवाल्या लोकांची एक मोठी गरज दूर झाली. कॉर्कच्या शहरवासीयांना या चळवळीबद्दल सहानुभूति वाटूं लागल्याचें हें पहिलें चिन्ह होतें. थोडयाच दिवसांत लोकांचें कुतूहल अधिक

वाढलें, आणि दाणेबाजाराच्या प्रशस्त मैदानांत कवाईत चालू झाली, कीं स्त्रीपुरुषांचे थवेच्या थवे मैदानाभोंवतालच्या कठडयावर रेलून कौतुकानें त्या तरुण स्वयंसेवकांकडे पाहूं लागले. शहरच्या रस्त्यांतून एकदां लष्करी मिरवणूक काढण्याची स्वयंसेवकांची फार इच्छा होती. पण त्यासाठीं चांगली तयारी करणें जरूरीचें होतें. म्हणून कवाइतीचें काम जारीनें सुरू झालें. आपली प्रगति होत आहे, आपण रोज एकेक पाऊल पुढें टाकीत आहोंत, असें सर्व स्वयंसेवकांना सारखें वाटत होतें व प्रत्येकजण लष्करी मिरवणुकीसाठीं उत्सुक झाला होता. अखेर पुरेशी तयारी झाली असें पथकाच्या पुढाऱ्यांना वाटलें, व अमुक दिवशीं शहराच्या रस्त्यांतून पथकाची जाहीर लष्करी मिरवणूक निघेल असें त्यांनीं जाहीर केलें.

या मिरवणुकीचें एका स्वयंसेवकानें लिहून ठेवलेलें वर्णन फार सुंदर आहे,व त्यावरून त्या स्वयंसेवकांच्या त्या वेळच्या मनःस्थितीची आपल्याला चांगली कल्पना पटते. तो म्हणतो, 'ती मिरवणूक म्हणजे एक विलक्षण अनुभव होता. मिरवणुकीला प्रारंभ होण्यापूर्वीं आम्ही जेव्हां मैदानांत रांगेरांगेनें उभे राहिलों तेव्हा मैदानापलीकडचा रस्ता माणसांनीं नुसता फुलून गेलेला आम्हांला दिसला. आणि झोंकदार मोजकीं पावलें टाकीत जेव्हां आम्ही मैदानाबाहेर आलों तेव्हां येवढा मोठा समाज पण तो अगदीं स्तब्ध होऊन आमच्याकडे पहात राहिला. आम्ही कोणी तरी मोठे आहोंत अशी आमचें मन आम्हांला साक्ष देत होतें, व लोकांना आम्ही कसे दिसत असूं असें आम्ही आपापल्या मनाशीं आश्चर्य करीत होतों. आमच्या मिरवणुकीला प्रारंभ झाल्यावर थोडयाच वेळांत रस्त्यावर उभ्या राहिलेल्या माणसांपैकीं एक दोघांनीं टवाळी करण्याचा प्रयत्न केला. पण एका जबरदस्त व्यक्तीनें त्यांना चांगली समज देतांच ती टवाळी जिरून गेली व मग तिनें केव्हांच डोकें वर काढलें नाहीं. जिकडे तिकडे शांतताच नांदत होती, आणि

मोठ्या कौतुकानें प्रत्येकजण आमच्याकडे पहात होता. मिरवणुकींत चालतां चालतां मला वाटलें, कीं प्रेक्षकांपैकीं कितीजणांना तरी आमच्यांत मिसळण्याची इच्छा झाली असेल. लोक आपल्याला हंसतील असल्या पोकळ लज्जेनें ते मागें राहिले इतकेंच. तथापि त्या वेळच्या त्या गंभीर देखाव्याच्या जादूचा त्यांच्याही मनावर परिणाम झालाच असला पाहिजे. एका रस्त्यांतील जो अनुभव तोच बाकीच्या रस्त्यांतीलही. आमची मिरवणूक ज्या ज्या रस्त्यानें गेली त्या त्या रस्त्यांत लोकांची गर्दी झालेली दिसे. त्या गर्दीवरून लोक आम्हांला अनुकूल होते असेंही म्हणतां आलें नसतें, किंवा ते प्रतिकूल होते असेंही सांगतां आलें नसतें. येवढें मात्र खरें, कीं हा काय प्रकार आहे अशा कुतूहलानें त्यांची दृष्टि आमच्याकडे लागलेली होती, आणि आम्हां तरुणांची ती मिरवणूक पाहून त्यांच्या अंतःकरणांतील अनेक निद्रित भावना जाग्या होऊन त्यांना क्षणभर कांहीं विलक्षणच अनुभव आला असला पाहिजे. त्या दिवशीं पाऊस पडत होता, पण त्याची आम्हांला यत्किंचितही क्षिति वाटत नव्हती; आणि ब्लार्नेच्या अर्ध्या वाटेवर आम्ही असतां टॉम कर्टिननें जेव्हां आम्हांला ' स्टँड अॅट ईझ ' असा हुकूम दिला तेव्हां आम्ही अगदीं खरेखुरे शिपाई असल्यासारखें आम्हांला वाटलें. येथून पुढें जातांना आम्ही अधिक निश्चयानें पावलें टाकीत होतों. शेवटीं आम्ही ब्लार्नेला पोंचलों, आणि पोलिस नाक्याच्या अगदीं समोर मोठी सभा होऊन टेरीनें भाषण केलें. आमची मिरवणूक कॉर्कमध्यें परत शिरली तेव्हां रात्र होऊन अंधार पडला होता. अंधारांत लोकांना आम्ही नीटसे दिसत नव्हतों. आमच्या बुटांचा धप् धप् असा आवाज तेवढा लोकांना ऐकूं येत होता. वाटेंत एके ठिकाणीं आम्हांला एक धर्मोपदेशक भेटले. आम्हांला पाहतांच ते थबकले, त्यांनीं आपली टोपी डोक्या-वरून दूर केली, आणि सद्गदीत कंठानें ते म्हणाले "मर्द हो शाबास! कांहीं झालें तरी देव तुमचा पाठीराखा आहे !"

प्रकरण नववें

## डाव जिंकणार—इतक्यांत–!

कॉर्क शहरांतील ती मिरवणूक दिसण्यांत एक साधी गोष्ट होती, पण तिनें फार मोठें काम केलें. पथकांतील सर्व स्वयंसेवकांना आपल्या लढाऊ पेशाची जाणीव तिच्यामुळें उत्पन्न झाली हें तर खरेंच. पण याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे नव्या पिढीच्या अंगांत कार्याची खरी निष्ठा आणि कार्य करण्याची धमक आहे अशी जनतेची खात्री पटली. त्या दिवसापासून कॉर्कमधील लोकमताला कोलांटी मिळाली, आणि लोकांची सहानुभूति स्वयंसेवकांच्या बाजूला वळूं लागली. त्या दिवसापासून तों त्या चळवळीचा निःपात करण्याचा रेडमंडनें प्रयत्न केला त्या दिवसापर्यंत कॉर्कमधील प्रमुख राष्ट्रीय पुढाऱ्यांचा तिला पूर्ण पाठिंबा होता. शिवाय, पैशाची अडचणही हळू हळू दूर व्हावयास लागली.

साऱ्या आयर्लंडभर स्वयंसेवकांचीं पथकें तयार होऊं लागलीं. जुन्या पिढीचे पुढारी आपल्या खाजगी वजनाचा शक्य तितका उपयोग करून चळवळीचा पाय मागें ओढण्यासाठीं धडपडत होते, व त्या पक्षांतील नवे होतकरू वक्ते रिचर्ड हॅझल्टन यांनीं तर उघड उघड चळवळीवर स्वारी चढविण्याचा उपक्रम केला. पण कोणाच्याही खाजगी वजनाची किंवा वक्तृत्वाची या वेळीं डाळ शिजणें शक्य नव्हतें. पूर्वी राजकारणांत लोक लक्ष घालीत नसत. पण, या नव्या चळवळीनें लोकांच्या मनांत विलक्षण उत्साह उत्पन्न केला, आणि कल्पनेपलीकडे त्यांनीं तिचा पुरस्कार केला. त्यामुळें चळवळ सारखी पुढें पुढें चालली. कांहीं केल्या ती मागें हटेना. शेवटीं तिच्याकडे उपेक्षावृत्तीनें पाहून आतां यापुढें भागणार नाहीं अशी जुन्या पक्षाची खात्री पटली; आणि स्वयंसेवकांचीं पथकें चिरडून टाकतां येत नाहींत, तर आपल्या लोकांचा त्यांत भरणा करून तीं काबीज कराव-

याचीं, आणि त्यांचे दांत उपटून काढून त्यांना निरुपद्रवी करून टाकावयाचें असें जुन्या पक्षांतील मंडळींनीं ठरविलें.

या बेताला अनुसरून जॉन रेडमंड यांनीं एकाएकीं डब्लिन येथील स्वयंसेवकांच्या कमिटीला एक पत्र धाडून कळविलें, कीं मी नेमीन ते पंचवीस सभासद तुम्ही आपल्या कमिटीवर घेतले पाहिजेत, नाहीं तर तुमचे स्वयंसेवकांचें पथक आम्ही मोडून टाकूं. हें पत्र कमिटीला धाडूनच रेडमंड स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं त्या पत्राच्या प्रति सर्व वर्तमानपत्रांकडे पाठविल्या, आणि आपल्या पक्षाचीं व 'मोली' पक्षाचीं सारीं यंत्रें सुरू करून दिलीं. 'जा मरा, वाटेल तें करा' असा रेडमंड यांना रोख ठोक जबाब द्यावा असें पथकांतील स्वयंसेवकांच्या मनांत होतें. परंतु असला कांहीं आततायीपणा करणें बरें नव्हे असें कमिटीचें मत पडलें. असल्या जबाबानें चळवळच नष्ट होईल असा विचार करून त्यांनीं रेडमंडचे लोक कमिटीवर घेण्याचें कबूल केलें. रेडमंडच्या या उपद्व्यापाचा खरा हेतु काय हें ओळखणें कांहीं फारसें अवघड नव्हतें. रेडमंडचे पंचवीस लोक एकदां कमिटींत शिरले म्हणजे कोणत्याही प्रश्नावर मतें घेण्याचा प्रश्न आला कीं त्यांचें मताधिक्य होणार हें उघड होतें. आणि हाच तर्क शेवटीं खरा ठरला. कारण शस्त्रसामुग्री मिळवून स्वयंसेवकांचें लढाऊ सामर्थ्य खरेंखुरें करण्याचा प्रश्न कमिटीपुढें निघाला तेव्हां रेडमंडचे लोक आडवे पडले आणि कमिटीच्या लोकांना त्यांच्याशीं चांगलेंच झगडावें लागलें.

डब्लिनमध्यें जें झालें तेंच कॉर्कमध्येंही झालें यांत आश्चर्य नाहीं. कॉर्कमधील मंडळींनींही शहाणपणाचें धोरण स्वीकारून रेडमंडचे व ओब्रायनचे लोक कमिटीवर घेतले आणि मग दोन्ही पक्षांची जी झटापट सुरू झाली ती कांहीं विलक्षण होती. स्वयंसेवकांची चळवळ आपल्या मुठींत ठेवण्यासाठीं दोन्ही पक्षांनीं अटोकाट प्रयत्न चालविले, व भांडतां भांडतांही एकमेकांविषयीं स्नेहबुद्धि दाखविण्याचें नाटक

चालू ठेविलें. विरुद्ध पक्षाचें मताधिक्य होऊं नये म्हणून टेरी आणि टॉम यांना प्रत्येक बैठकीला बिनचूक हजर राहिल्याशिवाय गत्यंतर नसे. इतकेंच नव्हे तर अगदीं एका सेकंदाचा देखील विलंब न करतां त्यांना सभास्थानीं जावें लागे. नाहीं तर त्यांच्या गैरहजिरींत वाटेल ते ठराव पुढें आणून ते पास करून घेण्याच्या संधीची रेडमंडचे लोक डोळ्यांत तेल घालून वाट पहात बसलेले असत.

स्वयंसेवकांच्या पथकांत सामील होण्यासाठीं टेरीनें व इतर पुढाऱ्यांनीं देशांतील साऱ्या लोकांना हांक मारली, व तिचा परिणाम चांगला होऊं लागला. लोक भराभर सामील होऊं लागले, आणि पथकांची संख्या वाढूं लागली. मॉरिस टाल्बट क्रॉस्बी नांवाचे जमीनदार पूर्वीं रॉयल एंजिनिअर्समध्यें कॅप्टन होते त्यांना स्वयंसेवकांच्या पुढाऱ्यांनीं ब्रिगेड कमांडर नेमलें, टॉमस कार्टिन यांना व्हाइसकमांडर नेमण्यांत आलें, आणि स्वयंसेवक होण्याची झुलूडच देशांत चहूंकडे उठली. रेडमंडचे लोक कमिटीवर असल्यामुळें पुष्कळांचा असा समज झाला, कीं स्वयंसेवकांची सारीं सूत्रें रेडमंडच्याच हातीं आहेत; आणि या गैरसमजाचा चांगला परिणाम असा झाला, कीं जे लोक स्वयंसेवकांत सामील होतील असें कधीं कोणाच्या स्वप्नांत देखील आलें नसतें असे लॉर्ड फिंगालसारखे सरदार पथकांत आले. हा एकंदर प्रकार विनोदपूर्ण तर खराच, पण असल्या विनोदाचा आस्वाद घेण्यास क्षणाची देखील टेरीला व त्याच्या सहकारी मित्रांना फुरसत नव्हती. शक्य तितक्या अधिक स्वयंसेवकांची भरती करणें, आणि ज्यांची भरती झाली असेल त्यांना उत्तम रीतीनें तयार करणें या कामांतच त्यांचे रात्रंदिवस भराभर जात होते.

चळवळ अशा स्वरूपांत असतांनाच महायुद्धापूर्वींचे संस्मरणीय असे अद्‌भुत प्रसंग घडून आले. जर्मनीला इंग्लंडकडून निर्वाणीचा खलिता गेला त्याच्या दहा पंधरा दिवस अगोदर एक महत्त्वाची गोष्ट घडून आली. डब्लिनच्या स्वयंसेवकांनीं एका ठिकाणचा बंदुकांचा

सांठाच्या सांठा पळविला, पोलिसांना आणि पहारेकऱ्यांना थोपवून धरलें, आणि पळविलेल्या बंदुका खांद्यावर टाकून डब्लिनमध्यें त्यांनीं ऐटीनें लष्करी थाटांत प्रवेश केला. पूर्वी एकदां अल्स्टरच्या स्वयंसेवकांनीं लार्ने येथें असल्याच तऱ्हेचा प्रकार केला होता, पण सरकारनें तिकडे दुर्लक्ष केलें होतें. अल्स्टरच्या स्वयंसेवकांचा खोडकरपणा सरकारला एक वेळ खपण्यासारखा होता. पण डब्लिनचे स्वयंसेवक अगोदरच गैरमर्जीतील असल्यामुळें त्यांची उपेक्षा होण्याची आशा नव्हती. डब्लिन-च्या पोलिसांनीं व लष्करी शिपायांनीं या स्वयंसेवकांना रस्त्यावर आड-वून धरलें. थोडा वेळ चांगलीच चकमक उडाली, व नंतर मोठ्या शिताफीनें स्वयंसेवक बंदुकांसकट निसटले. लष्करी लोक या फजितीनें चिडून गेले आणि त्यांनीं डब्लिनमध्यें शिरून एका ठिकाणच्या निःशस्त्र जमावावर खुशाल गोळीबार केला. त्या गोळी-बाराच्या धूमधडाक्यांत कित्येक निरुपद्रवी स्त्रीपुरुष प्राणांस मुकले. आज आयर्लंडमध्यें मृत्यु ही गोष्ट अगदीं रोजच्या साध्या व्यवहारांतील होऊन बसली आहे, रोज कोठें ना कोठें तरी रक्तपात होत आहे, कोण केव्हां प्राणास मुकेल त्याचा नियम नाहींसें झालें आहे, व एखादा मनुष्य पिस्तुलाच्या गोळीनें एकदम गतप्राण होऊन पडला तर कोणासच त्याचें विशेष कांहीं वाटत नाहीं. पण ते दिवस निराळे होते. त्या गोळीबाराच्या अत्याचारानें साऱ्या आयर्लंडांत विलक्षण खळबळ उडून गेली. सरकार पक्षपाती आहे, अल्स्टरच्या स्वयंसेवकांसाठीं एक कायदा आणि 'आयरिश' स्वयंसेवकांसाठीं दुसरा कायदा असल्या कुटिल नीतीनें सरकार वागत आहे, अशी जोराची एकच हांकाटी साऱ्या देशभर होऊन राहिली; आणि इंग्लंडच्या धोरणाच्या तीव्र निषेध व्यक्त करण्याकरितां ठिकठिकाणच्या पथकांत शेंकडों लोक शिरूं लागले. त्या गोळीबारानंतरचे दहा पंधरा दिवस आयर्लंडच्या स्मरणांतून कधींही जाणार नाहींत. देशांत जिकडे तिकडे उत्साह व त्वेष उचंबळला होता.

स्वयंसेवकपथकांत दाखल होण्यासाठीं इतके उमेदवार रोजच्या रोज पुढें येऊं लागले, कीं त्या सर्वांची सोय करणें कठीण होऊन बसलें. अनेक प्रकारच्या लाकांकडून अनेक प्रकारची मदत न मागतां येऊं लागली. कोणी शस्त्रसामुग्री विकत घेण्यासाठीं पैसे दिले, कोणी शस्त्रसामुग्री वाहून नेण्यासाठीं आपल्या मोटारी देऊं केल्या, तर कोणी समुद्रावर मालाची नेआण करण्यासाठीं आपल्या सुंदर विहारनौका देखील द्यावयास पुढें आले. टेरीच्या आनंदाला पारावर राहिला नाहीं. प्रत्येकाकडे हास्यवदनानें पहात तो अनेक कामें झटपट आंवरीत होता. स्वयंसेवकांचा तो जंगी समूह पाहून टॉमस कार्टिनला आवेश चढला होता. त्या वेळीं सर्वांना असें वाटलें, कीं आयर्लंडला ही सोन्यासारखी संधि मिळाली आहे, आणि या वेळीं मोठया कुशलतेनें आयर्लंड वागलें तर त्याचें काम झाल्यावांचून राहणार नाहीं. आयर्लंड खडबडून पुरतें जागें झालें होतें; आणि या झालेल्या जागृतीलाच स्थायिक स्वरूप देण्याइतका आणि सामान्य जनतेला नीट उभी करून तिची पुरती तयारी करण्याइतका अवधि जर आयर्लंडला मिळाला असता, तर इंग्लंडच्या सैन्याएवढें प्रचंड सैन्य जमवून इंग्लंडशीं टक्कर दिल्यावांचून आयर्लंड खास राहिलें नसतें. जुन्या राजकीय पक्षांचीं बंधनें तटातट तोडून राष्ट्रीय विचाराच्या सार्‍या माणसांनीं स्वयंसेवकांच्या चळवळींत उड्या टाकल्या होत्या, आणि आयर्लंडला स्वतंत्र करून सोडण्याची खरी शक्ति आपल्या हातांत जवळ जवळ आली, आतां अगदीं थोडी मजल राहिली अशा अधीर आशेनें प्रत्येकाचें हृदय धडधडत होतें. लोकांना या वेळीं दुसरें तिसरें कांहीं सुचत नव्हतें. या चळवळीचें कार्य होतें इकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलें होतें.

लष्करी लोकांनीं असहाय स्त्रीपुरुषांवर झाडलेल्या त्या गोळीबाराचे प्रतिध्वनि थांबले असतील नसतील तोंच इंग्लंडनें जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारल्याची बातमी आयर्लंडमध्यें येऊन थडकली. इंग्लंडचें जर्मनी-

विरुद्ध युद्ध! तें ऐकतांच टेरीला तर वाटलें, कीं ज्या प्रसंगाची आपण इतके दिवस वाट पहात होतों तोच प्रसंग आला! प्रत्यक्ष प्राणावर बेतल्याप्रमाणें निकरानें कराव्या लागणाऱ्या त्या युद्धांत आयर्लंडच्या मदतीची इंग्लंडला अत्यंत जरूरी लागेल हें उघड होतें. आणि आतां मागच्या बोअर युद्धाच्या वेळच्यासारखें आयर्लंड निःशस्त्र आणि स्तब्ध नसून तीन लाख सैनिक आज आयर्लंडमध्यें जय्यत तयार होते. इतकी अप्रतिम सामुग्री इंग्लंडला दुसरीकडे मिळणें शक्य नव्हतें. अशा परिस्थितींत टेरीला वाटलें, कीं जॉन रेडमंड देखील आतां आपल्या हातांतील पानें सर करून घेईल, जरी त्याची इच्छा नसली तरी आपण त्याला तसें करावयास भाग पाडूं आणि त्यानें आयर्लंडला दगा दिला तरी स्वयंसेवक आपल्या मायदेशाला कधींही विसरणार नाहींत. इंग्लंडवरील संकट म्हणजे आयर्लंडची खरी संधि होय असें टेरीला व इतरांनाही वाटलें. आतां कदाचित रक्ताचा एक थेंबही न सांडतां,पण तसें न झालें तर रक्तपात करून तर खात्रीनेंच आयर्लंड स्वातंत्र्य मिळवील असे विचार टेरीच्या मनांत येऊं लागले. त्या आनंदांत तो व त्याचे साथीदार होते.

इतक्यांत सर्वांच्या मनाला आश्चर्याचा धक्का देणारी बातमी आली. इंग्लंडच्या सेवेसाठीं आयर्लंडला आपण तयार करूं अशा तऱ्हेचें आश्वासन जॉन रेडमंडनें कॉमन्स सभेंत दिल्याचें ऐकून तर प्रत्येकजण आश्चर्यानें थक्कच झाला, आणि स्वयंसेवकांच्या कमिटीनें जॉन रेडमंडच्या भाषणाचा तावडतोब निषेध केला नाहीं याचें तर लोकांना त्याहीपेक्षां अधिक आश्चर्य वाटलें. कांहीं काळानें लोकांना समजलें, कीं ठिकठिकाणच्या कमिट्यांत असलेल्या रेडमंडच्या बगलबच्चांना त्याच्याकडून हुकूमच आले होते,आणि इंग्लंडला अडवून धरण्याऐवजीं मदत करण्याकरितां सारीं स्वयंसेवकांचीं पथकें तयार करण्यासाठीं त्यांनीं आपलें शक्तिसर्वस्व खर्च करण्याचें ठरविलें होतें. विभक्त

स्वराज्यवादी पत्रांखेरीज बाकीचीं सारीं वर्तमानपत्रेंही रेडमंडचीच री ओढूं लागलीं. हें सारें पाहतांच टेरी पुरतें समजला, कीं आतां आपलें उच्च ध्येय कायम ठेवण्याला जुन्या पक्षाशीं दोन हात करावेच लागणार. कॉर्क कमिटींतील दोन्ही पक्ष एकमेकांवर करडी नजर ठेवून वागूं लागले. पण दैवगति फिरल्याप्रमाणेंच साऱ्या गोष्टी होऊं लागल्या. जागोजागचीं पथकें साम्राज्याला मदत करण्याच्या मोहक कल्पनेला बळी पडून रेडमंडच्या बाजूला जाऊं लागलीं. विभक्त स्वराज्यवाद्यांचा आवाज त्या हलकल्लोळांत ऐकूंही येईनासा झाला. सारा देश वेडा झाला कीं काय, असें टेरीला वाटूं लागलें. शेवटीं आपण कोणत्या मार्गानें जावें हें ठरविण्यासाठीं कॉर्कच्या स्वयंसेवकांची दाणेबाजारांत प्रचंड सभा झाली. कॅप्टन टाल्बट क्रॉस्बी यानें भावनापूर्ण नाटकी भाषण करून रेडमंडच्या मागोमाग जाण्याचा स्वयंसेवकांस उपदेश केला. बहुतेक स्वयंसेवक रेडमंडला जाऊन मिळाले, आणि टेरीच्या निशाणाभोंवतीं अगदींच थोडे स्वयंसेवक उरले. ज्या चळवळीची टेरीला अतोनात आशा होती त्या चळवळीचा शेवटीं अशा रीतीनें भंग झाला.

## प्रकरण दहावें

# पुन्हां ढग निवळले

रेडमंडनें स्वयंसेवकांत फाटाफूट पाडली त्या वेळीं आयरिश स्वयंसेवकांच्या पथकांत एकंदर जवळ जवळ अडीच लाख लोक होते. त्यांपैकीं अवघे आठ हजार तरुण पिढीच्या पक्षाला चिकटून राहून बाकी सारे रेडमंडला जाऊन मिळाले. डब्लिनमध्येंच काय तें मूळ कमिटीचें वजन कायम राहिल्यासारखें दिसलें. बाकी सर्व ठिकाणीं मूळच्या कमिटीच्या बाजूला मूठभरच लोक दृष्टीस पडत होते; आणि या मूठभर लोकांना आतां रेडमंडच्या प्रबळ पक्षाशीं टक्कर द्यावयाची होती !

हे मूठभर लोक वगळले तर बाकीच्या साऱ्या आयर्लंडची दिशाभूल झाली होती. पुढाऱ्यांनीं भलती दिशा दाखविल्यामुळें, आणि वर्तमानपत्रांनींही विश्वासघात केल्यामुळें सरकारच्या साथीदारांच्या साऱ्या गप्पा लोकांना खऱ्या वाटत होत्या. आयर्लंडच्या स्वराज्याला जी मंडळी खरोखर इमानानें जागली त्यांच्यावर शिव्याशापांचा वर्षाव वर्तमानपत्रें करीत होतीं, त्यांना आयर्लंडचे शत्रू म्हणण्यांत व्याख्यात्यांची चढाओढ लागली होती, आणि ते धर्मविहीन आहेत, जर्मन लोकांची लांच त्यांनीं खाल्ली आहे, असले आरोप त्यांच्यावर करण्यासही त्यांच्या हितशत्रूंनीं कमी केलें नाहीं. त्यांच्याविषयीं वाटेल त्यानें वाटेल तें बरळावें अशी स्थिति होऊन बसली होती. पूर्वीं तरुण पिढीचें स्वयंसेवकांवर वर्चस्व होतें तेव्हां जुन्या पक्षांतील लोक जरा जपूनच बोलत चालत असत. पण आतां त्यांना पुरतेंच फावलें. त्यांच्या जिव्हा आतां वाटेल तशा चालूं लागल्या. आजपर्यंत पोटांत धरून ठेवलेलें गरल भराभर ओकण्याचा त्यांनीं आतां सपाटा लाविला. तरुण पिढी गारठून गेल्यासारखेंच लोकांना वाटलें.

कॉर्कमध्यें तर तरुण पिढीचा पुरताच पाडाव झाला होता. इतर

ठिकाणीं जुन्या पक्षाचा जोर ज्यावेळीं कमी होता त्या वेळींही ओब्रायनच्या विदुषकी चेष्टांमुळें कॉर्कमध्यें तो कायम होता. मग आतां तर काय, ओब्रायन, रेडमंड आणि डेव्हलिन इतक्यांचे जोर एकत्र झाले! मग या भपकेबाज बडे मिय्यांच्या बाजूला लोकमत सर्वस्वी झुकलें तर त्यांत आश्चर्य तें कसलें? लोकमताच्या प्रतिकूल प्रवाहांत जुने आयरिश स्वयंसेवक पुरे बुडाले—अगदीं गळ्यापर्यंत बुडाले. त्यांचीं डोकीं तेवढीं वर राहिलीं.

परंतु त्यांचीं डोकीं वर राहिलीं हेंच पुष्कळ झालें. कारण त्यांचीं डोकीं स्वातंत्र्याच्या वाऱ्यानें भरलेलीं होतीं, आणि पुढें काय केलें पाहिजे याविषयींचा स्पष्ट विचार त्यांत जागृत होता. त्यांनीं पुन्हां नव्या दमानें आपल्या कार्याला प्रारंभ केला.

कॉर्कमध्यें तरुण पिढीचे लोक थोडेच होते हें खरें. पण बुद्धिमान आणि कार्यक्षम म्हणून साऱ्या शहरांत नाणावलेले लोक त्यांच्यांतच होते; आणि टेरी व टॉम कर्टिन हेही त्यांच्यांतच होते. टेरी व टॉम म्हणजे कॉर्क शहराचे दोन मोहरे होते. सध्यांच्या प्रतिकूल स्थितीनें डगमगून न जातां त्यांनीं आपला धीर कायम ठेवला, आपल्या मताचे लोक व स्वयंसेवक एके जागीं गोळा केले, दाणेबाजाराची जागा आतां त्यांना मिळण्यासारखी नव्हती म्हणून त्यांनीं दुसरी जागा मिळविली, आणि आपल्या पक्षाच्या स्वयंसेवक पथकाचें काम पूर्वींप्रमाणेंच चालू ठेवलें. टेरीनें कवाइती चालू ठेवल्या, लष्करी थाटाच्या मिरवणुकीही चालू ठेवल्या, इतकेंच काय, लोकमताचा वारा आपल्याविरुद्ध वहात आहे हें माहीत असूनही आपल्या पथकासाठीं नवे स्वयंसेवक मिळविण्याचें काम करण्यासही तो कचरला नाहीं. आणि नवल हें, कीं टेरीच्या पथकांत नव्या स्वयंसेवकांची भरती होऊं लागली. त्या वेळीं आयर्लंडमध्यें सगळीकडे हाच प्रकार दृष्टीस पडला. ठिकठिकाणीं दोन चार विभक्त स्वराज्यवादी 'आयरिश' स्वयंसेवक

राहिलेले होते त्यांनीं आपल्या कवाइती सुरू ठेवल्या आणि भरतीचें कामही सोडलें नाहीं. विभक्त स्वराज्यवाद्यांना फार वाईट दिवस आले होते. निश्चयानें झगडत राहिलें नाहीं तर आपल्याबरोबरच आपलीं मतें नामशेष होतील अशी भीति त्यांना स्पष्ट दिसत होती. प्रसंग मोठा आणीबाणीचा होता आणि या आणीबाणीच्या प्रसंगांत आपला पुढारी होण्यास खरा लायक पुरुष जर कोणी असेल तर तो टेरीच होय असें प्रत्येक विभक्त स्वराज्यवाद्याला वाटत होतें.

१९१४ सालच्या १९ सप्टेंबरला कॉर्क शहरांत एका नव्या साप्ताहिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. या साप्ताहिकाचें नांव 'फिआना फेल' असें होतें. त्याचे अकराच अंक प्रसिद्ध झाले, आणि ५ डिसेंबरचा अंक बाहेर पडला तो शेवटचाच. हें पत्र टेरीनें काढलें होतें, त्यासाठीं त्यानें आपल्या खिशांतील पैसे खर्च केले होते, आणि त्यांतील बहुतेक सर्व लेख त्याच्याच हातचे होते. ते लेख वाचतांच लोकांना स्पष्ट दिसून आलें, कीं एका विशिष्ट उच्च तत्त्वज्ञानानें प्रेरित झालेला, लढाई सदा चालू ठेवणारा, स्वयंसेवकांचें काम पुढें ढकलणारा, आणि साऱ्या सार्वजनिक चळवळींना चलन देणारा असा एक धैर्यशील, निश्चयी, जोमदार पुरुष कॉर्क शहरांत आहे. टेरीच्या पत्रावरील ध्येयभूत वाक्य त्याच्या आवडत्या मिशेलच्या तोंडचें होतें. 'एक वेळ ब्रिटिश साम्राज्य नाहींसें होईल, पण आयरिश लोकांची स्वातंत्र्याची आकांक्षा कधींही नष्ट होणार नाहीं!' त्या वेळीं आयर्लंडमधील बहुतेक वर्तमानपत्रें इंग्लंडच्या वर्तमानपत्रांची री ओढण्यावांचून दुसरें कांहीं करीत नसत. पण टेरीच्या पत्रांतील लेख स्वतंत्र विचारानें भरलेले असत. आयर्लंडविषयीं खरी भक्ति ज्यांच्या ज्यांच्या अंतःकरणांत जागृत होती त्यांना त्यांना टेरीचे लेख अमृतासारखे गोड आणि नवजीवनदायक वाटले. संकटांच्या परंपरेशीं झगडत कार्य करीत राहिलेल्या माणसाला खरा धीर जर कशानें मिळत असेल तर तो आपल्या

सारखेच लढत राहणारे दुसरेही लोक आहेत हें पाहून. कॉर्कमध्य टेरीनें काढलेल्या नव्या वर्तमानपत्राची धीराची हांक ऐकतांच आयर्लंडमध्यें जागोजागीं झगडत राहिलेल्या लोकांचीं निराश होत चाललेलीं अंतःकरणें एकदम प्रफुल्लित झालीं, आणि हातांतील समशेरीवरची गळाठत चाललेली त्यांची पकड पुन्हां दृढ झाली.

टेरीच्या स्वभावांत जे जे उत्कृष्ट आणि अविनाशी गुण होते ते ते 'फिआना फेल' या पत्रानें जगाच्या निदर्शनाला आणले. टेरीच्या अंगची तत्त्वनिष्ठा, सहिष्णुता, चिकाटी आणि त्याच्या विचारांची स्पष्टता त्या पत्रांतील लेखांनीं लोकांच्या अनुभवास आली. प्रतिपक्षी मुद्देसूद वादविवाद करण्याऐवजीं नुसता चिखल फेंकण्याचें काम जारीनें करीत असतांना टेरीनें आपल्या लेखांत असाधारण शांतवृत्ति कायम ठेवली होती. वीराच्या समशेरीप्रमाणेंच वीराची लेखणीही स्वच्छ असावी असें त्याचें मत होतें. आपल्या मतांचें समर्थन करतांना प्रतिपक्षाचें खंडन करण्याचा प्रसंग आला तरी सभ्यपणाचा तोल संभाळण्याचा त्यानें कटाक्ष ठेवला होता. पहिल्याच अंकांत त्यानें लिहिलें होतें, कीं 'केवळ बातम्या प्रसिद्ध करण्यासाठीं या पत्राचा जन्म झालेला नाहीं. तत्त्वांचा प्रचार करण्याकरितां त्यानें जन्म घेतला आहे. अंतरराष्ट्रीय आणि परराष्ट्रीय प्रश्नांचा निकाल आपल्याला पाहिजे तसा करण्याचा प्रत्येक देशाला असलेला जन्मसिद्ध हक्क आमच्या मातृभूमीला मिळवून देण्याला समर्थ असें धोरण ठरविण्यासाठीं या पत्राचा अवतार आहे. आमच्या देशाची कमींत कमी मागणी ही आहे.'

स्वयंसेवकांत दुफळी होण्यापूर्वीं एका अंकांत टेरी लिहितो, 'हें खास, कीं डेव्हलिननें, किंवा रेडमंडनें, किंवा दोघांनींही आयर्लंडचा खरोखर कैवार घेतला, आयर्लंडच्या एकाही जन्मसिद्ध हक्काला धक्का लागतां कामा नये अशा प्रतिज्ञेनें त्यांनीं आयर्लंडचा पुढाकार घेतला तर, साऱ्या आयर्लंडमधील मवाळ, जहाल वगैरे सर्व पक्षांचे लोक

त्यांच्या मागोमाग साता समुद्रांतून किंवा आगीच्या डोंबांतूनही चालत जावयास तयार होतील. आयर्लंडमध्यें कोणत्या पुढाऱ्याला अशी सोन्यासारखी संधि आजपर्यंत मिळाली असेल ? ही संधि ते वायां घालवितील असें आमच्या मनाला क्षणभरही पटत नाहीं. केवळ त्यांच्या आयर्लंडविषयक निस्सीम प्रेमामुळें ज्यांना प्रतिपक्षाकडून हेटाळणीनें ज्वलत् जहाल म्हणून संबोधण्यांत येतें त्यांना जुन्या पिढींतील पुढाऱ्यांशीं सहकारिता करण्याची बिलकुल इच्छा नाहीं असें म्हणणें म्हणजे सत्याचा विपर्यास आहे. उलट आयर्लंडचें खरें हित साधण्यासाठीं जुने पुढारी पुढें झाले तर त्यांना पाठिंबा देण्यास ते अत्यंत उत्सुक आहेत. जुन्या पुढाऱ्यांना झगडा करण्याचा कंटाळा आला आहे हें त्यांना समजतें. पण आपण तरणेताठे आहोंत, आपल्यांत अजून पीळ आहे, आपल्याला कंटाळा आलेला नाहीं, आणि दोन हात करण्यास आपण उत्सुक आहोंत, हें जुन्या पुढाऱ्यांनीं ध्यानांत घ्यावें अशी त्यांची इच्छा आहे. तरुण पिढीचा आपल्याला पाठिंबा आहे हें पुढाऱ्यांनीं विसरूं नये असें त्यांना वाटतें. तरुण पिढी आत्मयज्ञ करण्यास तयार आहे, आयर्लंडसाठीं हाल अपेष्टा सोसण्यास तरुण अधीर झाले आहेत आणि स्वातंत्र्यासाठीं एकदां शेवटचें निकराचें युद्ध करून यश मिळविण्याच्या प्रसंगाची ते वाट पहात आहेत, हें पुढाऱ्यांनीं ओळखावें अशी त्यांची इच्छा आहे.'

पुढील एका अंकांत तर टेरीच्या सुंदर विचारांची भरारी फारच उंच गेली होती. त्यानें म्हटलें होतें, 'साऱ्या आयर्लंडभर आगीचा प्रलय व्हावा असा आमचा प्रयत्न आहे, व त्यांत आम्हांला जो वैयक्तिक स्वार्थत्याग करावा लागेल त्याची आम्हांस कांहींच क्षिति वाटत नाहीं. स्वार्थत्यागांतील खरें मर्म कोणाला समजलें नसेल तर तें त्यानें प्रथम समजून घेतलें पाहिजे. आपल्या शत्रूचें रक्त सांडण्याची वेळ पुढें मागें येईल, पण आज त्या रक्ताचा एकही थेंब आपल्या देशांत ठिबकत

कामां नये. नाहीं तर नुसच्या सूडाच्या भावनेची आग भडकेल. उलट आयर्लंडच्या जमिनीवर प्रथम आयरिश रक्त सांडलें गेलें तर स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं अशा कांहीं हातघाईचें धर्मयुद्ध सुरू होईल, कीं साऱ्या पाशवी शक्ति एकत्र झाल्या तरी त्यांना तें दडपतां येणार नाहीं. लॉर्ड क्लॅरेंडनपुढें बिनधोक बोलतांना मिशेलच्या तोंडून जे उद्गार बाहेर पडले त्यांचें प्रत्येकानें मनन करावें. "लाटसाहेब, या कामांत माझे प्राण खर्ची पडतील हें मीं पहिल्यापासून ओळखलेलें आहे. पण मीं हेंही ओळखलेलें आहे, कीं मी जगलों किंवा मेलों, कांहीं झालें तरी विजयश्री माझ्याच बाजूला येणार! आणि आज ती मा ऱ्य बाजूची आहे हें तुम्ही पहातच आहांत!" अशा विजयश्रीचें मोल अजून आम्हांला समजलेलें नाहीं, तिच्याविषयीं अजून आम्हांला विश्वास वाटत नाहीं, हा आत्मविश्वास आम्ही नुक्ताच कोठें शिकूं लागलों आहोंत. आमचे स्वयंसेवक अद्यापि पुरे जागृत झालेले नाहींत, त्यांची पुरी तयारी झालेली नाहीं, त्यांची कसोटी पाहणारे प्रसंग आले पाहिजेत. मारीन किंवा मरेन असा बाणा त्यांच्या अंगीं उत्पन्न होण्यास मिशेलचें तत्वज्ञान त्यांच्या रोमरोमांत भिनलें पाहिजे. अतुल स्वार्थत्यागाच्या एका प्रसंगांतून ते धडाडीनें पार पडले तरी केवढें कार्य होईल. तेवढ्यानें त्यांना आत्मिक आनंदाचा अनुभव येईल, त्यांच्या निश्चयाची ज्वाला अधिक प्रखर होईल, आणि आयर्लंडला स्वातंत्र्याचे दिवस दाखविल्याखेरीज ते राहणार नाहींत!'

टेरीचे सर्व लेख अशा बाण्याचे होते. १९१४ च्या ५ डिसेंबरला 'फिआना फेल'चा शेवटचा अंक निघाला. त्यानंतर 'फिआना फेल', 'स्वतंत्र आयर्लंड' वगैरे सर्व विभक्त स्वराज्यवादी पत्रांची मुस्कुटदाबी करण्यांत आली. केवळ आपल्या एकट्याच्या जबाबदारीवर टेरीनें 'फिआना फेल' काढलें होतें, व पत्राच्या छपाईचे सारे पैसे चुकते करण्याची जबाबदारी सर्वस्वी त्याच्यावर होती. त्यानें आज

कित्येक दिवस मोठ्या प्रेमानें वाढविलेला आणि जतन केलेला सुंदर सुंदर ग्रंथांचा संग्रह विकून छपाईचें बिल चुकतें करण्याची त्याच्यावर पाळी आली. पण देशासाठीं तोही प्रसंग त्यानें धैर्यानें सहन केला. 'फिआना फेल' अकरा अंकांनंतरच बंद पडलें खरें, पण त्यानें आपलें कार्य केलें. साऱ्या कॉर्क परगण्याला कीड लागली कीं, काय असें लोकांना वाटूं लागलें होतें. अशा वेळीं कॉर्कमधील माणसांचा पीळ अजून क़ायम आहे अशी त्या पत्रानें जनतेची खात्री केली, विभक्त स्वराज्याच्या ध्येयाला चिकटून राहिलेल्या अल्पसंख्याक पक्षांत त्या पत्रानें आत्मविश्वासाचें नवें चैतन्य उत्पन्न केलें, व संकटांना न डगमगतां पर्वतासारखा अचल राहणारा पुढारी म्हणून त्या पत्रानें टेरीकडे सर्वांचें लक्ष वेधलें.

पुढील वर्षांत, म्हणजे १९१५ सालीं आयर्लंडचा भ्रम हलके हलके दूर होऊं लागला, आणि विभक्त स्वराज्यवादी 'आयरिश' स्वयंसेवकांचें संख्याबळ आस्ते आस्ते वाढूं लागलें. रेडमंडनें आपल्या स्वयंसेवकांना 'राष्ट्रीय स्वयंसेवक' असें नांव दिलें होतें, पण शेवटीं शेवटीं रेडमंडची चळवळ म्हणजे नुसते कागदी घोडे झाले; आणि जसजसे दिवस जाऊं लागले तसतसे अधिकाधिक लोक रेडमंडला सोडून 'आयरिश' पथकांत परत येऊन दाखल होत चालले. मूळ आयरिश स्वयंसेवकांना व्यवस्थित स्वरूप देण्यांत टेरी गर्क झाला होता. एकीकडे नोकरीनिमित्त प्रवास करतां करतां स्वयंसेवकांचेंही काम तो करीत असे. पण अशानें गोष्टी नीट तडीस लागणार नाहींत असें त्याला वाटलें असावें. म्हणूनच १९१५ च्या जुलई महिन्यांत त्यानें आपल्या शिक्षकाच्या व प्रचारकाच्या नोकरीचा राजीनामा दिला, व आयरिश स्वयंसेवक जमविण्याच्या कामाला त्यानें स्वतःस सर्वस्वीं वाहून घेतलें. त्या कामासाठीं त्यानें जी मेहनत केली ती खरोखर अचाट होती. साऱ्या कॉर्क परगण्यांत तो सायकलवर सारखा हिंडत होता, आणि जेथें जेथें

तो जाई तेथें तेथें चळवळीची लाट उचंबळल्यावांचून रहात नसे. टेरीच्या अशा कामामुळें १९१६च्या प्रारंभीं कॉर्क परगणा म्हणजे स्वयंसेवकांच्या चळवळीच्या दृष्टीनें सर्वांत पहिल्या प्रतीचा परगणा ठरला.

आयर्लंडमध्यें जिकडे तिकडे लोकमत आयरिश स्वयंसेवकांच्या बाजूला वळूं लागलें होतें. जुने पुढारी आणि जुनीं वर्तमानपत्रें या नव जागृतीच्या लाटेनें भिजलीं नाहींत. तीं सदा पाषाणासारखीं कोरडीं रहावयाचीं हें ठरलेलेंच होतें. पण सामान्य लोक जागे होऊन तरुण पिढीकडे वळले. साम्राज्यपूजकांच्या निशाणाखालीं उभे रहावयास त्यांच्या अंतःकरणाची इच्छा कधींच नव्हती. साम्राज्यपूजकांची भूमिका त्यांना कधींच सुखावह वाटली नव्हती. आतां ती भूमिका फेंकून द्यावयाचा त्यांनीं निश्चय केला. जुनी पिढी वरून वरून बलवत्तर दिसत होती, पण तिचे पायाचे दगड ढांसळत होते! तरुण पिढी यशस्वी होणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसत होतीं!

## प्रकरण अकरावें

# भयंकर गुन्हा केल्याबद्दल बारा आणे दंड!

आयरिश स्वयंसेवकांचें कॉर्क परगण्यांत वर्चस्व वाढत चाललें होतें हें सरकारच्या लक्षांत आल्यावांचून राहिलें नाहीं; आणि त्या वाढत्या वर्चस्वाचा उगम टेरीच्या धडाडींत होता हेंही सरकारनें ताबडतोब ओळखलें. तेव्हां टेरीवर घाला घालण्याचा सरकारनें निश्चय केला. त्या काळांत सरकार दडपशाहीचा फक्त प्रयोग करून पहात होतें. आतांच्या सारखे दडपशाहीचे हात त्या वेळीं वाटेल तेथें आणि वाटेल तेव्हां पोंचत नसत. कोणता तरी एखादा नक्की आरोप ठेवल्याखेरीज सरकार कोणाला पकडीत नसे, इतकेंच नव्हे तर, सध्यां ज्या गोष्टी भयंकर गुन्ह्यासारख्या समजल्या जातात त्यांबद्दल त्या वेळीं कोणाचीही धरपकड होत नसे. लष्करी कोर्टापुढें खटले चालण्याचा प्रघात त्या वेळीं पडलेला नव्हता. मॅजिस्ट्रेटपुढें ज्यूरी नेमून प्रत्येक खटल्याची सुनावणी होत असे. सुधारलेल्या राज्यपद्धतीला अवश्यक असणाऱ्या साऱ्या उपचारांची व विधींची अद्यापि आयर्लंडमधून पुरती हकालपट्टी झाली नव्हती. त्या वेळीं दडपशाहीचा जो प्रकार सुरू झाला तो देखील तेव्हां लोकांना भयानक वाटला हें खरें, पण आज आयर्लंडमध्यें सुरू असलेल्या दडपशाहीपुढें ती दडपशाही अगदींच फिकी पडेल.

व्हिक्टोरिआ रोडवरील त्याच्या घरांत १९१६ सालच्या ३ जानु-आरींत टेरीला पकडण्यांत आलें. दारूगोळा सांपडेल अशा आशेनें त्याची व त्याच्या घराची झडती घेण्यांत आली. पण कांहींच सांपडलें नाहीं. तेव्हां रिक्त हस्तानें परत जाण्याचा प्रसंग टाळण्यासाठीं त्याच्या जवळचे कागद व खाजगी पत्रें जप्त करण्यांत आलीं. जानुआरीच्या २ तारखेस बॅलिनो येथें राजद्रोहात्मक भाषण केल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यांत आला. पण या आरोपाखालीं टेरीला पकडल्यापासून पुढें सरकारचें

वर्तन गूढ प्रकारचें व्हावयास लागून सरकारच्या हेतूविषयीं लोकांना संशय वाटूं लागला. वास्तविक पाहतां आरोप ठेवल्यानंतर विलंब न लावतां अधिकाऱ्यांनीं मॅजिस्ट्रेटपुढें खटला उभा करून टेरीला सहा महिन्यांची शिक्षा ठोठावली असती तर तें नेहमींच्या प्रघाताला अनुसरून झालें असतें. कोणत्या चळवळ्या माणसाला किती शिक्षा द्यावयाची याविषयीं सरकारकडून गुप्त हुकूम सुटतील त्याप्रमाणें मॅजिस्ट्रेट वागतो, आणि आपण महायुद्धाच्या काळांत सरकारला विरोध करतो असा आपल्याविषयीं संशय येईल या भीतीनें पगारी मॅजिस्ट्रेट सांगेल त्याप्रमाणेंच 'बेंचा'वर बसणारे ऑनररी मॅजिस्ट्रेट आपलें मत देतात, या गोष्टी सर्वांना पुरत्या माहीत होत्या. असल्या फार्सदार चवकशीनेंच टेरीला शिक्षा होणार अशी त्याला पकडल्याबरोबर सर्वांचीच कल्पना झाली. पण दिवसांमागून दिवस चालले तरी टेरीला कोर्टापुढें आणण्याची सरकारकडून कांहींच हालचाल होईना, आणि टेरी मात्र तुरुंगांत खितपत पडला होता. हा प्रकार त्या वेळीं अत्यंत अपरिचित होता व त्यामुळें देशांत जिकडे तिकडे लोक आश्चर्य करूं लागले. कॉमन्सच्या सभेंत देखील या प्रकाराविषयीं प्रश्न विचारला गेला व त्याला असें उत्तर मिळालें, कीं "मि. मॅक्स्विनी याच्या हातून घडलेला गुन्हा अत्यंत भयंकर स्वरूपाचा असल्यामुळें असा विलंब होत आहे." या उत्तराचें प्रत्येकाला मोठें गूढ वाटलें. कारण पकडण्याच्या वेळीं राजद्रोही भाषण करण्यापलीकडे दुसरा कोणताही आरोप टेरीवर ठेवला गेला नव्हता, आणि हा अपराध तर अगदीं नेहमींचा होता. मग टेरीच्या हातून असा 'अत्यंत भयंकर स्वरूपाचा' कोणता गुन्हा घडला?

टेरीच्या खटल्याची सुनावणी लांबविण्यांत सरकारचें खरें गुप्त कारण कोणतें होतें तें जेव्हां उघडकीस आलें तेव्हां मात्र सरकारच्या मूर्खपणाला हंसावें कां रडावें हेंच लोकांना समजेना. टेरीला जॉन नांवाचा

एक धाकटा भाऊ होता, व तो परदेशांत होता. तो घरीं वारंवार पत्रें पाठवीत असे, व यांपैकींच कांहीं टेरीला पकडला तेव्हां जप्त करण्यांत आलीं होतीं. रेडमंडचा धि:कार करणारा लांबलचक मजकूर यांपैकीं पुष्कळशा पत्रांत होता आणि त्या मजकूरांत ज्याला राजद्रोह असें नांव आहे तो पदार्थ भरपूर सांपडण्यासारखा होता. पण असलीं पत्रें आणि असला मजकूर यांत कांहीं विशेष नव्हतें. हीं पत्रें पकडणारा पोलिस अधिकारी बिरेल याला आतां आपल्याला खास बढती मिळणार असें कां वाटलें, आणि सरकारनें टेरीचा खटला काढण्यास विलंब कां केला, याचें उत्तर निराळेंच होतें. तें हें, कीं त्या सर्व पत्रांवर 'बर्लिन' येवढाच फक्त पत्ता वर कोपऱ्यांत लिहिलेला होता. आयरिश स्वयंसेवक जर्मनीस लागू आहेत असा मि. डिलन व त्याचे साथीदार यांचा आज कित्येक दिवस ओरडा चालूच होता, व आयरिश स्वयंसेवकांस जर्मनी-कडून पैशाची मदत होत आहे अशी हांकाटी ते संधि सांपडेल तेव्हां केल्यावांचून रहात नसत. त्या दृष्टीनेंच हीं पत्रें पाहतांच मि. बिरेलच्या तोंडाला पाणी सुटलें. बिरेलला वाटलें आपल्याला भरभक्कम पुरावा सांपडला. बर्लिनमधील एका डांवीस माणसाशीं आयरिश स्वयंसेवकांचा पुढारी मॅक्स्विनी याचा पत्रव्यवहार चालू असल्याचें आतां आपल्याला सिद्ध करतां येईल अशी त्याला खात्री वाटली. तावडतोब त्या पत्रांत एखादी गुप्तलिपी आहे किंवा काय तें शोधून काढण्याच्या कामाला तज्ञ माणसें जुंपण्यांत आलीं, आणि कॉर्क शहरांतून बाहेर जाणारीं सर्व पत्रें फोडून वाचण्याचा सपाटा सुरू झाला.

शेवटीं बुडबुडा फुटला! कॉर्क शहरांतून जाणाऱ्या पत्रांमध्यें एक पत्र मिस मेरी मॅक्स्विनी इनें आपला भाऊ जॉन मॅक्स्विनी याला लिहिलेलें होतें, व त्याच्यावर फक्त 'बर्लिन' येवढाच पत्ता लिहिला होता. झालें, आपल्या तलासाच्या साखळींतील न सांपडणारा दुवा आप-ल्याला सांपडला असें वाटून अधिकाऱ्यांचा परमानंद पोटांत मावेनासा

झाला. ताबडतोब बर्लिन येथें जॉन मॅक्स्विनीला पकडण्यांत येऊन त्याच्या साऱ्या कागदपत्रांची व सामानाची झडती घेण्यांत आली. परंतु त्याच्यावर आरोप ठेवून खटला भरतां येण्यासारखें कांहींच न सांपडल्यामुळें त्याला सोडून देणें भाग पडलें, आणि आयर्लंडमध्यें 'जर्मन कट' आहे असें सिद्ध करण्याचा सरकारचा पहिला प्रयत्न अशा रीतीनें फसला.

आतां टेरीचा खटला लांबणीवर टाकण्याचें सरकारला कांहींच कारण नव्हतें. तेव्हां फेब्रुआरीच्या १६ व्या तारखेस टेरीला , कॉर्कच्या पोलिस कचेरींत नेण्यांत आलें. सरकारी सॉलिसिटरनें पुरावा देण्याचा औपचारिक विधि करून टेरीला बंदिखान्यांत डांबून ठेवावें अशी विनंति केली. मॅजिस्ट्रेटांचें याविषयीं बरेंच खलबत झालें व शेवटीं टेरीला जामिनावर मोकळा सोडण्याचें त्यांनीं ठरविलें. टॉमस कर्टिन व फ्रेड क्रोनिन हे दोघे जामीन राहिले. फेब्रुआरीच्या २२ तारखेला टेरीच्या खटल्याची लांबलेली सुनावणी पुन्हां सुरू झाली. त्या सुनावणीचीही कथा गमतीदारच आहे. त्या वेळीं सरकारी सॉलिसिटरचें काम डॉक्टर एच. ए. विन् याच्याकडे होतें. संयुक्त स्वराज्यवादी पक्षांतील सर्वांत दुष्ट आणि नीच मनुष्य म्हणून डॉ. विन् सर्वांना माहीत होता; व म्हणूनच १६ फेब्रुआरीला टेरी जामिनावर मोकळा सुटल्यापासून डॉक्टर विन्च्या हालचालीवर सर्वांची बारीक नजर होती. खटल्याच्या वेळीं प्रतिष्ठित लोक 'बेंचा'वर बसले तर टेरीची सुटका खास होईल असें प्रत्येकाला वाटत होतें. पण टेरीला शिक्षा मिळावी एतदर्थ डॉक्टर विन् कोणतेंही नीच कृत्य करण्यास मागें पुढें मुळींच पाहणार नाहीं हेंही प्रत्येकजण ओळखून होता. आगाऊ सूचना न देतां वाटेल त्या दिवशीं वाटेल तो खटला एकदम सुनावणीस काढण्याचा त्या वेळीं मॅजिस्ट्रेटला हक्क होता. खटल्याच्या आदल्याच दिवशीं टेरीच्या नातलगांना डॉक्टर विन्नें कळविलें, कीं उद्यां टेरीचा खटला सुनावणीस मी काढणार नाहीं. पण या बातमीनें सर्वांचे संशय उलटे वृद्धिंगत झाले.

आणि डॉ. विन् काय करतो तें सर्वजण दुप्पट करड्या नजरेनें पाहूं लागले. त्या दिवशीं संध्याकाळीं अशा कांहीं गोष्टी त्यांच्या निदर्शनाला आल्या, कीं त्यावरून दुसऱ्याच दिवशीं एकदम टेरीचा खटला मॅजिस्ट्रेटसमोर मांडण्याचा डॉ. विन्चा बेत आहे अशी त्यांची खात्रीच झाली. एकदम खटला उभा केला, कीं त्या वेळेस मॅजिस्ट्रेटच्या 'बेंचा'वर बसावयास टेरीच्या पक्षपात्यांपैकीं कोणीच हजर नसतील आणि मग आपले बगलबच्चे 'बेंचा'वर बसवून आपल्याला आपला डाव साधतां येईल, असा डॉ. विन्नें व्यूह रचला होता. पण त्याचा तो व्यूह पार ढांसळला. दुसऱ्या दिवशीं डॉ. विन् मॅजिस्ट्रेटसमोर खटला उभा करीपर्यंत टेरीच्या पक्षाचे मॅजिस्ट्रेट मागें दडून बसले होते. ऐन वेळेला ते सहा मॅजिस्ट्रेट पुढें झाल्याबरोबर डॉ. विन्चा चेहरा खाडकन् उतरला. या सहांपैकीं एक तर लॉर्ड मेयर असल्यामुळें त्याला सरपंचाचा अधिकार त्याच्या हुद्यानें आपोआपच प्राप्त होत होता. मिळून सरकारच्या पगारी मॅजिस्ट्रेटाचें सातांमध्यें एक मत पडणारें असल्यामुळें त्याला कांहींच किंमत उरली नाहीं. टेरीच्या पक्षानें आपल्यावर अशी मात केलेली पाहून डॉ. विन्चा चेहरा अगदीं गोरामोरा होऊन गेला. पण खटला पुढें चालविणें त्याला भाग होतें.

असंतोष उत्पन्न करण्यासारखीं विधानें करणें, असंतोष उत्पन्न करण्याचा प्रयत्न करणें, आणि लष्करी किंवा आरमारी गुप्त बातम्या कळविण्यास उपयोगी पडण्यासारखी गुप्त लिपी जवळ बाळगणें, असे तीन निरनिराळे आरोप टेरीवर प्रारंभीं ठेवण्यांत आले. खटला दिवसभर चालला होता. साक्षी झाल्या त्या फक्त कांहीं पोलिसांच्या. आरोपीतर्फे एकही साक्षीदार पुढें करण्यांत आला नाहीं. टेरीच्या बाजूनें फ्रँक हीली यानें उलट तपासणी मात्र केली. एकंदर खटला फार मजेचा झाला. डॉ. विन्चे 'बेंचा'वरील मॅजिस्ट्रेटांशीं आणि हीलींशीं अनेक वेळां खटके उडाले, आणि जेव्हां जेव्हां राजद्रोहाचा पुरावा म्हणून टेरीच्या

भाषणांतील किंवा लेखांतील उतारे वाचून दाखविण्यांत येत असत तेव्हां तेव्हां खटला ऐकण्यासाठीं कोर्टांत जमलेले लोक आनंदानें टाळ्या वाजवीत. डॉ. बिन् संतापानें लाल झाला होता, पण आपला निरुपाय आहे हें त्याला स्पष्ट दिसत होतें. शेवटीं प्रारंभाप्रमाणें खटल्याचा शेवटही विनोदपूर्ण झाला. तीन आरोपांपैकीं पहिल्या दोहोंमध्यें टेरी निरपराधी आहे, तिसऱ्या आरोपाची शाबिती टेरीवर झाली आहे व त्याबद्दल टेरीला एक शिलिंग दंड करावा असें बेंचाचें बहुमत आहे असें लॉर्ड मेयरनीं जाहीर केलें. तो निकाल ऐकल्याबरोबर कोर्टाची जागा लोकांच्या टाळ्यांच्या कडकडाटानें दणाणून गेली. तो टाळ्यांचा गजर किती वेळ तरी चालला होता.

आरोपीला अपराधी ठरविणें आणि त्या अपराधाबद्दल त्याला बारा आणे दंड करणें म्हणजे खरोखर सरकारची चेष्टा करण्यासारखें होतें. त्या फार्सानें आयर्लंडांत जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला, आणि इंग्लंडमध्यें जो तो रागानें चडफडूं लागला. या खटल्याचा आयर्लंडला चांगलाच फायदा झाला. इंग्लंडच्या रक्षणासाठीं आयर्लंडनें लढावें या मताचा पाडाव झाल्याचें तें स्पष्ट चिन्ह होतें. आयर्लंडनें सशस्त्र सज्जता ठेवावी, पण महायुद्धांत कोणताच पक्ष स्वीकारूं नये हें आयरिश स्वयंसेवकांचें मतच देशाला मान्य होत चालल्याची ती स्पष्ट साक्ष होती. पहिल्या दोन आरोपांवर टेरी निर्दोषी ठरला याचा अर्थ आयरिश स्वयंसेवकांत भरती करण्याचें काम सर्वस्वी कायदेशीर असल्याचा लेख मॅजिस्ट्रेटांनीं लिहून दिला असाच होता. आणि तिसऱ्या आरोपावर टेरीला अपराधी ठरवून एक शिलिंग दंड करण्यांत आला याचा अर्थ तरी लष्करी कामासाठीं गुप्त लिपी जवळ बाळगणें हें मॅजिस्ट्रेटांच्या मतें फारसें वावगें नाहीं असाच उघड उघड होत होता. टेरीच्या या पहिल्या खटल्यानें त्याच्या पक्षाचें पाऊल मागें हटण्याऐवजीं पुढेंच पडलें यांत संशय नाहीं.

प्रकरण बारावें

## बंडाचा बेत फसला

इंग्लडचें जर्मनीशीं युद्ध सुरू झालें तेव्हां प्रारंभीं आयर्लंडमधील लोक-मत भ्रामक भावनांनीं उद्दीपित झालेलें होतें, व महायुद्ध चालू असे-पर्यंत आयर्लंडनें आपली सर्व चळवळ तात्पुरती थांबवावी या जॉन रेडमंडच्या मताची भूल लोकांना पडली होती. परंतु महायुद्धाविषयींचा हा उत्साह लवकरच थंडावला. आयर्लंडनें आपली चळवळ थांबवावी एवढेंच नव्हे, तर आयर्लंडनें प्राण हातीं घेऊन लढाईसाठीं बाहेर पडावें अशी सूचना जेव्हां पुढें आली तेव्हां लोकांच्या मनाला ती पटेना. उलट, 'आयरिश स्वयंसेवक', व 'प्रजासत्तावादी भ्रातृ-मंडळ' ( Irish Republican Brotherhood ) या दोन संस्था म्हणजे आपल्याला उत्पन्न झालेले दोन जबरदस्त शत्रू होत हें रेडमंडच्या व सरकारच्या लवकरच ध्यानांत आलें. महायुद्धासारखी बहुमोल पर्वणी आयर्लंडनें फुकट दवडूं नये म्हणून देशांतील लोकमत जागृत करण्यासाठीं या दोन संस्था अतोनात झटत होत्या. विभक्त स्वराज्यवादी लोक 'आयरिश' स्वयंसेवकांच्या पथकांत होते, आणि आय. आर. बी. ( Irish Republican Brotherhood चें हें प्रचारांतील छोटें नांव होतें.) या पथकाच्या द्वारें काम करीत होते. महायुद्ध जोरांत येऊं लागलें तसतसे स्वयंसेवक मंडळींत दोन पक्ष निर्माण झाले. ब्रिटिश सैन्यांत आयरिश लोकांनीं शिरूं नये, आयर्लंडनें स्वतःची सशस्त्र सज्जता करावी, वगैरे तात्विक गोष्टीं-विषयीं दोन्ही पक्षांचें एकमत होतें. मतभेद काय तो या घटकेला काय करावयाचें याबद्दल होता. आय. आर. बी.पक्षाचें म्हणणें असें होतें, कीं शक्य तितक्या लवकरची संधि साधून बंड उभारावें. या पक्षांत टॉम क्लार्क, सीन मॅक्डरमॉट, पिअर्स, प्लंकेट वगैरे मंडळी होती.

उलट, दुसऱ्या पक्षाचें मत असें होतें, कीं स्वयंसेवकांनीं आपली जय्यत तयारी ठेवावी, महायुद्ध थांबेपर्यंत वाट पहावी, आणि महायुद्ध संपलें, कीं आपल्या तयारीच्या जोरावर इंग्लंडापासून मिळेल तितकें स्वातंत्र्य मिळवावें. पण हें मत आय. आर. बी. मंडळीना पटेना. ते म्हणत, कीं महायुद्ध संपेपर्यंत स्वयंसेवकांचीं पथकें कायम ठेवण्याचें आपण कितीही ठरविलें तरी काय उपयोग? सरकार त्या पथकांचा लवकरच चुराडा केल्यावांचून राहणार नाहीं. तेव्हां काय करावयाचें असेल तें आतांच केलें पाहिजे.

इकडे सरकार कांहीं स्वस्थ बसलें नव्हतें. आयर्लंडमध्यें सैन्यासाठीं रिक्रूट मिळेनात, आणि आयरिश स्वयंसेवकांची संख्या व तयारी तर रोजच्या रोज वृद्धिंगत होऊं लागली, तेव्हां सरकारचा धीर सुटला यांत कांहीं नवल नाहीं. कॉर्कमध्यें टेरीवर जसा सरकारनें हल्ला करून पाहिला त्याप्रमाणें इतर ठिकाणच्या पुढाऱ्यांवरही सरकारनें झडप घातली; परंतु त्या गोष्टीचा कांहीं परिणाम होईना. एखाद्या साध्या सैनिकाला एखाद्या माणसाचा संशय आला व तो मनुष्य राजद्रोहाचें कृत्य करण्याच्या बेतांत होता असें नुसतें त्यानें सांगितलें, कीं त्याला गिरफदार करून बंदिखान्यांत टाकून द्यावयाचें, असल्या अरेरावीला त्या वेळीं तोंड फुटलें नव्हतें. म्हणून कांहीं पुढाऱ्यांची धरपकड चालू असतांनाही एकीकडे 'आयरिश स्वयंसेवकां'चा वृक्ष फोफावून प्रचंड दिसूं लागला, आणि दुसरीकडे रेडमंडच्या 'राष्ट्रीय स्वयंसेवकां'चें खुरटलेलें झाड आतां लवकरच पुरतें वठून जाणार असें वाटूं लागलें.

ताबडतोब कांहीं तरी केलें पाहिजे असें म्हणणारी मंडळी आय. आर. बी. पक्षांतील होती, आणि १९१६ सालीं जें बंड झालें तें एकंदर सर्व स्वयंसेवकांचें होतें असें म्हणण्यापेक्षां आय. आर. बी.नेंच उठविलेलें होतें असें म्हणणें अधिक उचित होईल. टॉम क्लार्क, पिअर्स, मॅक्डरमॉट, प्लंकेट आणि कॉनोली हीं माणसेंच बंडाची तयारी कर-

ण्यांत प्रमुख होतीं. यांपैकीं कॉनोलीखेरीज बाकीची मंडळी आय. आर. बी.तील होती, आणि कॉनोलीसुद्धां आय. आर. बी.चा रीतसर सभासद नसला तरी सहाय्यक होता. १९१६ मध्यें या मंडळीची खात्री झाली, कीं बंडाला योग्य वेळ आतां येऊन ठेपली आहे, आणि स्वयंसेवकांच्या कार्यकारी मंडळाला पुरतें न कळवितां स्वयंसेवकांच्या संस्थेची मदत घेऊन त्यांनीं बंडाची तयारी करण्यास प्रारंभ केला. आपल्या जन्मसिद्ध हक्काची खरी जाणीव आयरिश जनतेच्या मनांत उत्पन्न करण्याचा जर एखादा खरा अमोघ मार्ग असेल तर तो बंड हाच होय, असें त्यांचें अगदीं ठाम मत होतें. म्हणून सर्वस्वाचा पण लावून हा डाव खेळण्याचें त्यांनीं ठरविलें. बहुतेक स्वयंसेवकांचे विचार त्यांच्यासारखे होते. परंतु प्रत्यक्ष कार्यकारी मंडळाला आपलें बेत पुरते-पणीं समजून न देतां या मंडळानें कामाला हात घातला ही मोठी चूक झाली. या चुकीचा परिणाम असा झाला, कीं बंडाला प्रत्यक्ष प्रारंभ होण्याची ऐन वेळ आली तेव्हां बंडवाल्यांना परस्परविरोधी हुकूम मिळाले, आणि साऱ्या गोष्टींचा विचका उडाला.

टेरेन्स मॅक्स्विनीच्या या चरित्रांत या बंडाची समग्र हकीगत सांगत बसण्याचें कारण नाहीं. तेव्हां इतकेंच सांगितलें म्हणजे पुरें आहे, कीं टर्री व टॉम कर्टिन यांची या बंडवाल्यांना पूर्ण सहानुभूति होती, व प्रत्येक गोष्टीची त्वरेनें तयारी व्हावी म्हणून रात्रीचा दिवस करून ते काम करीत होते आणि साधनांची जुळवाजुळव करीत होते. ईस्टरच्या सणांत रविवारीं ता. २३ एप्रिल रोजीं बंड उभारावयाचें असें ठरलें. तें निश्चित ठरल्यानंतर तर टेरीनें मेहनतीची परमावधि केली. त्याचें खाण्यापिण्याकडे लक्ष नव्हतें. त्याला झोंपेची शुद्ध नव्हती. या ठिकाणाहून त्या ठिकाणीं अशी त्याची सारखी धांवपळ चालली होती. नकाशे पुढें ठेवून साथीदारांशीं खलबतें करण्यांत त्याला वेळेचें भान नव्हतें. रात्रीं त्यानें अंथरुणावर अंग टाकलें तरी पुढील बेताचे विचार

त्याच्या मनांत घोळत, यशापयशाच्या आशानिराशांचा धिंगाणा मनांत सारखा चालू राही, आणि डोळ्याला डोळा कसा तो लागत नसे. आपल्या प्रयत्नांत आपण यशस्वी होऊं कां पराभूत होऊं अशा अर्धवट आशेनें आणि अर्धवट भयानें त्याच्या हृदयाची धडधड सारखी चालू होती. कित्येक वर्षें आपल्या मायदेशांत ठाणें देऊन राहिलेल्या शत्रूला युद्धाचें आव्हान करून रणसंग्रामासाठीं बाहेर पडलेल्या शस्त्रास्त्रमंडित आयरिश तरुणांच्या सैन्यावर आयर्लंडचा झेंडा ज्या दिवशीं फडकेल तो दिवस आपण केव्हां पाहूं, असा अधीर ध्यास त्याच्या मनाला बालपणापासून लागून राहिलेला होता. आणि तोच दिवस आतां उगवणार होता ! शेवटीं सर्व तयारी परिपूर्ण झाली. आनंद, उत्साह, उत्सुकता अशा भावनांनीं सारे स्वयंसेवक बेहोष झाले होते—इतक्यांत—

बंडाच्या तारखेच्या आदल्या दिवशीं, शनिवारीं संध्याकाळीं, रविवारच्या कामाबद्दल आतांपर्यंत सुटलेले सारे हुकूम 'कांहीं अपरिहार्य महत्त्वाच्या प्रसंगामुळें रद्द करण्यांत येत आहेत' असा मजकूर संध्याकाळच्या वर्तमानपत्रांत प्रोफेसर मॅक्नील, चीफ ऑफ स्टाफ, यांच्या सहीनिशीं प्रसिद्ध झाला ! बंड उभारण्याचे सारे हुकूम रद्द करणारा तो हुकूम सर्वांत वरिष्ठ अधिकाऱ्याकडून सुटलेला होता. त्याच्यावर कांहीं अपील नव्हतें. तो हुकूम पाहून सर्वांचीं अंतःकरणें निराशेनें जड झालीं. पण तो मान्य करणें प्राप्त होतें.

खरी वस्तुस्थिति अशी होती, कीं बंडाच्या दिवसाच्या दोन चार दिवसच अगोदर बंडाचा बेत मॅक्नील यांस कळविण्यांत आला, आणि तें बंड न उभारणेंच श्रेयस्कर आहे असें ऐन वेळीं त्यांना वाटल्यामुळें त्यांनीं तें थांबविण्यासाठीं वर सांगितलेला हुकूम सोडला. बरें, या प्रकारचा मॅक्नील यांचा फेरहुकूम सुटल्यानंतरही आय. आर. बी. लोकांचा बेत बदलला नव्हता. उलट बंडाची खरी वेळ असेल तर हीच आहे अशी त्यांची पहिल्यापेक्षांही अधिक बळकट खात्री झाली

होती, मात्र बंडाला सुरवात रविवारीं ता. २३ रोजीं न करतां सोमवार ता. २४ रोजीं करावी असें त्यांनीं ठरविलें होतें, आणि लगेच पूर्वीचे हुकूम रद्द करणारा मॅक्नील यांचा फेरहुकूमही रद्द करण्यासाठीं आपला नवा फेरहुकूम सोडून मॅक्नील यांच्या निरोपामागोमाग आपलाही निरोप्या त्यांनीं ठिकठिकाणीं धाडला. यापैकीं एकही गोष्ट स्वयंसेवकांना बिल्कूल कळली नाहीं. बंडामध्यें कॉर्क शहरानें सामील व्हावयाचें ठरलें होतें. परंतु प्रत्यक्ष शहरांत बंड सुरू करावयाचें असा बेत नव्हता, तर कॉर्क शहरांतून लोकांनीं लष्करी चालीनें बाहेर पडून बाहेर तयार असलेल्या लोकांना मिळावयाचें, व मग बंडाचा पुकारा करावयाचा असें ठरलें होतें. या पूर्वीच्या बेताला अनुसरून रविवारीं कॉर्कमधील बंडवाले बाहेर पडले. सबंद दिवस त्यांनीं शहराबाहेर काढला. त्या दिवशीं सकाळीं त्यांच्या आनंदाला पारावार नव्हता. प्रत्येकाची मुद्रा कांहीं एका विलक्षण तेजानें प्रफुल्लित झाल्यासारखी दिसत होती. पण संध्याकाळीं मॅक्नील यांचा फेरहुकूम येऊन पोंचला, आणि मोठ्या नाइलाजानें टेरी व टॉमस यांनीं लोकांना घरोघर जावयाचा हुकूम दिला. त्या वेळीं प्रत्येकाच्या चेहऱ्यावरची निराशेची आणि खिन्नतेची छाया टेरीच्या दृष्टीला दिसल्यावांचून राहिली नाहीं. तथापि यानंतरही जी गोष्ट झाली तिनें टेरी, टॉमस वगैरे म्होरक्यांवर आश्चर्याचा वज्राघातच केला. कारण लगेच मॅक्नीलचा फेरहुकूम फिरविणारा पिअर्सचा निरोप त्यांच्या हातीं आला, आणि ते तर साऱ्या स्वयंसेवकांना घरोघर पाठवून बसले होते! आतां काय करावयाचें? कोणता मार्ग स्वीकारावा याबद्दल खल करतां करतां ती रात्र उलटून जाण्याचीही वेळ आली. इतक्यांत मॅक्नीलकडून आणखी एक निरोप येऊन धडकला! हें आहे तरी काय? प्रत्येकजण दुसऱ्याकडे विस्मयभरानें पहात राहिला! त्या तीन दिवसांच्या अवधींत कॉर्क शहरांतील पुढाऱ्यांना डब्लिनहून सात परस्परविरुद्ध हुकूम सुटले, आणि या घोंटाळ्याचा परिणाम असा

झाला, कीं शेवटीं कॉर्कमध्यें मुळींच बंड झालें नाहीं. डब्लिनमध्यें बंड उठल्याची बातमी कॉर्क शहरांतील लोकांना सोमवारीं रात्रीं किती तरी उशिरां कळली. आणि ती बातमी फारशी कोणाला कळली नव्हती तोंच लष्करी लोकांनीं कडेकोट बंदोबस्त करून शहराच्या सर्व वेशींवर पायदळ आणि तोफखाना चढविला देखील होता. कॉर्क शहर पर्वतराशींच्या संपुटींत वसलेलें आहे. त्यामुळें एकदां भोंवतालच्या टेंकडया लष्करी लोकांच्या माऱ्यांत सांपडल्यावर कॉर्क शहराची सारी गडबड पार बंद पडण्यासारखी होती. डब्लिनमध्यें बंड सुरू झाल्यावर 'कॉर्क शहर आम्हांला मदत करील अशी आमची खात्री आहे' असा निरोप घेऊन एक मनुष्य टॉम क्लार्ककडून आला. पण तो निरोप समजल्यावर टेरीनें फक्त नाइलाज झाल्याचा एक दुःखपूर्ण आवंढा गिळला. डब्लिनच्या शूर बंडवाल्यांना आपण निराश करीत आहोंत या विचारानें त्याचें हृदय पिळवटलें. पण या वेळीं डोळे घट्ट मिटून आणि मन खंबीर करून स्वस्थ बसणेंच भाग होतें. प्रत्येक गोष्टींत टेरी आपल्या विवेकबुद्धीच्या प्रेरणेप्रमाणें चालत असे, व याही प्रसंगीं शांति ढळूं न देतां त्यानें तेंच केलें. त्या तसल्या परिस्थितींत कॉर्कमध्यें बंड उभारल्यानें काडीमात्र फायदा होणार नाहीं असें त्याचें मन त्याला स्पष्ट सांगत होतें, आणि मनाच्या त्या ग्वाहीला अनुसरूनच त्यानें बंड उभारण्याचा बेत रहित केला. मात्र, लष्करी लोकच आपण होऊन कदाचित आपल्यावर हल्ला करतील तर आपली तयारी असावी अशा दूरदृष्टीनें साऱ्या स्वयंसेवकांस त्यानें मुख्य ठिकाणीं गोळा केलें, आणि लष्करी लोकांचा हल्ला येईल अशा अपेक्षेनें नव्हे, तर ते हल्ला करतील तर फार बरें होईल अशा आशेनें सारे स्वयंसेवक आपल्या हत्यारांनिशीं खडे राहिले.

अशा स्थितींत नगराध्यक्ष (Lord Mayor of the city) आणि धर्मोपाध्यक्ष (Assistant Bishop) यांनीं मध्यस्थी केली. स्वयंसेवकांच्या पुढाऱ्यांची त्यांनीं भेट घेतली; तसेंच नंतर लष्करी अधि-

कार्‍यांशींही त्यांनीं बोलणें केलें; व शेवटीं अशा स्वरूपाचा तह ठरला कीं, स्वयंसेवकांनीं आपलीं हत्यारें नगराध्यक्षांच्या स्वाधीन करावीं, बंडाचें वातावरण निवळून शांतता प्रस्थापित होईपर्यंत तीं त्यांच्या ताब्यांत रहावीं, तेवढ्यानें लष्करी अधिकार्‍यांनीं संतुष्ट व्हावें, आणि बंड उभारण्याच्या प्रयत्नाबद्दल कोणालाही शिक्षा न होतां सर्व स्वयंसेवकांस सरसहा माफी मिळावी. या अटींप्रमाणें स्वयंसेवकांनीं आपलीं हत्यारें नगराध्यक्षांच्या स्वाधीन केलीं. उलट लष्करी अधिकार्‍यांनीं मात्र, आपल्या नेहमींच्या शिरस्त्याला अनुसरून, बेइमानी करून अटी मोडल्या, हत्यारें आपल्या कबजांत घेतलीं, आणि पुढार्‍यांस गिरफदार केलें. मेच्या २ तारखेस टेरीला पकडण्यांत येऊन कॉर्कच्या तुरुंगांत त्याची रवानगी झाली. एका आठवड्यानें त्याला तेथून काढून रिचमंड येथील बराकींत नेण्यांत आलें. नंतर तेथून त्याला वेकफील्डच्या तुरुंगांत हालविलें, आणि पुन्हां तेथून काढून वेल्समधील फ्रॅंगॉच येथील कॅंपमध्यें त्याला ठेवलें.

सरकारच्या या वचनभंगामुळें जनतेंत विलक्षण जागृति झाली. 'जागृति झाली तर बंडानेंच होईल' हें पिअर्सनें पूर्वीं केलेलें भविष्यच खरें ठरलें सरकारच्या या वर्तनानें लोकमत सर्वस्वी बंडवाल्यांच्या बाजूला झुकलें. अनुयायी आणि पुढारी यांची पुरी फारकत करण्याचें सरकारनें ऑगष्ट महिन्यांत ठरविलें, व सार्‍या पुढार्‍यांना रीडिंगच्या तुरुंगांत आणून ठेवलें. यांतच टेरी होता. सरकार आपापल्या परीनें अधिकार गाजवीत होतें, पण आयर्लंडमधील लोकमत उलट अधिकाधिक खवळत होतें. शेवटीं सरकारला वाटलें, कीं नेमस्त पुढार्‍यांच्या मध्यस्थीचा फार्स करून सर्व पुढार्‍यांना व स्वयंसेवकांना सोडून दिलें तर नेमस्तांविषयीं लोकांचें मत अनुकूल होईल व त्यांच्या हातांत राजकारणाचीं सूत्रें जाऊन आपला मार्ग सुकर होईल. हाच विचार सर-

कारला अधिकाधिक पटला, व अखेर त्या विचाराप्रमाणें १९१६च्या खिसमसच्या सणाच्या दिवशीं सर्वांची सुटका झाली.

सर्वांच्या सुटकेचा हुकूम जाहीर करतांना इंग्लंडच्या प्रधानांनीं असें बोलून दाखविलें, कीं परस्परांचा समेट होण्यासारखें 'वातावरण उत्पन्न करण्यासाठीं' आम्ही या लोकांना सोडीत आहोंत. आणि कैदेंतून सुटून आलेल्या या पुढाऱ्यांनीं प्रधानांच्या या इच्छेप्रमाणें खरोखरच ताबडतोब आयर्लंडांत 'वातवरण उत्पन्न केलें'! प्रधानांना पाहिजे होतें तसलें वातावरण तें नव्हतें, इतकाच काय तो फरक! कैदेंतून सुटून आल्याबरोबर टेरी वगैरे मंडळी प्रजासत्ताक राज्याची चळवळ पुढें ढकलण्याच्या कार्याला जोरानें लागली, आणि पूर्वी ईस्टरच्या सणांत निवालेल्या प्रजासत्ताक जाहिरनाम्याशीं इमान राखण्याच्या सर्वांनीं आणा भाका वाहिल्या.

हें पाहून सरकारनें पुन्हां आपलें हत्यार उपसलें. १९१७च्या २ फेब्रुआरीस टेरीस पुन्हां पकडलें. इंग्लंडच्या हिअरफोर्ड परगण्यांत ब्रोमयार्ड येथें त्याला हद्दपार करण्यांत आलें, आणि पांच मैलांचा टापू त्याला आंखून देण्यांत येऊन त्याच्याबाहेर पाऊल घालण्याची त्याला सक्त मनाई करण्यांत आली. जून महिन्याच्या शेवटीं शेवटीं हद्दपारीचा हुकूम रद्द झाला व टेरी सुटला. पण त्यानें आपलें चळवळींचें काम दुप्पट जोरानें सुरू केलें. म्हणून सरकारनें त्याला पुन्हां आक्टोबर महिन्यांत पकडलें व सहा महिन्यांची सजा दिली. तुरुंगांत गेल्यापासून टेरीनें अन्नपाणी वर्ज्य केलें, व नोव्हेंबर महिन्यांत त्याची सुटका झाली. तथापि, त्याची सहा महिन्यांची सजा पुरी करण्यासाठीं १९१८ च्या मार्च महिन्यांत त्याला पुन्हां पकडण्यांत आलें. त्याची सहा महिन्यांची मुदत संपली तेव्हां त्याला फक्त तुरुंगाच्या फाटकापर्यंत जाऊं देऊन पुन्हां पकडलें, व हद्दपारीची शिक्षा ठोठावून इंग्लंडमधील लिंकन येथील तुरुंगांत त्याची रवानगी करण्यांत आली.

जर्मन कट केल्याच्या खोट्या आरोपावरून सरकारनें डी व्हॅलेरा यास याच तुरुंगांत ठेवलें होतें. डी व्हॅलेराची व टेरीची या तुरुंगांत गांठ पडली.

पण सरकारची ही सारी धडपड हातांतील केरसुणीनें समुद्राची भरती हटवूं पाहणाऱ्या म्हातारीच्या धडपडीसारखी होती. सर्व आयर्लंडभर देशभक्तीच्या भावनेला भरती आलेली होती ! प्रजासत्ताक राज्य स्थापण्याच्या निश्चयाच्या लाटा जिकडे तिकडे उसळत होत्या ! त्या लाटांच्या थैमानांत सरकारची दडपशाही काय टिकाव धरणार !

## प्रकरण तेरावें

# स्वराज्याचें तोरण बांधलें

'सिन फेन'-आमचे आम्ही-पक्ष देशांत फारसा मान्य झालेला नव्हता तेव्हां इंग्लिश पार्लमेंटला मान्यता न देणें व त्या पार्लमेंटमधील आयर्लंडच्या प्रतिनिधींनीं काम न करणें या गोष्टी या पक्षानें केवळ धोरण म्हणून आपल्यापुढें ठेवल्या होत्या. पण आतां आयर्लंडमधील जनतेचें बहुमत 'सिन फेन' पक्षाचें झाल्यावर त्या गोष्टी केवळ दूरचें धोरण म्हणून डोळ्यांपुढें न ठेवतां, अगदीं ताबडतोब करावयाचें काम म्हणून हातीं घ्यावयाचें त्या पक्षानें ठरविलें. आणि १९१६, १९१७ व १९१८ सालांमध्यें, आपले पुढारी मोकळे असोत किंवा तुरुंगांत असोत, त्या गोष्टींची पर्वा न करतां 'सिन फेन' पक्षानें आपलें हें ठरलेलें काम निश्चयानें केलें. सरकारला जर कोणत्या गोष्टीची खरोखर भीति वाटत असली तर याच गोष्टीची. १९१७ सालच्या फेब्रुआरी महिन्यांत झालेल्या एका पोट निवडणुकींत रेडमंड पक्षाच्या उमेदवाराचा कौंट प्लंकेट यांनीं जेव्हां त्याच्या दुपटीनें मतें मिळवून पराजय केला तेव्हां सरकार चमकल्यावांचून राहिलें नाहीं; आणि हें होतें न होतें तोंच पार्लमेंटवाल्या पक्षाच्या अटोकाट प्रयत्नांनाही फोल करून टाकून दुसऱ्या एका निवडणुकींत मॅक्गिनेस हे 'सिन फेन' उमेदवार निवडून आले, आणि त्याचप्रमाणें ईस्ट क्लेअरच्या निवडणुकींत 'सिन फेन' पक्षाचे डी व्हॅलेरा यांस प्रचंड बहुमत मिळालें, हें पाहून तर सरकारची भीति शतपटीनें वाढली. 'सिन फेन' पक्षाची अशी सरशी झाली तर त्याचे परिणाम काय होतील हें आयर्लंडमधील बुद्ध्या पार्लमेंटवाल्यांना कळत नसलें तरी धूर्त सरकारला चांगलें समजत होतें. आयर्लंडचे पार्लमेंटमधील बहुतेक सभासद सिन फेन झाले, त्यांनीं पार्लमेंटमध्यें हजर राहण्याचें नाकारलें, आणि आयर्लंडमध्यें स्वतंत्र कारभार सुरू होऊन इंग्रजी

कायद्याला धाब्यावर बसवून त्या कारभाराची अंमलबजावणी जारीनें होऊं लागली, म्हणजे आयर्लंडमधील इंग्रजी राज्य समाप्तच झालें, ही गोष्ट सरकारच्या डोळ्यांना अगदीं स्पष्ट दिसत होती. हा प्रसंग कांहींही करून टाळलाच पाहिजे असें सरकारला वाटणें साहजिक होतें. या वेळीं निवडणुकी झाल्या तर सर्व 'सिन फेन' उमेदवार निवडून येणार याविषयीं शंकेला जागा नव्हती. निवडणुकी लांबणीवर टाकणें तर शक्य नव्हतें. आतां काय करावयाचें असा सरकारला मोठा प्रश्न येऊन पडला. परंतु सरकारजवळ न्यायाच्या नाहीं तर अन्यायाच्या युक्त्या अनेक होत्या. त्यांपैकींच एक योजून 'सिन फेन'वाले 'जर्मन कट' करण्यांत सामील आहेत असा ओरडा करून १९१८ च्या मेमध्यें सरकारनें 'सिन फेन' पुढाऱ्यांना तुरुंगांत लोटलें. या दडपशाहीला आयर्लंड-कडूनही सणसणीत उत्तर मिळालें. पुढाऱ्यांची तुरुंगांत रवानगी झाल्या-नंतर थोड्याच दिवसांनीं ईस्ट कॅव्हनतर्फे आर्थर ग्रिफिथ यांना लोकांनीं अपरंपार बहुमतानें निवडून दिलें व प्रजासत्ताक कार्यक्रम पार पाड-ण्यास हजारों लोक पुढें सरसावले. तुरुंगांत गेलेल्या पुढाऱ्यांची जागा दुसऱ्या मंडळींनीं भरून काढली, व्यवस्थेचें आणि प्रचाराचें काम जारीनें सुरू झालें, आणि लवकरच होणाऱ्या निवडणुकी पूर्णपणें काबीज करण्यासाटीं जय्यत तयारी करण्याकरितां साऱ्या 'सिन फेन'-वाल्यांनीं कमरा बांधल्या. शेवटीं १९१८ डिसेंबरमध्यें निवडणुकी झाल्या, सारे २६ 'युनिअन'वाले, अवघे ६च 'राष्ट्रीय' आणि बाकीचे सारे ७३ लोक 'सिन फेन'वाले निवडून आले. याप्रमाणें अखेर 'सिन फेन' पक्षाचें वर्चस्व पूर्णपणें सिद्ध झालें, आणि आपल्या मता-प्रमाणें प्रजासत्ताक राज्य स्थापण्यास देशाचा हुकूम आतां आपल्या हातीं पडल्यासारखें झालें असें सिन फेन पुढाऱ्यांना वाटलें. सिन फेन पक्षाच्या ७३ यशस्वी उमेदारांपैकीं बहुतेक तुरुंगांत होते. त्यांतच टेरी होता. आयरिश भाषा बोलणाऱ्या विभागांतर्फे त्याची निवडणूक

झाली होती, व निवडणुकीच्या वेळीं त्याला प्रतिस्पर्धींच कोणी नव्हता. पुढाऱ्यांना तुरुंगांत कोंडून ठेवलें तरी 'सिन फेन'ची नांगी मोडत नाहीं असें पाहून सरकारनें मे महिन्यांत साऱ्या पुढाऱ्यांना सोडून दिलें.

तुरुंगांतून सुटल्याबरोबर या पुढाऱ्यांचा नेहमींचा कार्यक्रम सुरू झाला. आयरिश प्रजासत्ता स्थापण्याच्या कार्याची पूर्व तयारी करण्याचें काम त्यांनीं ताबडतोब हातीं घेतलें. हे पुढारी तुरुंगांत होते तेव्हां ७३ उमेदवारांपैकीं बाकीच्यांनीं आपली एक सभा भरविली होती. आयर्लंडतर्फें निवडून आलेल्या सिन फेनवाल्यांनाच केवळ नव्हे तर सर्व प्रतिनिधींना त्यांनीं त्या सभेला येण्याविषयीं आमंत्रण दिलें होतें. इंग्लंडचा व आयर्लंडचा यापुढें कांहीं एक संबंध उरलेला नसून आयरिश प्रजासत्ता आतां अस्तित्त्वांत आली आहे, असा ठराव त्यांनीं त्या सभेंत पास करून जाहीर केला होता. 'सिन फेन'चे पुढारी बंधमुक्त झाल्यावर त्या पक्षाला चांगलाच जोर आला, व या ठरावाप्रमाणें देशांत प्रजासत्ता प्रस्थापित करण्याचें काम झपाट्यानें सुरू झालें. इमॉन डी व्हॅलेरा यास प्रजासत्ताक राज्याचा पहिला अध्यक्ष निवडण्यांत आलें, प्रधान मंडळाचीही स्थापना झाली, कर्जाची देखील उभारणी झाली, आणि देशांतील राज्यव्यवस्थेचा खरा प्राण आपल्या हातीं घेऊन फार तर नुसतीं हाडकें इंग्रज सरकारच्या तोंडीं ठेवण्याचें कार्य घडवून आणण्यासाठीं आयर्लंडची राजसभा 'डेल आयरिन' निकरानें खटपट करूं लागली. या कार्याच्या ऐन गर्दींत टेरी होता. डब्लिन शहरीं होणाऱ्या 'डेल'च्या बैठकांत तो प्रमुखपणें भाग घेत होता. कॉर्क शहराच्या स्वयंसेवकांच्या व्यवस्थेकडेही त्याला लक्ष पुरवावें लागत होतें. आणि आपल्या परगण्याच्या सर्वांगी उन्नतीसाठीं त्याची खटपट अहर्निश चाललेली होती.

हळू हळू 'डेल आयरिन'नें आपले हात चांगलेच पसरले, आणि तिची सत्ताही चांगलीच प्रस्थापित व्हावयास लागली. तिनें

उभारलेल्या कर्जाला पूर्ण यश मिळालें, तिचे हुकूम आणि कायदेकानू लोक मनापासून पाळूं लागले, आणि १९१९ मध्यें स्थानिक कौन्सिलां-साठीं जेव्हां निवडणुकी झाल्या तेव्हां सर्व पक्षांपेक्षां किती तरी बहु-मतानें सिन फेनपक्षच लोकांनीं उचलून धरला. याप्रमाणें पार्लमेंटमध्यें व स्थानिक कौन्सिलांतही सिन फेनचें वर्चस्व झाल्यामुळें आपल्या सर्व कामांची एकसूत्रता करणें सिन फेनवाल्यांना सोपें झालें, आणि उरलें सुरलें लोकमतही प्रजासत्तेच्या बाजूला ओढण्यास त्यांना अडचण पडली नाहीं. त्यांनीं आपलीं प्रजासत्तावादी न्यायकोर्टें स्थापन केलीं, सर्व तंट्या-बखेड्यांचा निकाल त्या कोर्टांत व्हावयास लागला, फौजदारी खटलेही तेथें चालूं लागले, आणि थोड्याच अवधींत ब्रिटिश कोर्टें पार ओस पडून त्यांतील न्यायाधीश हात जोडून स्वस्थ बसले. आयर्लंडच्या बहुतेक सर्व परगण्यांतील स्थानिक कौन्सिलांनीं व 'बोर्डां'नीं सिन फेनचा प्रजासत्ताक कार्यक्रम मान्य करून अंमलांत आणला, आणि प्रजा-सत्तेच्या राज्याविषयीं निष्ठेची शपथ वाहिली. इतकेंच नव्हे तर प्रजा-सत्तेच्या सैन्यानें—पूर्वींचे स्वयंसेवक आतां प्रजासत्ताक राज्याचें सैन्य बनले—बहुतेक गांवांतून ब्रिटिशांच्या शिपायांना हुसकून लावलें. हे शिपाई फक्त मोठ्या शहरांतच काय तें ठाणें धरून होते. पण तेथें देखील आपल्या बराकीच्या बाहेर पडण्याचा त्यांचा आतां फारसा हिय्या होत नसे.

१९२० च्या वसंत ऋतूंत ही परिस्थिति होती, व ती दृष्टीस पड-तांच ब्रिटिश सरकारनें आपलें शक्तिसर्वस्व खर्च करून प्रजासत्ताक राज्याचा मोड करण्याचा निश्चय केला. न्यायनीतीच्या मार्गानें ही गोष्ट होणें शक्य नाहीं हें सरकार जाणून होतें. पण या वेळीं हालचाल केली नाहीं तर आयर्लंडवरील आपली सत्ता कायमची नष्ट होईल हेंही सरकारला स्पष्ट दिसत होतें. म्हणून शेवटीं, बोअर युद्धाच्या वेळीं जीं निंदास्पद कृत्यें केल्याबद्दल सगळ्या जगांत इंग्लंडची बेअब्रू झाली

होती तींच कृत्यें आयर्लंडमध्यें करण्याचें सरकारनें ठरविलें. दडपशाही, जाळपोळ, लुटालूट आणि खून असलीं नरक लोकांतील शस्त्रास्त्रें हातीं घेऊन सरकारनें जिकडे तिकडे प्रतिकाराचा कल्लोळ उठवून दिला. या कल्लोळांतच मॅक्स्विनीनें शेवटची हिंमतीची झटापट केली, आणि आपली कीर्ति अजरामर करून ठेवली.

प्रकरण चौदावें

## मरणाच्या मांडीवर !

१९१८ सालीं स्थानिक कौन्सिलांच्या निवडणुकी होऊन तीं जेव्हां सिन फेनच्या हातीं आलीं तेव्हां टॉमस कर्टिन यास कार्कचा नगराध्यक्ष (Lord mayor) निवडण्यांत आलें. नगराध्यक्षाचा मान कोणास द्यावयाचा याबद्दल फारसा मतभेद नव्हता. चार पांच नांवेंच सर्वांच्या डोळ्यापुढें होतीं, आणि त्यांत टेरी व टॉमस हीं सर्वांच्या आधीं लोकांना सुचत होतीं. टॉमस उत्कृष्ट वक्ता म्हणून नाणावलेला होता, आयरिश भाषा त्याच्या जिव्हाग्रीं नाचत होती, आणि अगदीं लहानपणापासून त्यानें स्वतःला देशकार्याला वाहून घेतलें होतें. या कारणानेंच नगराध्यक्षपद टॉमसला देण्याचें ठरविण्यांत आलें. त्याच्या निवडणुकीचें सर्व काम आयरिश भाषेंतच झालें. टेरीनेंच प्रथम सूचना पुढें मांडली. टॉमस कर्टिन ही एक असाधारण व्यक्ति होती. तो कवि नव्हता किंवा लेखकही नव्हता हें खरें; पण व्यवहारांत आणि कामाचा रगाडा उरकण्यांत त्याच्या इतका खंबीर माणूस मिळणें अशक्य होतें. आपल्या प्रिय मायभूमीचा भविष्यकाल अत्यंत उज्ज्वल होणार याबद्दल त्याच्या मनांत निस्सीम विश्वास होता. तो कविता करीत नसे, पण त्याच्या स्वभावांत भरपूर काव्य होतें. तो लेख लिहीत नसे, पण मधुर बोलणारा त्याच्यासारखा तोच होता. रेडमंडशीं बेबनाव होऊन स्वयंसेवकांत दुफळी झाल्यापासून 'आयरिश स्वयंसेवकां'चा तो ब्रिगेड कमांडंट होता. टेरी आणि टॉमस म्हणजे दोन जोडीचे हिरे होते. अशी जोडी जो पाहील तो भाग्यवान्! जीवाभावाच्या मैत्रीनें ते सारीं कामें करीत. टॉमसचें नांव टेरीनें सुचविलें आणि लोकांनीं टॉमसला नगराध्यक्ष निवडलें हें उचितच झालें.

टॉमसनें अधिकाराचीं सूत्रें आपल्या हातीं घेतल्याला पुरते दोन

आठवडे झाले नाहींत तोंच लोकांची खात्री झाली, कीं उत्तमांतील उत्तम नगराध्यक्ष आपल्याला मिळाला आहे. शहराच्या मंत्रिमंडळांतील (Corporation) सर्व पक्षांच्या लोकांवर त्यानें आपली जरब ठेवली होती, व त्यांच्याशीं त्यानें स्नेहभावही राखला होता. प्रजासत्ताक राज्य कसें काय चालतें याची त्या वेळीं परीक्षाच होती. त्या परीक्षेंत कॉर्क शहरापुरता तरी सिन फेन पक्ष पहिल्या नंबरचा ठरला. नुसता सर्वांत लोकप्रियच नव्हे तर सर्वांत कार्यक्षम नगराध्यक्ष कॉर्क शहराला लाभला होता. आणि हीच गोष्ट ब्रिटिश सरकारास जणूं शल्या-सारखी बोंचूं लागली. १९२०च्या जानुआरी महिन्यांत टॉमस लॉर्ड मेयरचें काम पाहूं लागला, आणि मार्च महिन्याच्या १९ तारखेस भर मध्यरात्रीं त्याच्या स्वतःच्या घरांत त्याला गोळ्या घालून ठार करण्यांत आलें. हा अत्याचार करणाऱ्या माणसांनीं तोंडावर बुरखे घेतलेले होते. परंतु हें कृत्य पोलीसांचेंच असल्याबद्दल कोणाच्याही मनांत संशय नव्हता. कॉरोनरच्या ज्यूरीकडून जेव्हां टॉमसच्या खुनाची चौकशी झाली तेव्हां त्या ज्यूरीनें तर इंग्लंडचे प्रधान लॉइड जॉर्ज यांवर आणि प्रत्यक्ष गोळ्या घालणारे कॉर्कचे पोलीस यांजवर जाणून बुजून खून केल्याचा आरोप स्पष्टपणें ठेवला.

टॉमसची रिकामी जागा भरून काढणें भाग होतें, आणि त्या कामासाठीं ३० मार्चला जेव्हां कार्पोरेशनची सभा भरली तेव्हां सर्वांनीं एकमतानें टेरीचें नांव घेतलें. माजी लॉर्ड मेयरचा टेरी हा अत्यंत जिवलग स्नेही आणि सहकारी होता, इतकेंच नव्हे तर टॉमसच्या मागें टेरीइतका कार्यक्षम मनुष्य दुसरा कोणीच नव्हता. टॉमसची जागा भरून काढण्यास टेरीला निवडणें याचा अर्थ टेरीला मरणाची तयारी करण्यास सांगण्यासारखें होतें. टेरीच्या नेमणुकीची ज्यानें सूचना केली त्याच्या मनांतच नव्हे, तर ज्यानें त्या सूचनेला दुजोरा दिला त्याच्या व बाकी सर्वांच्याही मनांत हा अर्थ त्या प्रसंगीं पूर्णपणें आलेला

होता. ज्यांनीं टॉमसचा खून केला ते टेरीचाही खून पाडल्याखेरीज राहणार नाहींत हें प्रत्येकास स्पष्ट दिसत होतें. पण टेरीला जळत्या खाईंत उडी घालावयास सांगण्यास तेही कचरले नाहींत, आणि त्यांनीं सांगतांच उडी ठोकण्यास टेरीही क्षणभर देखील कचरला नाहीं. कारण तसें करणेंच त्यावेळीं त्याचें कर्तव्य होतें. ती सिन फेन पक्षाच्या कसोटीची वेळ होती हें इतरांपेक्षांही त्याला अधिक कळत होतें. ही कसोटी अत्यंत कठीण असणार हेंही इतरांपेक्षां तो अधिक समजून होता. पण त्याला असेंही पक्कें वाटत होतें, कीं कसोटीची आग सिन फेन पक्षावर पडत असतांना, आज कित्येक शतकांत दृष्टीस पडलें नसेल असें चिकाटीचें व धैर्याचें लोकोत्तर उदाहरण आयर्लंडच्या दृष्टीसमोर ठेवणें, हें सिन फेन पक्षांतील प्रत्येक वीराचें कर्तव्य होय. टॉमसची जागा भरून काढतांना आपण अशा रीतीनें आपले प्राण होमांत टाकले तर, नव्हे टाकले तरच, आपल्या पाठीमागें अनंत देशभक्त आपल्या प्राणांचें हवन करावयास पुढें सरसावतील, असा त्याचा दृढ विश्वास होता. मायदेशाच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाचा आपण आपल्या पिढींतच निकाल लावून टाकूं असें त्याचें मन त्याला सांगत होतें.

लिॲम डी रॉइस्ट यांनीं आयरिश भाषेंत भाषण करून टेरीच्या निवडणुकीची सूचना पुढें मांडली, बॅरी यांनीं आयरिश भाषेंत तिला दुजोरा दिला, आणि सर जॉन स्कॉट यांनींही अनुमतिदर्शक भाषण केल्यावर टेरीची लॉर्ड मेयर म्हणून एकमतानें निवडणूक झाली. टेरीनें त्या वेळीं उत्तरादाखल जें भाषण केलें त्याच्या मोलाला पारावार नाहीं. त्या भाषणांतील प्रत्येक वाक्यांत टेरीचें अंतःकरण आणि आयर्लंडची त्या वेळची परिस्थिति उत्कृष्टपणें प्रतिबिंबित झालेली आहे. प्रथम कांहीं वेळ इंग्रजीमध्यें बोलल्यानंतर टेरीनें आयरिश भाषेंत भाषण केलें तें असें:—

" मी अगदीं थोडें बोलणार आहे. फार बोलावयाचा हा प्रसंगच

नाहीं. एकमेकांचे आभार मानण्याचे उपचार करण्याची तर ही वेळ मुळींच नाहीं. ज्या परिस्थितींत लॉर्ड मेयरची जागा रिकामी पडली त्याच परिस्थितींत मी ती भरून काढीत आहे. अर्थात् आपल्या म्युनिसिपॅलिटींतील पहिल्या प्रतीच्या जागेवर बसणारा अधिकारी म्हणून मी पुढें येत नसून पुढच्या रांगेंतील वीर लढतां लढतां मरून खालीं पडला, कीं चटकन् पुढें होऊन त्याची जागा भरून काढणाऱ्या सैनिकाच्या नात्यानेंच मी पाऊल पुढें टाकीत आहे. शांततेचा काल असता तर सार्वजनिक कामांत कसलेला, अनुभवी गृहस्थ निवडून त्याला अध्यक्ष करणें हेंच तुमचें कर्तव्य होतें. पण आजचा काल शांततेचा नाहीं. ज्या रीतीनें माजी लॉर्ड मेयरचा खून झाला त्या रीतीवरून असें स्पष्ट दिसत आहे, कीं आपल्याला घाबरवून सोडण्याचा शत्रूचा प्रयत्न आहे. शत्रूच्या या प्रयत्नाला रोख ठोक उत्तर द्यावयाचें असेल तर तें एकच आहे. आपण किंचितही भांबावलों नाहीं, आपण शांत आहोंत, आणि आपल्या मायदेशाचें स्वातंत्र्य राखण्याचा आपला निश्चय रतिभरही ढळलेला नाहीं, अशी आपल्या वर्तनानें आपण शत्रूची खात्री पटविली पाहिजे. त्यासाठींच मी आज पुढें होत आहे. खुनाला बळी पडलेल्या माजी लॉर्ड मेयरशीं आज कित्येक वर्षें माझा सर्वांत निकट स्नेह होता. तुरुंगांत आणि तुरुंगाच्या बाहेर आम्ही एकमेकांचे जोडीदार होतों. मृत्यूनें आमची ताटातूट केली, त्या क्षणा-पर्यंत आम्ही आपल्या प्रिय मायभूमीसाठीं खांद्याला खांदा लावून काम करीत होतों. म्हणूनच त्यांच्या जागीं आज मी उभा रहात आहे. ज्यांनीं त्यांच्यावर प्रहार केला त्यांना हेंच उत्तर दिलें पाहिजे. (टाळ्या). याच वेळीं दुसऱ्याही एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे. ती म्हणजे आपल्या शहराचा नेहमींचा कारभार उत्तम तऱ्हेनें चालू ठेवण्याविषयीं होय. आपले माजी लॉर्ड मेयर आपणां सर्वांना अत्यंत प्रिय होते हें खरें, व त्यांच्या निधनाच्या दुःखाचा भार

असह्य आहे हेंही खरें आहे. परंतु त्या शोकभरानें वांकून आपण आपल्या नेहमींच्या कामांत ढिलाई होऊं दिली तर त्यासारखी शत्रूला आनंददायक दुसरी गोष्ट नाहीं. कारण आपण ढिले झालों, कीं आपलें कार्य उलथून पाडण्यास शत्रूला अधिकच अवसर मिळेल. आपल्या शहराचीं नेहमींचीं कामें सुरळीतपणें चालू राहिलीं पाहिजेत, त्यांत किंचितही खंड पडूं न देण्याचा आपण अटोकाट प्रयत्न केला पाहिजे व आपले पूर्वीचे लॉर्ड मेयर जितक्या दक्षतेनें तीं कामें करीत होते तितकीच दक्षता आपणही राखली पाहिजे. माझें एकट्याचेंच नव्हे तर आपणां सर्वांचेंही असेंच मत असेल अशी माझी खात्री आहे. खाजगी गोष्टी या वेळीं बोलण्याची माझी फारशी इच्छा नाहीं. पण इतकें मात्र सांगावेंसें वाटतें, कीं आपल्या माजी लॉर्ड मेयरना निवडण्याच्या कामीं मीं बरीचशी खटपट केली होती. लॉर्ड मेयरच्या जागेसाठीं त्यांनीं कधींच प्रयत्न केला नाहीं. इतकेंच नव्हे, तर असली मानाची जागा आपल्याला नको असाच आग्रह त्यांनीं प्रथम धरला होता. मान म्हणून नव्हे तर कर्तव्य म्हणून ती जागा स्वीकारण्यास त्यांस मी सांगितलें, तेव्हांच त्यांनीं आपल्या निवडणुकीला संमति दिली. आम्ही दोघजण नेहमीं खुल्या दिलानें प्रत्येक गोष्टीची चर्चा करीत असूं, व त्याप्रमाणेंच आपल्या शहराच्या कारभाराविषयींही आम्हीं पुष्कळ खल केला. आपल्या ध्येयाचाच नव्हे, तर आज घटकेला आपल्याला प्रत्यक्ष कार्य कोणतें करतां येईल त्याचाही आम्ही दोघांनीं पुष्कळ विचार केला. त्या विचाराला अनुसरूनच ते पुढें वागले व त्यांत त्यांनीं जी तत्परता आणि कुशलता दाखविली तिची तुलनाच करतां यावयाची नाहीं. मित्रहो, माजी लॉर्ड मेयराविषयीं आपल्या मनांतील भक्ति तुम्ही सर्वांनीं दाखविलीच आहे. माजी लॉर्ड मेयरनीं ज्या दक्षतेनें व दूरदृष्टीनें लहान लहान गोष्टींकडेदेखील लक्ष पुरविलें ती दक्षता व दूरदृष्टि या सभेंत आपल्या एकाच्याही अंगीं नाहीं हें मी पक्कें जाणतों. पण

त्यांनीं आंखून दिलेल्या मार्गानें जातांना कार्यक्षमता नाहीं तर निदान कार्यनिष्ठा आणि चिकाटी यांत मी कसूर करणार नाहीं इतकें मी तुम्हांला आश्वासन देतों. (टाळ्या). आपलें नेहमींचें कर्तव्य कोणतें याविषयीं सुचलेले चार शब्द मी आतां बोललों खरा. पण ते बोलतांना देखील आपण विषयांतर करीत आहोंत असें मनाला सारखें वाटत होतें. कारण शत्रूची नागवी तरवार आपल्या डोक्यावर सारखी टांगलेली आहे, आणि आपल्या अंतःकरणांतील कार्याविषयींची तळमळ शत्रूला पुरती पटविणें, आणि संकटमय भविष्यकाळाला आपण कसें तोंड देतों तेंही शत्रूच्या पूर्ण निदर्शनास आणणें, हेंच या घटकेचें आपलें कर्तव्य होय. आपलें ध्येय उदात्त आहे आणि हेतु पवित्र आहे. त्या ध्येयाला व हेतूला अनुसरूनच या संवत्सराला आपण प्रारंभ केलेला आहे व शेवटपर्यंत आपण तेंच ध्येय संभाळूं. आपल्या शहरासाठीं नव्या उत्साहानें कामाला लागून आपण अशा कांहीं जोमानें कारभार हांकला पाहिजे, कीं आपल्या शहराचें नांव होईल, आणि पहिल्या प्रतीच्या शहरांत त्याला स्थान मिळेल. इतकेंच काय, या शहरासाठीं झटावें आणि वेळ पडल्यास प्राणही द्यावा अशी भावना प्रत्येकाच्या मनांत उत्पन्न होईल असें आपलें शहर आपण सर्वांगसुंदर करून सोडलें पाहिजे. माजी लॉर्ड मेयरच्या निवडणुकीनंतर आपली पहिली सभा झाली त्या वेळीं मी जें बोललों त्याची या वेळीं पुनरुक्ति करावीसें मला वाटतें. त्या वेळीं सभेंतील अल्पसंख्याक पक्षांतील मंडळींना उद्देशून मीं असें म्हटलें, कीं प्राणांवर संकट येत नसेल तर आमच्याशीं ते इमान राखतील, पण आम्ही सुरू केलेल्या मायदेशाच्या स्वातंत्र्याच्या कामाची तड लावण्यांत प्राण गेले तरी बेहत्तर अशा निकरानें आम्हांला मदत करण्याइतकी त्यांची तयारी नाहीं. तीच गोष्ट आज मी पुन्हां बोलून दाखवितों. कारण आमच्या सामर्थ्याचें खरें मर्म कोठें आहे, आणि अखेर आम्हांलाच विजय मिळणार असा दृढ

विश्वास आम्हांला कां वाटतो, तें स्पष्ट समजावून सांगण्याची माझी इच्छा आहे. दुष्ट लोकांचें आणि खुनी माणसांचें पुरें पारिपत्य केल्या-खेरीज आम्ही कधींही राहणार नाहीं हें जरी खरें, तरी केवळ खुनाला खून पाडणें किंवा सुडाचा सूड उगविणें हें आमचें मुख्य कार्य नव्हे. आत्मक्लेश व आत्मशुद्धि हेंच आमचें खरें कार्य होय. कारण विजय अखेर कोणाला मिळतो? जे दुसऱ्याचा छळ करूं शकतात त्यांना नव्हे, तर जे दुसऱ्याचा छळ सहन करूं शकतात त्यांना! आमच्या मार्गांत अड-थळे उपस्थित करणें व आमच्यावर संकटें आणून आमची स्वराज्यप्राप्ति कांहीं काळ लांबणीवर टाकणें, या गोष्टी आमचे शत्रू करणारच. आणि अशा वेळींच आपला ईश्वरावर किती भरंवसा आहे, व हाल-अपेष्टा सहन करण्याची आपली किती तयारी आहे त्याची परीक्षा व्हावयाची असते. ज्यांची श्रद्धा अढळ आहे ते संकटांतही अढळ राहतील व अखेर विजयश्री मिळवितील. सध्यांचा काळ आशेचा वाटतो याचें कारण इतकेंच, कीं मी म्हणतों त्या श्रद्धेनें देशांतील बहुजनसमाज प्रेरित झालेला आहे. आमच्यासारखें ज्यांचें मत नाहीं त्या अल्पसंख्याक लोकांना मला हेंच सांगावयाचें आहे. त्यांनीं धीर धरावा आणि आशा सोडूं नये. त्यांचें मन दुखविण्याची माझी इच्छा नाहीं. पण मला तर असें वाटतें, कीं त्यांचा प्रभूपेक्षां सैतानावर निस्सीम विश्वास आहे. परमेश्वर वरून आपल्याकडे पहात आहे. त्याच्या न्यायी-पणावर पूर्ण निष्ठा ठेवा. गेल्या पांच सहा वर्षांचा आयर्लंडचा इतिहास ज्यानें नीट पाहिला असेल त्याला तर आयर्लंड देश इतक्या संकटाच्या प्रलयांत कायम तरी कसा राहिला असा विस्मय वाटत असेल. खरोखर मी तो एक ईश्वरी चमत्कारच समजतों. आमच्यावर अशा प्रकारें संकटांची परंपरा गुदरूं देण्यांत ईश्वराचा येवढाच हेतू असला पाहिजे, कीं आमचा निश्चय कसाला लागावा, आणि माय-देशाचा भविष्यकाळ उज्ज्वल करण्याचें सामर्थ्य आमच्या अंगीं प्रगट

व्हावें. आयर्लंडचा तेजस्वी भविष्य काळ ज्यांना आमच्याइतका स्पष्ट दिसत नाहीं त्यांची ढोंगी गुरूंनीं दिशाभूल केलेली आहे. ज्याच्यासाठीं आम्ही आज लढत आहोंत तें ध्येय पवित्र आहे. शरीर व आत्मा संबद्ध झालेले असतात त्याप्रमाणेंच ज्या आत्मिक स्वातंत्र्यासाठीं आपला येशू ख्रिस्त सुळावर चढला त्या स्वातंत्र्याचा व आमच्या देशाच्या स्वातंत्र्याचा अत्यंत निकट संबंध आहे. स्वातंत्र्य अत्यंत पवित्र आहे आणि त्यासाठीं प्राण देणें हा एक परममंगल हवनविधि आहे. म्हणूनच येशूख्रिस्ताप्रमाणें आमच्या देशांतील उत्तमोत्तम नरशार्दूलांनीं शांतीनें व धीरानें मरणाचा मार्ग पतकरिला. कधीं कधीं आपल्या पुढाऱ्यांच्या या मरणाचें असह्य दुःख वाटूं लागतें व मग 'केवढा हा त्याग आम्हांला करावा लागत आहे!' असें आपण विव्हळूं लागतों. पण हें विसरतां कामां नये, कीं ते पुढारी सर्वांत उत्तम व सर्वांत शूर होते म्हणूनच त्यांना मृत्यु स्वीकारावा लागला. याहून कमी त्याग केला तर देशाची पारतंत्र्यांतून सुटका होणार नाहीं. त्या त्यागामुळेंच आपल्या शस्त्रांना तेज चढतें, त्यांच्या रक्ताच्या थेंबांनींच आपले प्रयत्न शुचिर्भुत होतात, आणि त्यांच्या आत्माहुतीच्यामुळेंच विजयश्री प्रसन्न होऊन आपल्या बाजूला येते. त्या नरवीरांनीं जें कार्य करतां करतां देहपात पतकरला तेंच कार्य आपण हातीं घेतलें पाहिजे, व परमेश्वरावर हवाला ठेवून आपल्या प्राणांचें हवन करण्यास तयार झालें पाहिजे. निरपराधी रक्त सांडण्याचें काम आपलें नाहीं; उलट, आपल्याच रक्ताचा सडा शिंपडण्यास आपण तयार आहोंत. मायदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं हा आत्मत्याग करतांना आपल्याला धीर पाहिजे असेल तर येशू ख्रिस्ताचें उदाहरण आठवावें. शत्रूच्या समोर दंड ठोकून उभें राहून आपला विचार आपण खड्या जबाबानें सांगितला पाहिजे. आम्हांला कोणाची दया नको, कोणाची करुणा नको, कोणत्याही समेटाला आम्ही तयार नाहीं. आमचा कितीही छळ झाला तरी आमचा धीर सुटूं नये आणि आमच्या प्रिय

देशाला आमच्या हातून अखेर स्वातंत्र्याची प्राप्ति व्हावी, येवढी त्या प्रभूजवळ मात्र आम्ही पुनः पुन्हां करुणा भाकतों. सारें सुधारलेलें जग आमच्या या छळाकडे असेंच उदासीन वृत्तीनें यापुढेंही पहात राहील, ही गोष्ट शक्य नाहीं. तथापि त्यांतूनही पृथ्वीवरच्या राजांनीं आपल्याला मदत केली नाहीं, तरी सर्व राजांचा राजा तो दयाघन प्रभू आपली पाठ राखल्याशिवाय राहणार नाहीं. आपल्या आतुर दृष्टीला प्रभूचा न्याय एखादे वेळीं मंदगति वाटेल, पण त्या न्यायाचा अंमल झाल्या-वांचून राहणार नाहीं आणि जेव्हां तो होईल तेव्हां पृथ्वीवरील सर्व अन्यायांच्या राशी त्यापुढें कोसळून पडतील व कायमच्या नष्ट होतील!"

या तेजस्वी भाषणाचें सौंदर्य मोजावयास कोणतें माप पुरें पडेल? "अधिकारी म्हणून नव्हे तर संवगड्याची जागा भरून काढणारा सैनिक म्हणून मी पुढें पाऊल टाकीत आहे." केवढ्या तोलाचे शब्द हे! ते टेरेन्स मॅक्स्विनीच्या तोंडून बाहेर पडले, पण त्या शब्दांनीं प्रदर्शित केलेला विचार त्या वेळीं सर्वांच्याच मनांत अगदीं वर होता. आणि तसेंच "विजय अखेर कोणाला मिळतो? जे दुसऱ्यांचा छळ करतात त्यांना नव्हे तर जे दुसऱ्यांचा छळ सहन करतात त्यांना!" एकेक शब्द म्हणजे तेजःपुंज ताऱ्याप्रमाणें वाटतो! बोलणाऱ्याच्या अंतःकरणांतील भावनांचा व निश्चयाचा उमाळा तंतोतंत वठविणारें असें हें भाषण ज्यांना ऐकावयास मिळालें ते धन्य होत!



“—आपल्या आतुर दृष्टीला प्रभूचा न्याय एखादे वेळीं मंदगति वाटेल, पण त्या न्यायाचा अंमल झाल्यावांचून राहणार नाहीं. आणि जेव्हां तो होईल, तेव्हां पृथ्वीवरील सर्व अन्यायांच्या राशी त्यापुढें कोसळून पडतील व कायमच्या नष्ट होतील.” पृष्ठ १०२.

“—या कामांत माझे प्राण खर्ची पडतील हें मीं पहिल्यापासून ओळखलेलें आहे. पण मीं हेंही ओळखलेलें आहे,कीं मी जगलों किंवा मेलों, कांहीं झालें तरी विजयश्री माझ्याच बाजूला येणार!” पृष्ठ. ७१.

प्रकरण पंधरावें

# सूर्यग्रहण

प्रजासत्ताक राज्यांतील कॉर्क शहराचा पहिला लॉर्ड मेयर अत्यंत यशस्वी ठरला होता. आणि दुसराही तितकाच यशस्वी झाला. टॉमस कार्टिनहून टेरीचा स्वभाव निराळ्या वळणाचा होता आणि त्याच्या मनाची ठेवणही निराळ्या प्रकारची होती हें खरें. परंतु म्युनिसिपालिटीच्या कारभाराच्या बाबतींत टेरीच्या अंगचे भिन्न गुणही उपयुक्तच ठरले. अधिकाराचीं सूत्रें हातीं घेतल्यापासून टेरीनें कार्पोरेशनचें काम रात्रंदिवस हातीं धरलें. एखाद्याच्या हातून उभ्या जन्मांत पार पडलें नसतें इतकें काम त्यानें या अल्पावधींत उरकलें असें देखील म्हणावयास हरकत नाहीं. त्याच्या धुरीणत्वाखालीं कॉर्कच्या प्रजासत्ताक म्युनिसिपॅलिटीनें आपले नेहमींचे क्रमप्राप्त प्रश्न उत्तम रीतीनें सोडविले; इतकेंच नव्हे, तर प्रजासत्ताक म्युनिसिपॅलिटीच्या सांपत्तिक स्थितीचा बोजवारा करण्यासाठीं ब्रिटिश सरकारकडून अहर्निश चाललेल्या प्रयत्नांना तिनें निकरानें तोंड दिलें, आणि म्युनिसिपॅलिटीच्या कारभाराच्या सबंद यंत्राची कसोशीनें पाहणी व सुधारणा करण्याचें अत्यंत अगत्याचें व अत्यंत अवघड काम देखील तिनें हातीं घेतलें. नगराध्यक्ष या नात्यानें टेरीला शहरांतील सर न्यायाधिशाचेंही काम पहावें लागत असे, व तें काम आपल्या हातून नमुनेदार व्हावें अशी त्याची खटपट असे. परदेशांतील मोठमोठ्या शहरांच्या म्युनिसिपॅलिट्या महत्त्वाच्या प्रश्नांची सोडवणूक कशी करतात तें समजून घेण्यासाठीं टेरीनें त्यांच्याशीं मोठा पत्रव्यवहार सुरू केला, परदेशचे लोक व ठिकठिकाणच्या वर्तमानपत्रांचे बातमीदार त्याच्या मुलाखती घ्यावयास येत त्यांना त्यानें आपल्या पक्षाविषयीं आणि कारभाराविषयीं माहिती करून दिली आणि शहरांतील बालसंगोपनाच्या प्रश्नाचा तर त्यानें विशेष आस्थेनें अभ्यास

चालविला. त्याच्या नेहमींच्या स्वभावधर्माला अनुसरून कोणताही प्रश्न हातीं घेतला, कीं त्याची पुरती छाननी करून तो तडीला लावल्या-खेरीज टेरी स्वस्थ बसत नसे. कॉर्कच्या लोकांची थोड्याच दिव-सांत खात्री झाली, कीं एखाद्या प्रश्नावर टेरीनें मत दिलें, कीं तें मत ग्राह्य धरून त्याप्रमाणें सर्वांनीं डोळे मिटून चालावयास कांहीं हरकत नाहीं. याशिवाय आयरिश प्रजासत्ताक सैन्याचा तो 'कमांडंट' होता व याही कामांत म्युनिसिपॅलिटीच्या कामाइतकेंच सूक्ष्म नजरेनें आणि पुऱ्या अंतःकरणानें त्यानें लक्ष घातलें. तो काळ असा होता, कीं काम, काम, सारखें काम करण्यावांचून टेरीला दुसरें कांहीं सुचत नव्हतें. कामाच्या गर्दींत जो काय जरा ढिलाई करण्यासारखा वेळ मिळेल तेवढ्यांतच तो आपलें जेवणखाण कसेंबसें उरकीत असे. त्याचा एक जुना स्नेही या वेळीं सुटी काढून कॉर्कमध्यें आला होता व टेरीला रोज भेटावें अशी त्याची फार इच्छा असे. पण त्याला टेरी म्हणे, "दुपारीं पाऊण वाजतां ये. जेवण्यासाठीं घरीं जावयाची माझी ती वेळ आहे. तूं माझ्या कचेरींत ये. तेथून माझ्या घरापर्यंत आपण बरोबर चालत जाऊं. आणि तुझी ना नसेल तर आपण बरोबर गप्पा मारींत जेवण करूं." जेवण करून ताबडतोब दीड वाजतां तो परत कचेरींत येई आणि पुन्हां आपल्या कामांत गढून जाई. कामाचा ताण सहन करण्याचा त्याचा तो निश्चय खरोखर अद्भूत होता. सिन फेन पक्षावर केवढी जबाबदारी पडली आहे त्याची खरी कल्पना त्याच्याइतकी दुसऱ्या कोणाला क्वचितच असेल, व आपल्यावर पड-लेली जबाबदारी पार पाडण्याचा करारीपणा त्याच्याइतका दुसऱ्या कोणाच्या अंगीं क्वचितच असेल. आपली दिशा व धोरण निश्चित-पणें आंखून त्यानें प्रत्येक लहान मोठें काम चालविलें होतें; आणि टेरी म्हणजे एक उत्कृष्ट कार्यकारी मुत्सद्दी होय अशी त्यानें आपल्या मित्रांइतकीच शत्रूंचीही खात्री लवकरच पटवून दिली.

हा प्रकार ब्रिटिश सरकार उघड्या डोळ्यांनीं स्वस्थपणें पाहील हें संभवनीयच नव्हतें. प्रजासत्तावादी लोकांची नेकी, त्यांची कार्यक्षमता आणि सहिष्णुता लोकांना पूर्णपणें पटत चालली होती, व ब्रिटिश राज्याशीं अजूनही निष्ठा ठेवणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली होती. पण येवढ्यानेंच भागलें नाहीं. म्युनिसिपॅलिटीच्या कारभारांतून वशिला आणि खादाडपणा या दोन पिशाचांची पुरती हकालपट्टी करण्याचा 'सिन फेन'वाल्यांनीं सपाटा चालविला, आणि कमींत कमी खर्च आणि ज्यास्तींत ज्यास्ती कामाची सफाई या तत्त्वाच्या पायावर कारभाराची इमारत त्यांनीं उभारली. म्युनिसिपॅलिट्या लोकमताच्या कक्षेंत येण्यापूर्वीं 'युनियनिस्ट' पक्षाचे अधिकारी त्यांचा कारभार चालवीत; पण त्यांच्या कारभारांत न्याय किंवा क्षमता चुकून देखील दृष्टीस पडत नसे. नंतर 'युनिअनिस्ट आयरिश लीग' व मि. डेव्हलिन यांच्या हातीं तो कारभार आल्यावर तर म्युनिसिपॅलिट्या आंतून बाहेरून सडून गेल्या होत्या. आतां 'सिन फेन'वाले अधिकारारूढ झाल्यापासून ही सारी कीड झाडून काढण्याचें काम त्यांनीं झपाट्यानें केलें. आणि त्यांच्या कारभाराची स्वच्छ, सुंदर इमारत लोकांच्या दृष्टीस हळू हळू पडावयास लागली. शहरों शहरीं 'सिन फेन'वाल्यांनीं सारखेंच काम केलें. मनुष्य कोणत्याही राजकीय मताचा असो, न्याय, निःपक्षपातीपणा आणि कार्यक्षमता यांची किंमत ज्याला ज्याला म्हणून नीट कळत होती, त्याला त्याला आपणांस पाहिजे तसा कारभार प्रजासत्तावाद्यांच्या हातून होत आहे अशी खात्री पटली. दक्षिण आयर्लंडांत प्रजासत्तेला जो कांहीं थोडा फार विरोध उरला होता तोही आतां पार नाहींसा झाला.

हा प्रकार पाहून ब्रिटिश सरकारला भीतियुक्त विस्मय वाटला असल्यास नवल नाहीं. प्रजासत्तावाल्यांच्या कारभाराच्या यत्राची मोडतोड करण्याचें त्यांनीं मनाशीं ठरविलें. ज्या ठिकाणीं न्याय कोर्टें स्थापन

झालीं होतीं त्या ठिकाणीं त्यांनीं तीं उधळून लावलीं, म्युनिसिपॅलिटीच्या मंत्रिमंडळाच्या प्रमुख सभासदांची धरपकड सुरू केली, आणि दंडुकेशाहीचा उपयोग अप्रतिहत रीतीनें करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. या दंडुकेशाहीच्या धोरणास अनुसरूनच १२ ऑगस्ट रोजीं रात्रीं सात वाजून चाळीस मिनिटांनीं कॉर्कच्या नगरभवनावर (City Hall) सरकारच्या लष्करानें एकदम छापा घातला. नगरभवनांत त्या वेळीं एका कैफियतीचा निवाडा करण्यांत टेरी आणि प्रजासत्ताक कोर्ट गुंतलें होतें. टेरीला व इतर दहा इसमांना गिरफदार करण्यांत आलें. त्यांच्यावर त्या वेळीं कोणताही आरोप ठेवण्यांत आला नाहीं, किंवा आरोप ठेवण्यासारखें कांहीं त्यांच्या झडतींतही सांपडलें नाहीं. म्हणून त्याच रात्रीं साडेअकरा वाजतां नगरभवनावर पुन्हां लष्करी छापा घालण्यांत आला, टेरीचें खाजगी कपाट जबरदस्तीनें फोडण्यांत आलें व बरेचसे कागदपत्र बरोबर घेऊन लष्करी अधिकारी निघून गेले. याच कागदपत्रांच्या आधारावर पुढें टेरीवर आरोप ठेवण्यांत आले.

टेरीला पकडल्यानंतर डिटेन्शन बराकींत त्याची रवानगी झाली. त्या वेळीं मेजर बेली हा बराकीवर होता. त्यानें टेरीला ताब्यांत घेतांना त्याचें नांव त्याला विचारलें व तें टेरीनें सांगितलें. नंतर त्याच्याजवळ असलेल्या वस्तु बेलीनें आपल्या ताब्यांत घेतल्या. सार्‍या वस्तु घेतल्यानंतर नगराध्यक्षाचा हुद्दा दर्शविणारी सांखळी आणि छातीवरचें चिन्ह बेलीनें मागितलें. तेव्हां त्याच्याकडे विलक्षण आवेशाच्या मुद्रेनें पहात टेरीनें उत्तर दिलें, "मी मरेन, पण या सांखळीला तुला स्पर्श करूं देणार नाहीं!"

पकडल्यापासून टेरीनें व इतरांनीं अन्नत्याग केला. त्यामुळें १५ ऑगस्टला टेरीखेरीज इतरांची मुक्तता झाली. टेरीवर मात्र पुरता प्रहार करण्याचें सरकारनें निश्चित ठरविलें होतें. १६ ऑगस्ट रोजीं एका लष्करी कोर्टापुढें टेरीचा खटला मांडण्यांत आला. (१) कायदे-

शीर परवानगीवांचून एक गुप्त लिपी जवळ बाळगणें, (२) या गुप्त लिपीची व्यवस्था हातीं ठेवणें, (३) राजाविषयीं असंतोष उत्पन्न करण्यासारखे कागदपत्र जवळ बाळगणें, आणि (४) टॉमस कार्टिनची जागा भरून काढतांना राजद्रोहात्मक भाषण करणें, असे चार आरोप टेरीवर ठेवण्यांत आले.

पकडल्यापासून टेरीनें अन्नग्रहण केलें नव्हतें व त्याचा परिणाम त्याच्या चेहऱ्यावर दिसत होता. दोन्ही बाजूंस दोन सशस्त्र पहारेकरी उभे करून एका आराम खुर्चीवर त्याला बसविलें होतें. खटल्याच्या वेळीं टेरीचे अनेक स्नेही व सहकारी हजर होते, आणि टेरीची बायको व बहीणही आली होती. कोर्टांत सोडण्यापूर्वीं प्रत्येकाची झडती होई.

प्रारंभींच तुमच्यातर्फे कोणी वकील आहे काय असें टेरीला विचारण्यांत आलें. तेव्हां टेरी म्हणाला, "या एकंदर प्रकाराविषयीं मला दोन शब्द बोलावयाचे आहेत. खरी वस्तुस्थिति अशी आहे, कीं मी या कॉर्क शहराचा अध्यक्ष आणि सर न्यायाधीश आहे, आणि या बेकायदेशीर कोर्टाच्या व्यवहारांत भाग घेणाऱ्या प्रत्येक इसमाला आयरिश प्रजासत्ताक राज्याच्या नियमानुसार पकडण्यांत येईल असें मी जाहीर करतों."

यानंतर खटला चालविण्यासाठीं ज्या गृहस्थांची नेमणूक झाली आहे त्यांपैकीं कोणावर तुमचा आक्षेप आहे काय, असा प्रश्न करण्यांत आला तेव्हां टेरीनें उत्तर दिलें "मीं आतां जें सांगितलें त्यांत याचें उत्तर आलें."

"तुम्हांला आपल्यातर्फे कांहीं बोलावयाचें आहे काय?" असें कोर्टानें विचारल्यावर टेरी म्हणाला, "तुमचा अपमान करण्याची माझी इच्छा नाहीं. पण मला असला प्रश्न विचारण्यांत उर्मटपणाचा अपराध तुमच्या हातून घडत आहे."

कोर्टः—"पुढें तुम्हांला कांहीं लेखी जबाब द्यावयाचा असेल तर तो उतरून घेण्यांत येईल."

टेरी:—“ माझे कोणतेही शब्द उतरून घेण्याचें कारण नाहीं. तसें केल्यानें या कोर्टाला नसतें महत्त्व दिल्यासारखें होईल.”

नंतर प्रॉसिक्यूटरनें विस्तृत भाषण करून खटल्याचें स्वरूप कोर्टा-पुढें मांडलें. सार्जंट बेली, लेफ्टनंट गिलिस्क, लेफ्टनंट केल्स वगैरे साक्षी-दारांच्या साक्षी झाल्या व फिर्यादीतर्फेची खटल्याची मांडणी संपली.

नंतर ‘तुम्हांला कांहीं उत्तर द्यावयाचें असेल तर द्या’ असें कोर्टानें सांगितल्यावरून टेरी उठून उभा राहिला. तें पाहून कोर्टाचे अध्यक्ष म्हणाले, “ मॅक्स्विनी, तुम्हीं बसून बोललांत तरी चालेल.”

टेरी म्हणाला:—“ कोर्टाचें काम संपून जाईपर्यंत माझा भार सहन करण्याइतकी माझ्या पायांत ताकद आहे, आणि नंतर मी उभा राहिलों काय किंवा बसलों काय सारखेंच आहे. मीं मघाशींच सांगि-तलें आहे, कीं हें तुमचें कोर्ट आणि त्या कोर्टाकडून झालेला सारा कारभार अजीबात बेकायदेशीर आहे. आयरिश प्रजासत्ताक राज्य अस्तित्वांत आहे हें जाणूनच तुम्ही वागलें पाहिजे. आज तें राज्य तुम्हीं ओळखीत नसलांत तरी लवकरच तें ओळखणें तुम्हांस भाग पडणार आहे. एखाद्या शहराच्या मुख्य अधिकाऱ्याला जबरदस्तीनें पकडणें यासारखा भयंकर गुन्हा दुसरा कोणताच नाहीं, आणि त्या अधि-काऱ्याला पकडण्याखेरीज त्याच्या खाजगी खोलींत शिरून त्याचे कागद-पत्र पळविल्यानें त्या गुन्ह्याचा भयंकरपणा शतपटीनें वाढलेला आहे. आपल्या जागांची अदलाबदल करून तुम्हांला कांहीं वेळ आरोपीच्या पिंजऱ्यांत उभें करण्याची माझी इच्छा आहे.”

अशा रीतीनें प्रारंभ करून टेरीनें सर्व साक्षींचा फोलपणा सिद्ध केला, आणि हें कोर्टच मुळीं खऱ्या आयरिश राज्याशीं द्रोह करीत आहे असें सांगून शेवटीं तो म्हणाला, “ या खटल्यांत लष्करी शिपायांनीं शपथेवर खोट्या साक्षी दिल्या हें पाहून मला फार वाईट वाटतें. कारण प्रजासत्ताक राज्याचा मी एक शिपाई आहे, आणि त्या नात्यानें कोण-

त्याही सैनिकाविषयीं आदर बाळगण्याची माझी इच्छा असते. मी लॉर्ड मेयरची जागा पतकरतांना जें भाषण केलें त्यां पलीकडे मला कांहींही सांगावयाचें नाहीं. आम्हांला कोणाची दयामाया नको आहे, किंवा कोणाशीं समेट करण्याचीही आमची इच्छा नाहीं."

यानंतर कोर्टाचे सभासद निकाल ठरविण्यासाठीं खाजगी खोलींत गेले तेव्हां टेरीची पत्नी त्याच्याजवळ आली व कांहीं वेळ दोघांच आयरिश भाषेंत बोलणें चाललें होतें. पंधरा मिनिटांनीं कोर्ट पुन्हां भरलें व अध्यक्षांनीं जाहीर केलें, कीं कोर्टाच्या मताप्रमाणें पहिल्या आरोपावर टेरी निर्दोषी असून बाकीचे तीन आरोप त्यावर शाबीत झाले आहेत.

तें ऐकतांच टेरी म्हणाला, "मला इतकेंच सांगावयाचें आहे, कीं कोर्टानें मला कितीही शिक्षा सांगितली तरी ती सारखीच आहे. मी किती दिवस शिक्षा भोगावयाची तें माझें मी ठरविणार आहे. गुरुवारपासून मी अन्नाला शिवलों नाहीं, आणि त्यामुळें एका महिन्यांतच माझा मी स्वतंत्र होईन!"

कोर्टः—" तुरुंगांत गेल्यानंतर तुम्ही अन्न वर्ज्य करणार आहांत कीं काय?"

टेरीः—" मी येवढेंच सांगतों कीं तुमच्या सरकारनें कांहींही केलें तरी माझ्या बंदिवासाची मुदत माझी मीं ठरविलेली आहे. जिवंत किंवा मेलेला, मी एका महिन्यांत बंधमुक्त होईन."

नंतर कोर्टानें टेरीला दोन वर्षांची शिक्षा दिली असल्याचें जाहीर केलें.

दुसऱ्या दिवशीं पहांटे चाराच्या सुमारास एका लहानशा आरमारी जहाजांत टेरीला बसविण्यांत आलें. तें जहाज दक्षिण वेल्समधील पेंब्रोक बंदरांत मध्यरात्रीनंतर पोंचलें व ताबडतोब टेरीला आगगाडींत बसवून १८ ऑगस्ट रोजीं सकाळीं त्याला लंडनमध्यें आणलें. ब्रिक्सटन तुरुंगावरील अधिकाऱ्यांच्या ताब्यांत त्याला पहांटे चार वाजतां दिलें.

प्रकरण सोळावें

# भयंकर दिव्य

ज्या दिवशीं टेरीला पकडण्यांत आलें त्या दिवसापासूनच त्यानें अन्न-सेवन बंद केलें होतें. अन्नत्यागानें देहपात करून आपल्या अविनाशी आत्म्याची बंधमुक्तता करण्याचा त्याचा निश्चय झाला होता. रोजच्या रोज त्याचें शरीर अधिकाधिक क्षीण होत होतें, पण त्याचा निश्चय अढळ होता. इतकेंच नव्हे, तर त्याचें आत्मिक बल वाढत होतें. तें खडतर व्रत शेवटपर्यंत आचरण्यांत त्यानें विलक्षण धैर्य आणि सहनशीलत्व दाखविलें. आपण जसे हट्टास पेटलों आहोंत तसेंच ब्रिटिश सरकारही हट्टास पेटलें आहे हें तो पक्कें समजून होता. कारण अन्न-त्यागाच्या सबबीवर आपली सुटका करणें म्हणजे आयर्लंडच्या प्रश्नावरील आपला हात काढून घेऊन पराजय पतकरण्यासारखें सरकारला वाटेल हें त्याला स्पष्ट दिसत होतें. पण टेरी लोकोत्तर पुरुष होता, आणि त्याच्या मनाचा खंबीरपणाही लोकोत्तर होता! दर क्षणाला मृत्यूच्या यातना देणारें हें असलें मरण आपण पतकरलें तर आपल्या आत्मत्यागानें आयरिश प्रजासत्ताक राज्याच्या इमारतीला अमर्याद बळकटी येईल असा त्याचा दृढ विश्वास होता!

असल्या विलक्षण प्रसंगाला धीमेपणानें तोंड देण्यासाठीं टेरीनें मुळीं सबंध आयुष्यभर आपली तयारी केली होती. स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या प्रत्येक शिपायानें आपली कडेकोट तयारी ठेवली पाहिजे असेंच त्याचें मत होतें. 'स्वतंत्र आयर्लंड' पत्रांत 'स्वातंत्र्याचीं मूलभूततत्त्वें' या आपल्या लेखमालेंतील एका लेखांत टेरीनें लिहिलें होतें, 'सर्व संकटांना आणि मोहपाशांना पायाच्या ठोकरीनें दूर लाथाडणारा वीर प्रसंग आला, कीं एका क्षणांत उत्पन्न होत नसतो. उभ्या जन्माच्या शिस्तीनें आणि संयमनानें त्याची घडण व्हावी लागते.

पाहिजे तेव्हां उचलून अंगावर घालण्याच्या वस्त्राप्रमाणें असा वीर सांपडत नाहीं. रोजच्या रोज घडणाऱ्या नित्य नैमित्तिक क्रियांचे, विचारांचे आणि विश्वासाचे घाव घालूनच वीरवृत्तीची घडण होत असते.'

दुसऱ्या एका लेखांत टेरीनें लिहिलें होतें, "यापासून आपणाला एक महत्त्वाचा धडा घेण्यासारखा आहे. कोणत्या वेळीं कोणता प्रसंग आपल्यावर येईल त्याचा नियम नाहीं. तेव्हां प्रसंग नजीक आला आहे अशा समजुतीनेंच आपण आपल्या आयुष्याला वळण दिलें पाहिजे. प्रत्येकानें हें प्रखर व्रत एकदां केव्हां तरी अंगिकारलें पाहिजे, आणि आपल्या संसारांत त्याचा अंमल सुरू केला पाहिजे. चला, आपण आपल्या निशाणाभोंवतीं उभें राहूं, आणि निशाणावर कलिकाळाचीही वांकडी दृष्टि पडणार नाहीं असे वागूं अशानेंच आपलें स्वातंत्र्य आपल्याला परत मिळेल, आणि आपल्या पिढीचा इतिहास आपल्या प्रखर तेजानें जगाचे डोळे दिपवील.'

हें असलें तत्त्वज्ञान टेरीच्या मनांत वर्षानुवर्ष मुरलेलें होतें. मग कितीही भयंकर प्रसंग गुदरला तरी त्याचें अंतःकरण कचणार कसें? लहान सहान गोष्टींत देखील त्यानें आजपर्यंत आपल्या मनाला शिस्त लावून दिली होती. सरकारशीं निकराची झटापट करण्याची वेळ आल्याबरोबर एका क्षणांत अन्नत्यागाविषयीं त्याच्या मनाचा निश्चय कायम झाला. तो वीर होता, आणि वीराविषयीं त्यानें आपल्या एका लेखांत लिहिलें होतें:—

'वीराची गोष्टच कांहीं निराळी असते. निकाराची वेळ आली असतांना कार्याकार्यविचाराच्या गोंधळांत त्याचें मन सांपडत नाहीं. त्याच्या बुद्धीचा निश्चय व्हावयास अवकाश लागत नाहीं. साऱ्या गोष्टी त्याला स्पष्ट दिसतात, आणि एका क्षणांत त्याचा मार्ग आंखला जातो. युद्धाच्या गर्दीत सैन्यानें पळ काढला, निशाण खालीं झालें, विजयी शत्रू पुढें चाल करीत आला, कीं सामान्य व्यक्तींच्या मनाला पछाडून जाण्या-

खेरीज दुसरा मार्ग दिसत नाहीं. पळ काढला नाहीं तर व्यर्थ मरण ओढवेल असें त्याला वाटतें. पण खऱ्या वीराची गोष्ट वेगळी! पळणें आणि मरणें या दोन परिणामांच्या मधोमध त्याला आशेच्या किरणांचा प्रकाश दिसत असतो. कदाचित् आपण यशही मिळवूं अशी त्याला आशा वाटत असते, आणि सामान्य जनांच्या दृष्टीला ती आशा वेडेपणाची दिसली तरी त्या वेड्या आशेसाठीं तो झगडत राहतो. त्यांत आपण गारद झालों तरी आपल्या कार्याला मदतच होईल असें त्याला वाटतें. मोठमोठ्या विजयानें जें कार्य होत नाहीं तें असल्या सत्याग्रही आत्मत्यागानें होतें. कां होतें हें एक गूढ आहे. पण तें होतें येवढें खास!'

असल्या तेजानें ज्याचे विचार तरुणपणापासून तळपत होते त्यानें अन्नत्यागाचें भयंकर दिव्य जगाला करून दाखविलें हें स्वाभाविकच झालें नव्हे काय?

टेरीला शिक्षा होतांच त्याचें काम पाहणाऱ्या डेप्युटी लॉर्ड मेयरनें सरकारजवळ मागणी केली, कीं "फादर डॉमिनिक हे लष्करी धर्माध्यक्ष आहेत व टेरीच्या संनिध राहण्याची त्यांची इच्छा आहे. तेव्हां सरकारनें त्यांना सुरक्षितपणें टेरीकडे न्यावें." या साध्या मागणीचा निकाल एक दिवसभर लांबवून सरकारनें कळविलें, कीं "फादर डॉमिनिक यांस आम्ही आणणार नाहीं. ते आले तर टेरीस भेटण्याची त्यांस परवानगी मिळेल."

हें उत्तर मिळतांच २० ऑगस्ट रोजीं मॅक्स्विनीची बायको व बहीण यांसह घाईघाईनें निघून फादर डॉमिनिक दुसऱ्या दिवशीं सकाळीं तुरुंगांत पोंचले. चार पांच दिवसांत टेरी फारच खराब झालेला त्यांना दिसला. त्याचें शरीर शिणल्यासारखें व सुकलेलें दिसत होतें, व चेहरा तर भयंकर निर्मांस दिसत होता. पण त्याचें मन गंभीर आणि शांत होतें. आपल्या तुरुंगाचीं दारें आपल्या हातानें मोकळीं करण्याचा त्याचा निश्चय अढळ होता.

त्या वेळीं तुरुंगांतील इस्पितळांत टेरीला ठेविलें होतें. हें इस्पितळ चांगलें चाळीस फूट रुंद व साठ फूट लांब असून त्यांत रोग्यांसाठीं सात पलंग टाकलेले होते. पण इतर सहा पलंग या वेळीं रिकामेच असून डाव्या बाजूच्या कोंपऱ्यांतील पलंगावर टेरी पडलेला होता.

लॉर्ड मेयर मॅक्‌स्विनी अन्नसेवन करीत आहे, इकडे तिकडे हिंडण्याची शक्ति त्याला हळू हळू येत आहे, अशा बातम्या त्या वेळीं ब्रिटिश वर्तमानपत्रांनीं कित्येकदां प्रसिद्ध केल्या. परंतु त्या सर्वथैव खोडसाळ होत्या. टेरीला बेकायदेशीर अरेरावीनें ज्या रात्रीं पकडलें त्या रात्रीपासून तों तहत ज्या क्षणीं त्याची शुद्धि कायमची गेली त्या क्षणापर्यंत टेरीनें केव्हांही अन्नग्रहण केलें नाहीं. त्याच्या भेटीला येणाऱ्या लोकांना तो कधीं कधीं बरा दिसत असे व मग 'आमची कल्पना होती त्यापेक्षां लॉर्ड मेयर अधिक चांगले दिसले!' असें ते बाहेरच्या लोकांना सांगत. पण मधून मधून टेरीच्या तोंडावर टवटवी दिसे याचें खरें कारण इतकेंच होतें, कीं अन्नासाठीं भुकेलेल्या त्याच्या शरीरयंत्राला शरीरांतीलच एखादी पोषक द्रव्यांनीं भरलेली जागा केव्हां केव्हां खावयास मिळे व त्या वेळीं त्याचें शरीर जरा ताजें तवानें झाल्यासारखें दिसे.

ब्रिक्स्टन तुरुंगांतील इस्पितळांत असतांना टेरी सारखा अंथरुणावर पडून राहिला होता व तो शक्य तितकी कमी हालचाल करीत असे. आपली शक्ति शक्य तितकी राखण्याच्या उद्देशानें तो असा वागत होता. देशासाठीं व आपल्या तत्त्वासाठीं मरण्यांत त्याला दुःख वाटत नव्हतें. पण मरण्याची त्याची तयारी असली तरी मरण्याची उत्कंठा त्याला लागलेली नव्हती. उलट पृथ्वीवरच्या सर्व राष्ट्रांनीं आपल्या देशाच्या झेंड्याला मुजरा केलेला पाहण्याची उत्कंठा त्याला लागलेली होती. मायदेशाच्या स्वातंत्र्याचा दिवस जवळ यावा म्हणून आपल्या प्राणांचा होम करावा लागत असेल तर ते प्राण हातांत

घेऊन तो उभा होता. पण आपल्या ह्या मर्त्य जीविताचा अगदीं शेवट-चा क्षण देखील मायभूमीच्या सेवेंत जाऊन देहाची शक्य तितकी अधिक सार्थकता व्हावी असें त्याला वाटत होतें.

टेरीच्या क्लेशांचें वर्णन करणें अशक्य आहे. नुसतें पंधरा मिनिटें उताणें पडून राहण्याची आपल्याला वेळ आली तर आपल्याला काय काय क्लेश वाटूं लागतात! खांदे, पाठ आणि गुडघे ठणकूं लागतात, मांड्या आणि पोटऱ्या मुंग्या येऊन बधिर होऊन जातात, आणि टांचा, पावलें आणि घोटे यांतील वेदना तर असह्य होतात! उठून गुडघे जवळ ओढले, कीं किती आराम वाटतो! पण या आरामाचें सौख्य देखील त्या वीराला मिळालें नाहीं. कारण लवकरच त्याच्या गुडघ्यांतील सांधे झिजून मांसरहित झाले होते, व पांघरुणांचा हलका भार देखील त्यांना सहन करवेनासा झाला.

आणि अशा स्थितींत दहा पंधरा मिनिटें नव्हे, तर सत्तर दिवस टेरीनें काढले! या साऱ्या यातनांपेक्षांही भुकेच्या भयंकर वेदना सहन कराव्या लागत होत्या त्या वेगळ्याच! कोणी कोणी असें म्हणतात, कीं एखाद्यानें चार पांच दिवस अन्नत्याग केला, कीं त्याची अन्नावरची वासना आपोआप नाहींशी होते. पण ही समजूत अत्यंत भ्रामक आहे. याविषयीं फादर डॉमिनिक यांनीं टेरीला अनेक वेळां प्रश्न केला. मृत्यूच्या आदल्याच दिवशीं या प्रश्नाला टेरीनें उत्तर दिलें, कीं "मला आंतून अन्नाची इतकी इच्छा वाटत आहे, कीं चहाच्या एका कपाला मी एक हजार पौंड देईन."

यावरून त्याच्या भुकेची वेदना किती भयंकर असेल त्याची वाचकांनीं कल्पना करावी. शरीराचें पोषण कमी झाल्यामुळें रक्त नाहींसें होत चाललें, व त्यामुळें 'न्युरिटिस' विकार उत्पन्न होऊन हृदयाची क्रिया बिघडली, व विलक्षण मस्तकशूळ सुरू झाला. यामुळें हळू हळू टेरीची दृष्टीही मंद झाली, व त्याला नीट ऐकूंही येईनासें झालें.

या शारीरिक यातनांत मानसिक यातनांची भर पडत होती. टेरीची प्रिय पत्नी, त्याच्या बहिणी व त्याचे भाऊ रोज त्याला भेटावयास येत. या भेटीमुळें टेरीला जितकें सुख तितकेंच दुःखही होत असे! अशा प्रेमळ आप्तेष्टांच्या सहवासाला आपण मुकणार व त्यांना दुःखांत लोटणार या विचारानें त्याच्या अंतःकरणाला पीळ पडे. परंतु त्यानें कोणत्याही गोष्टीबद्दल कुरकूर केली नाहीं, किंवा आपलें धैर्य यत्किंचितही खचूं दिलें नाहीं. आपण असेच झिजून मरणार हें त्याला पुरें समजलें होतें. पण तसल्याही मरणासाठीं त्यानें आपल्या मनाची तयारी केली होती. इतकेंच नव्हे, तर एकदम क्षणांत मृत्युवश होण्याऐवजीं मृत्युला तोंड द्यावयाची तयारी करण्यासाठीं इतका अवधि मिळाल्याबद्दल तो परमेश्वराचे धन्यवाद गात होता.

या वेळीं आयरिश प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष डी व्हॅलेरा हा अमेरिकेंत लोकजागृति करीत हिंडत होता. आयर्लंडांतील परिस्थिति उत्तरोत्तर निकराची होत चालल्याचें वर्तमान त्याला वेळोवेळीं समजत होतें. डी व्हॅलेराला टेरीच्या प्रायोपवेशनाची व सरकारच्या दुराग्रहाचीही बातमी कळली. ती कळल्याबरोबर फादर डॉमिनिक यांच्या नांवानें त्यानें मॅक्स्विनीस खालील संदेश तारेनें धाडला:—

" माझ्यातर्फे आपण लॉर्ड मेयर मॅक्स्विनींचें सप्रेम अभिनंदन करावें. सारें आयरिश राष्ट्र त्यांचें ऋणी आहे. त्यांची स्फूर्ति त्यांच्या पश्चात्‌ही राष्ट्रांत कायम राहील व तिच्यामुळें आत्मक्लेशाचें नवें तेज लोकांच्या अंतःकरणांत उत्पन्न होईल. मॅक्स्विनींच्या अतुल स्वार्थत्यागाचीच पवित्र शपथ घेऊन आम्ही त्यांचे सवंगडी अशी प्रतिज्ञा करतों, कीं त्यांनीं आपले प्राण व्यर्थ खर्चीं घातले असें आम्ही होऊं देणार नाहीं."

या संदेशाला फादर डॉमिनिक यांजकडून डी व्हॅलेराच्या नांवानें उत्तर गेलें तें असें:—

"आपल्या अभिनंदनपर संदेशाबद्दल मॅक्स्विनी अत्यंत आभारी

आहेत. त्यांनीं आरंभिलेल्या आत्मयज्ञांत आपल्या धीराच्या शब्दांचें त्यांना बहुमोल सहाय्य होईल. त्यांनीं प्रभूवर हवाला टाकला आहे, आणि आपल्या प्राणत्यागानें आयरिश रिपब्लिकच्या कार्याची प्रगति होईल अशी त्यांची दृढ श्रद्धा आहे. तुमच्या अमेरिकेंतील कार्यांत प्रभू तुमचा पाठीराखा असो एवढीच त्यांची प्रार्थना आहे."

डॉक्टर व परिचारिका टेरीची शुश्रूषा शक्य तितकी करीत असत हें खरें. पण, त्या परिचारिका म्हणजे काय? काम करणारीं यंत्रेंच तीं! आणि डॉक्टर मंडळी टेरीच्या अतुल धैर्याचें आणि विलक्षण इच्छा-शक्तीचें कौतुक करीत तरी त्याच्या प्रायोपवेशनाविषयीं त्यांच्या मनांत सहानुभूति नव्हती. त्यांचा त्याला विरोधच होता म्हटलें तरी चालेल. 'हा काय मूर्खपणाचा खेळ चालला आहे!' अशा वृत्तीनें ते वागत, निदान तसें वागण्याचें ते सोंग करीत. त्यांच्यापासून टेरीला अनेक वेळां फार त्रास होई. कारण एखादे वेळीं प्रायोपवेशनाच्या वेडेपणा-विषयीं ते लांबलचक व्याख्यानें झोडूं लागत; किंवा 'सरळपणानें दोन वर्षांची शिक्षा भोगून तूं जिवंतपणीं परत गेलास तर तुझ्या देशाला तुझा केवढा उपयोग होईल! उलट, अशा रीतीनें मरून बायकापोरांना व देशबांधवांना दुःखांत लोटण्यापलीकडे तूं काय साधणार आहेस?' असे बोलून त्याच्या निश्चयाला ते निष्कारण ताण मात्र देत.

परंतु या सर्व यातना धीरानें सहन करूनही टेरीनें आपलें मन अत्यंत शांत ठेवलें होतें. त्याचे सारे विचार आपल्या देशाविषयीं आणि आपल्या सोबत्यांविषयीं असत. त्याच्या मित्रांपैकीं जे कॉर्कच्या तुरुंगांत होते त्यांच्याविषयीं तो रोज विचारपूस करी, आणि त्यांचें शुभचिंतन करून परमेश्वराची प्रार्थना करी. त्यांच्या धैर्याची तो नेहमीं प्रशंसा करी. त्यांच्याविषयीं बोलतांना नेहमीं 'माझे बाळगोपाळ' अशा लाडक्या शब्दांनीं तो त्यांचा उल्लेख करीत असे. तो म्हणे, "असले बाळगोपाळ आयर्लंडमध्यें आहेत, तोंपर्यंत प्रजासत्ताक राज्याला काळाची देखील

भीति नाहीं. इंग्लंडच्या लोकांशीं, या इस्पितळांतील या शिकल्या संवरलेल्या डॉक्टरांशीं त्या बाळगोपाळांची तुलना करा, म्हणजे त्यांची खरी किंमत तुम्हांला कळेल." टॉमसविषयीं तो बोलूं लागला म्हणजे तर आदरयुक्त प्रेमानें त्याचें मन कांठोकांठ भरून जाई.

फादर डॉमिनिक यांच्या बरोबर अत्यंत भक्तियुक्त अंतःकरणानें तो रोज ईशप्रार्थना करीत असे. आपल्या धर्मश्रद्धेनेंच आपल्याला इतकें बळ दिलें आहे, असें तो वारंवार म्हणे.

टेरीचें प्रायोपवेशन लोकोत्तर होतें. अन्नत्याग करून इतके दिवस मनुष्य जिवंत राहूं शकेल अशी लोकांची कल्पना नव्हती. त्याच्या त्या प्रायोपवेशनाकडे आयर्लंडचेच केवळ नव्हे, तर साऱ्या जगाचे डोळे लागलेले होते. त्याविषयींच्या बातम्या तारेनें जगाच्या काऱ्या कोंपऱ्यापर्यंत पोंचून ठळक अक्षरांत प्रसिद्ध होत होत्या. मॅक्स्विनीच्या मरणाची बातमी आज येईल असें लोकांना रोज वाटत असे. परंतु त्याच्या देहानें पतन पावण्याचा क्रियेंत देखील जगाला आश्चर्यानें थक्क करून सोडलें. अन्नाविरहित त्याचा देह ७३ दिवस चेतनामय राहिला. शेवटीं ७४ व्या दिवशीं टेरीची शुद्धि नाहींशी झाली ती कायमचीच! याप्रमाणें त्यानें आपले बोल खरे करून दाखविले! आपल्या हातानें तुरुंगाचीं दारें उघडून त्यानें स्वतःला बंधमुक्त केलें! 'लंडन टाइम्स' पत्रानें देखील कबूल केलें, कीं 'त्यानें आपल्या धैर्याची आणि करारीपणाची साक्ष जगाला पुरी पटविली! टेरीनें मरतां मरतां खरोखर एक भयंकर दिव्य केलें!'

टेरीनें सत्याग्रहाचें युद्ध करून ब्रिटिश सरकारचा पाडाव केला, आणि या पाडावानें चिडून जाऊन सरकारनें शेवटपर्यंत खुनशीपणाचें वर्तन केलें. टेरीच्या मृत्यूपूर्वीं कांहीं दिवस त्याच्या दोघी बहिणींना जबरीनें तुरुंगांतून बाहेर काढण्यांत आलें होतें. व त्यानंतर त्यांना आंत सोडण्याची सक्त मनाई झाली होती. आतां टेरीचें शव त्याच्या

पत्नीच्या ताब्यांत देतांना देखील सरकारने हजार [illegible] केल्या. त्याचें शव डब्लिन मार्गानें न नेतां एकदम थेट कॉर्कला नेण्यांत यावें. या अटीवरच तें पत्नीच्या स्वाधीन केलें जाईल असा प्रथम होम सेक्रेटरीनें हट्ट धरला. शेवटीं टेरीचें शव बिनशर्त त्याच्या पत्नीच्या स्वाधीन केलें; पण इंग्रजांच्या नेहमींच्या नीतीप्रमाणें वाटेंत मध्यंतरीं 'होली हेड' येथेंच सरकारनें शव आपल्या कबजांत घेतलें व एका आरमारी जहाजांतून समुद्रमार्गानें थेट कॉर्कला त्याची रवानगी करण्यांत आली! आणि या साऱ्या वर्तनावर कळस चढविण्यासाठींच कीं काय, वाटेंत त्या शवावर सतत 'ब्लॅक अॅण्ड टॅन' शिपायांचा खडा पहारा ठेवण्यांत आला होता.

टेरीचें शव कॉर्कमध्यें आल्यावर आयरिश प्रजासत्ताक सैन्यानें तें आपल्याकडे घेतलें, व नगरभवनांत उत्कृष्ट व्यवस्थेनें ठेवलें. दुसऱ्या दिवशीं आपल्या परम प्रिय टेरेन्स मॅक्स्विनींचें दर्शन घेण्यासाठीं लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटत होत्या. लोकांना रांगेनें एका दारानें आंत व दुसऱ्या दारानें बाहेर सोडण्यांत येत होतें. टेरीच्या शवाकडे पाहून त्या वेळीं काय वाटलें तें त्याच्या एका भक्तानें अर्थपूर्ण शब्दांत लिहून ठेवलें आहे. तो म्हणतो,

"त्या गर्दींत लांबून टेरीच्या मृत मुद्रेचें पहिलें ओझरतें दर्शन होतांच त्या क्षणार्धांत तो आपल्या टेरीचाच चेहरा अशी मला पुरती ओळख पटली. नंतर मी हळू हळू जों जवळ जाऊं लागलों तों ही टेरीची मुद्रा नव्हे असें मला वाटूं लागलें. पण शेवटीं अगदीं जवळ जातांच खरा टेरी दृष्टीस पडल्यासारखें वाटून मला चमकल्यासारखें झालें. नंतर लक्ष लावून पाहिलें तेव्हां एखाद्या धातूच्या पुतळ्याच्या मुद्रेसारखी टेरीची मुद्रा दिसूं लागली. आम्हांला पूर्वीं नेहमीं दिसत त्यापेक्षां निराळ्याच रेषा त्या चेहऱ्यावर उमटल्या होत्या. अडीच महिन्यांच्या झिजेनें चेहऱ्यांतील सारें मांसतंतू नाहींसे झाले होते. किंबहुना कृत्रिमपणाचा सर्वच पडद

दूर करून खऱ्या टेरीचा चेहरा आपल्याकडे डोकावून पहात आहे अशी त्या क्षणीं माझ्या मनांत कल्पना आली. आणि ती एका अर्थीं खरीच होती. टेरीची ती मुद्रा योद्ध्याच्या मुद्रेसारखी दिसत होती. त्याच्या अंगच्या इतर अगणित गुणांनींच आजपर्यंत लोकांची दृष्टि इतकी दिपवून टाकली होती, कीं टेरी हा मूळ हाडाचा योद्धा आहे अशी कधीं देखील कोणाला कल्पना झाली नसेल. पण आज टेरीच्या त्या चेहऱ्यावर जर कसलें तेज दिसत असेल तर तें लढाईच्या ऐन गर्दीतील होय ! त्या चेहऱ्यावरील उमटलेली निश्चयाची, करारीची, शांतीची आणि धैर्याची छाप पाहतांच पहिल्या प्रतीच्या रणझुंजाराचा चेहरा पाहिल्यासारखें वाटत होतें ! अथांग धैर्य आणि अतुल आत्मत्याग ! याशिवाय टेरी म्हणजे दुसरें काय होतें !"

टेरी दिवंगत झाला, पण कीर्तिरूपानें तो जगाच्या अंतापर्यंत उरला ! खरोखर, त्याचें मरण म्हणजे वीररसानें रसरसणारें एक उदात्त काव्य होऊन गेलें ! टेरीच्याच एका लेखांतील शब्दांनीं त्याचें गुणवर्णन करावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल, कीं तो एक मनाचा दिलदार आणि अंतःकरणाचा खंबीर पुरुष होऊन गेला. ज्या विजयाचे दिवस आपल्या डोळ्यांना कधीं दिसणार नाहींत त्या विजयासाठीं तळहातावर प्राण घेऊन तो पुढें सरसावला होता. लढाईतील सवंगड्यांना तो कधीं विसरला नाहीं, आणि शत्रूचा कावा त्यानें कधीं मनांत बाळगला नाहीं. मरणाच्या वेळीं आपल्या उदात्त विचारांच्या संगीतानें मोहून जाण्याचा वारसा शत्रूंना व मित्रांना सारखाच वांटून देऊन त्यानें स्वर्गाची वाट धरली आपण सत्यासाठीं झगडत आहोंत आणि सत्यापुढें कशाचाही पाड नसतो हा विश्वास त्याच्या मनांत दृढ होता. संकटें, क्लेश, हाल अपेष्टा, सर्व कांहीं सहन करावयास त्याची तयारी होती. कारण जगण्यांत जितकी मौज आहे तितकीच मरण्यांतही आहे अशी त्याची दृष्टि आणि श्रद्धा होती !

मुंबई युनिव्हर्सिटीनें बक्षीस दिलेलें

# दादाभाई नौरोजी

## यांचें चरित्र.

लेखकः—प्रो० ना. सी. फडके, एम. ए.

किंमत १–४.

पुस्तकें मागविण्याचे पत्तेः—

१ प्रो० फडके, ८३६ सदाशिव, पुणें.

२ व्यवस्थापक, विजय साहित्य, पुणें.

३ डॉ. गणपुले, ६६५ शुक्रवार, पुणें.

पुस्तकें मागवितांना 'मॅक्रुस्तिनी'चा उल्लेख करावा.